IRBK-0100554

म ग्रं सं वाचनालय शाखा ठाणे
विषय नाटक
दा क्र ५५४

IRBK-0100554

१५।१।२५

# भरत-भाव.

अंक १ ते ४

लेखक

मोरेश्वर वासुदेव दोंदे,

लाईफ वर्कर, गोखले एज्युकेशन सोसायटी,

सन १९२४.

IRBK-0100554

IRBK-0100554

किंमत ८ आणे.

क्र. ५५८

हें पुस्तक ठाणें येथें रा. रा. **धोंडो काशिनाथ फडके,**
यांनीं आपल्या अरुणोदय छापखान्यांत छापिलें, व रा. रा.
**मोरेश्वर वासुदेव दोंदे,** यांनी गोखले एज्युकेशन
सोसायटीच्या परळ हायस्कूलांतील बॉईज पार्लमेंट
तर्फे प्रसिद्ध केलें.

---

[ पुनर्मुद्रणाचे व भाषांतराचे वगैरे पुस्तकासंबंधीं सर्व हक्क
ग्रंथ कर्त्यानें आपल्याकडे ठेविले आहेत. ]

# प्रस्तावना.

हें नाटक गोखले एज्युकेशन सोसायटीच्या परेल शाखेचे अध्वर्यु श्रीयुत मोरेश्वर वासुदेव दोंदे, यांनीं, त्याच संस्थेंतील विद्यार्थ्यांच्या संमेलन-प्रसंगाकरितां, लिहिलें आहे. श्रीयुत अण्णासाहेब दोंदे, हे स्वभावतःच कोमल व प्रेमळ हृदयाचे सज्जन असल्यामुळें, त्यांनीं अल्प परिचयांत यापूर्वींच मला स्नेहबद्ध केलें आहे, ह्मणून त्यांच्या नाटकास प्रस्तावना लिहिण्याची त्यांची प्रेमळ विनंती, मला अनिवार्य वाटली. वेळ थोडा होता; कामें फार होतीं; त्यामुळें त्यांच्या या सत्कृतीचा माझ्या मनासारखा परामर्ष घेतां आला नाहीं. त्यांच्या निस्सीम प्रेमाकरितां मी ही प्रस्तावना, मोठ्या आनंदानें .त आहें.

ज्याला आद्य काव्य ह्मटलें जातें, त्या रामायणासारखा जागोजाग दिव्य प्रेमानें व करुणरसानें ओथंबलेला धार्मिक ग्रंथ तरत्र क्वचित्च आढळेल. जेथून श्री रामाच्या चरित्राला खरा आरंभ होतो, तो प्रसंग ह्मणजे त्यांचा राज्यारोहण-समारंभ व त्या- ीं भरतमाता कैकेयी हिनें प्रगट केलेला मत्सर हा होय आपल्या आवडत्या सद्गुणी व सुशील पुत्रास ऐनवेळीं राज्यावर न बसवितां -- वर्षे वनवासांत पाठविण्याच्या असह्य दुःखानें इकडे राजा तळमळत आहे; तर मातृ-वचन व पितृवचन पालनाकरितां

श्री रामचंद्र प्रभु वनवासांत जाण्यास तयार झाले आहेत. इकडे कैकेयी असूयेनें प्रज्वलित झाली आहे; तर तिकडे राममाता कौसल्या पुत्र-वियोगानें विव्हळत आहे! श्री रामावरील निरातिशय प्रेमानें इकडे सर्व अयोध्या नगरी शोक सागरांत बुडून गेली आहे; तर तिकडे मातुलगृहीं असलेल्या रामभक्त भरताला या अनर्थाची वार्ताही नाहीं; असा हा भव्य, उदात्त व करुण प्रसंग आहे.

वरील प्रसंगीं लक्ष्मणाचें रामचंद्राबरोबर वनवासांतील कष्ट सहन करण्याचें बंधुप्रेम व्यक्त होतें; तोंच पुढें क्रमानें 'भरतभाव' व 'भरतभेट' या दोन्ही प्रसंगांत तेंच बंधुप्रेम अत्यंत हृदयस्पर्शी व दिव्यतर दिसूं लागतें. भरत घरीं आल्यावर, त्यानें केलेला कैकेयीचा धिःकार, कौसल्येची समजूत, राजवैभवाचा त्याग आणि श्री रामाच्या चरणीं विळखा घालून, त्यास परत आणण्याची सदीच्छा हे भाव ह्मणजे जणूं काय इंद्रधनुष्यांतलि एकापुढील एक मनोहर कमानीच होत. तिसरा भरत-भेटीचा प्रसंग, ह्मणजे नुसतें तें चित्र डोळ्यांपुढें येतांच अश्रु उभे राहतात, मग त्याचें शब्दचित्र रडावयास लावील यांत काय नवल?

०

ज्या देशांत आपण राहतों; त्या देशांतील प्रत्येक रहिवासी हा आपला देशबंधु होय; आणि बंधु ह्मटला कीं, त्याविषयीं आपण किती प्रेमळ असलें पाहिजे, या विषयींचें शिक्षण विद्यार्थ्यांस देण्याची आज किती आवश्यकता आहे, हें कांहीं कुणास सांगावयास नको. परंतु प्रत्यक्ष घरांतील बंधूवर प्रेम कसें करावें, त्याचें

सुखदुःखांत आपलें सुखदुःख कसें मानावें, त्याविषयीं निष्कपट मनाचा आदरभाव कसा असावा, यांचे हे असे प्रयोगद्वारां प्रत्यक्ष नीतिपाठ दिल्यावांचून, देशबंधु विषयींच्या प्रेमाचे कथात्मक नीतिपाठ देण्यानें विद्यार्थ्यांचें तितकेंसें शीलवर्धन होणार नाहीं, हें स्पष्ट आहे.

श्रीयुत अण्णासाहेब दोंदे यांनीं विद्यार्थ्यांकरितां लिहावयाच्या नाटकास वरील प्रसंग निवडून घेण्यांत मोठी मार्मिकता प्रगट केली आहे, एकही स्त्रीपात्र पुढें न आणण्यांत कुशलता दाखविली आहे; आणि शेवटपर्यंत बंधु--प्रेमाचा परिपोष करणारे प्रवेश घालून, व एकंदर बालभाषा वापरून, आपल्या ध्येयाची सिद्धता केली आहे. बालस्वभावांत क्रीडाप्रियता निसर्गतःच असते, कुमारावस्था ह्मणजे आयुष्यांतील क्रीडांगणच होय. मुलांच्या या मूलस्वभावाचा अशा प्रयोगद्वारां उपयोग करून, त्यांना समाजाचे व राष्ट्राचे सुशील घटक बनविण्याचें पवित्र कर्तव्य करणारे शिक्षक निःसंशय आदराला पात्र आहेत.

एव्हांपर्यंत 'नाटक' हा विषय एकच होता. पुरुषांकरितां नाटक, स्त्रियांकरितां नाटक किंवा मुलांकरितां नाटक, अशीं त्याचीं स्वरूपें नव्हतीं. रंगभूमीवरील प्रचलित नाटकांपैकीं, एकाद्या नाटकांत वात्सल्य, पातिव्रत्य यांचा अधिक परिपोष झालेला असला तर तें नाटक मुलांस पाहण्यास योग्य होय एवढीच चर्चा फारतर क्वचित् कूं येत होती. परंतु ज्या नाटकांत विद्यार्थी प्रत्यक्ष नट होणार

व स्वतः अभिनय करणार, असें मुलांचें नाटक ह्मणजे तो नाटक या विषयाचा अंमळ निराळाच भाग झाला. त्यांत शृंगाराचा प्रवेश होणार नाहीं, अश्लील विनोदाचा पाय शिरणार नाहीं व शीलसंवर्धनाच्या विशिष्ट गुणनिदर्शनाचा मार्ग सुटणार नाहीं आणि या गोष्टी सांभाळल्या जातील, तरच तें मुलांचें नाटक. त्या दृष्टीनें हें नाटक उत्तम वठलेलें आहे. इतर शाळांतून बक्षिस समारंभाच्या वेळीं होणाऱ्या लहान मोठ्या संवादांचें हें 'मुलांचें नाटक' जरी स्थूलरूप असलें तरी तसा सुव्यवस्थित प्रयत्न आजवर फारसा झालेला नाहीं तो परळ हायस्कूलांतील अध्यापकांनीं व प्रवर्तकांनीं केला, असें ह्मणणें अवास्तव होणार नाहीं.

या संस्थेनें गेल्या वर्षीं 'प्रल्हाद जयन्त' हें नाटक रंगभूमीवर यशस्वी करून, पुस्तक-रूपानें प्रसिद्ध केलें; यावरून जसें बाल-गद्य-वाङ्मय पुण्याच्या आनंद कार्यालयांत जन्माला आलें, तसें बालनाटक-वाङ्मय परळ हायस्कूलांत जन्माला आलें या यशाला ही संस्था पात्र होईल असा भरंवसा आहे.

जळगांव,
१।१०।१९२४.

के. म. सोनाळकर.

# लेखक व प्रकाशक.

महाराष्ट्रांतील सुप्रसिद्ध कवी, तत्ववेत्ते, नाटककार, व जळ-गांवचे प्रख्यात वकील, श्रीयुत आप्पासाहेब सोनाळकर, यांनीं या चिमुकल्या ग्रंथाला प्रस्तावना लिहून, लेखकाबद्दलचें निर्व्याज प्रेम, व ग्रंथ-प्रकाशन करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संस्थेबद्दलचा आदर, व्यक्त केला आहे. त्यांच्यासारख्या मार्मिक, रसिक व अधिकारी मित्रांनीं दिलेलें प्रोत्साहन, अमूल्य आहे. त्याबद्दल लेखक व प्रकाशक या नात्यानें मी त्यांचा अत्यंत ऋणी आहें.

शाळेच्या बॉईज् पार्लमेंटनें 'प्रल्हाद जयन्त' हें नाटक प्रकाशित केल्यानंतर, जें सर्व बाजूंनीं उत्तेजन मिळालें, त्याच उत्तेजनाच्या विश्वासावर, हें दुसरें पुष्प प्रकाशित करण्याची जबाब-दारी संस्थेनें अंगावर घेतली. पहिल्या ग्रंथाची पैशाची जबाबदारी, विद्यार्थ्यांनीं रंगभूमीवर नाटकाचे प्रयोग करून, बहुतेक पार पाड-लेली आहे. या ग्रंथाची फायदा नुकसान वगैरेची पैशाची जबाबदारी, पार्लमेंटकरितां विद्यार्थ्यांविषयीं कळकळ बाळगणाऱ्या लेखकाच्या मित्रांनीं सर्वथैव शिरावर घेतली आहे; त्यामुळें हें प्रका-शनाचें काम अंगावर घेणें, धोक्याचें राहिलें नाहीं. पार्लमेंट या सन्मित्रांचे उपकार कधींही विसरणें शक्य नाहीं.

नाट्यप्रसंगाविषयीं श्री. आप्पासाहेब यांनीं लिहिलेला अभि-प्राय, पुरेसा आहे. तथापि येवढें लिहिणें अवास्तव होणार नाहीं

कीं, रामायण हा अत्यंत उत्कृष्ट ग्रंथ, आबालवृद्धांच्या हातांत सदैव असणें जरूर आहे. विद्यार्थ्यांच्या शीलास सन्मार्गाचें वळण लावण्यास हा ग्रंथ अप्रतीम आहे. भरत-भाव व भरत-भेट हे प्रसंग तर अतिशय बहारीचे आहेत. गेल्या उन्हाळयाच्या रजेंत, तुलसीदास रामायण वाचीत असतां, तुलसीदासांच्या अति रसाळ कवनाच्या योगानें, प्रस्तुत नाटक लिहिण्याचीं स्फूर्ती झाली. त्या ग्रंथांतील अति रमणीय प्रसंग, रसपूर्ण भाषा, उदात्त विचार, वगैरे गोष्टींनीं मन मोहित होऊन, लेखणी हातांत घेतली, व विद्यार्थ्यांना त्या शिरोमणी ग्रंथाचा परिचय करून देण्याच्या सद्हेतुनें ते विचार नाट्यस्वरूपांत उतरविण्याचा यथामति प्रयत्न केला. ग्रन्थ प्रेमी सज्जनांच्या चरणीं सादर केलेला आहेच. तथापि त्यासंबंधानें येवढें सांगणें जरूर आहे कीं, हें नाटक, शाळेच्या संमेलन-प्रसंगाकरितांच लिहिलेलें आहे. अशा वेळीं, पुष्कळ विद्यार्थ्यांना रंगभूमीवर येण्याची हौस असते; ती हौस भागवितां यावी, ह्मणूनच नाटकांत मुख्य पात्रांखेरीज, इतर लहानसहान पात्रांची संख्या वाढवावी लागली आहे. शिवाय काम करणारीं मुलें लक्षांत आणूनच भाषाप्रसंग ठेवलेले आहेत. भक्तिरस व बंधुप्रेम यांनीं रोमरोमांत भरून राहिलेल्या भरताला, भक्ति व करुणा या रसांनीं युक्त असलेलीं अगदीं साध्या चालीवरील पदें घालण्यांत, भरताचें चित्र, अंतःकरणाला हालविण्याकरितांच रंगविलेलें आहे. एवढा खुलासा करणें जरूर आहे.

सोसायटीचे अध्वर्यु व नाशिक कॉलेजचे प्रिन्सिपाल श्रीयुत

कुळकर्णी, यांनीं 'प्रल्हाद जयन्त' नाटकास चार शब्द जोडलेले आहेत. त्यांनीं या उपक्रमाचें धोरण, महत्व व अवश्यकता यांचें अगदीं विचारपूर्ण दिग्दर्शन केलेलें आहेच. त्याच धोरणांनीं, हें दुसरें पुष्प, गोंवण्याची महत्वाकांक्षा धरलेली आहे. एवढ्या लवकर हें दुसरें पुष्प प्रकाशित करतां येईल ही कल्पनाच नव्हती; परंतु विद्यार्थ्यांच्या अट्टाहासामुळें व शाळेंतील प्रेमळ शिक्षकांच्या प्रेमळ मित्रत्वामुळें, पार्लमेन्टनें, हें पुस्तक छापण्याचें ठरविलें; व त्यांच्या निश्चयास सर्वतोपरी साहाय्य मिळून, हें पुष्प, सादर करण्याचें सद्भाग्य लाभलें, याबद्दल धन्यता वाटते.

अरुणोदय छापखान्याचे मालक व माझे मित्र श्री. फडके, यांनीं, पुस्तक छापण्याच्या कामांत, व तें सर्वांगसुंदर करण्यांत जी दक्षता, कळकळ, सहानुभूती व प्रेम, व्यक्त केलें, त्याबद्दल त्यांचे मी मनःपूर्वक आभार मानतों

गुरुशिष्याचा संबंध ह्मणजेच सात्विक बंधुप्रेमाचें प्रतिबिंब, व ईश्वरप्रणित अंतर्यामाची ओळख, याच भावनेनें, सर्व बालमित्रांस हें पुस्तक अर्पण करण्याचा बहुमान मी आपल्याकडे घेतों.

विजया दशमी,
शके १८४६. }

**मोरेश्वर वासुदेव दोंदे.**

ग्रं. क्र. ५५१४ ...
ग्रं. ... ग्रा१२५ ...
नों. ...
२-५-३७

# भरत–भाव.

## अंक पहिला.

### प्रवेश पहिला.

ईशस्तवन—मुलें पद म्हणत टिपऱ्यांच्या तालावर नाचत येतात.

पद १ लें.

( चाल—हे प्रभो विभो. )

हे रघूत्तमा ऽ ऽ, अर्पुं सुमन तव चरणीं ।
शिशुजन हे रमती भजनीं ऽऽ ॥ ध्रु० ॥
बाल तूं ठेवि विनयाला । शिशुपणीं भंगी चापाला ।
भुजबळीं दावि शौर्याला । प्रकटवी देवपणाला ॥ १ ॥
नृप-पद सुखवी न मनाला । शिरीं धरी पितृ-वचनाला ।
बालक घे थोरपणाला । वनवासीं मोद जीवाला ॥ २ ॥
रघुपती राघवा रामा । अभिरामा मंगलधामा ।
आरामा रमवि विरामा । तव नमनीं सुखीं नामा ॥ ३ ॥

### पद २ रें.

( पद—भूप; ताल-त्रिताल )

वंदन रघुयाला; सकला । जगता दे चिरसौख्याला ॥
चराचरीं जो भरला साचा । अनंतरूपें घुमवी नाचा ।
शान्तिसुखाचा, दुःखभराचा, खेळत खेळा ध्याला । सकला ॥

### पद—केदार

श्रीराम-चरणास । अर्पूं निजमनास ।
सुविचार-कमलास । फुलवो मती ही ॥
अज्ञान बालांस । चुकवीत मार्गास ।
देई तूं हातास । विनती तुला ही ॥
विद्या-धना दावि । गुरुदेव कर ठेवि ।
विलया कु-मति जावि । विनती तुला ही ॥
बालें आम्हीं सान । भजनास मुखिं गान ।
आनंद घे तान । चरणीं तुझ्या ही ॥

पद ३ रें. सुरू होतांच मागचा पडदा हळू हळू वर जातो. आंतही मुलें तेंच पद म्हणतात.

**इंद्राचा दरबार**—इंद्र, अमात्य, विभूषण, कुंडलधर, व बृहस्पती बसलेले आहेत.

पद पुरें होतांच मुलें निघून जातात.

**इंद्रः**—देवहो, या बाबतींत मी कोणाचेंच ऐकायला तयार नाहीं. देवगुरु बृहस्पतींचा सल्ला या वेळीं मला योग्य वाटत नाहीं. देवेंद्र या नात्यानें स्वर्गाच्या राज्याची जबाबदारी माझ्या शिरावर आहे. देवगुरूंचा सल्ला धर्मनीतीस धरून असला, तरी तो राजनीतीला मान्य होणार नाहीं. राजनीतीचे मार्ग

निराळे असतात. एकादा धर्मात्मा कितीही नीतिमान् असला, तथापि त्याचें आचरण राष्ट्रहिताला घातक होत असेल तर तो धर्मात्मा राष्ट्रहिताच्या दृष्टीनें शत्रूच समजला पाहिजे. त्याचा समूळ नाश करणें राजनीतीच्या दृष्टीनें अनीतीचें होणार नाहीं.

**बृहस्पती**:—देवेन्द्र, व्यवहारामध्यें धर्म आणि राजनीति हे जरी परस्पर भिन्न दिसले, तरी ते परस्पर विरोधी नाहींत. धर्म आणि राजनीति यांचा व्यवहारांत संगम झालेला असतो. धर्माशिवाय राजनीति त्याज्य होईल; व राजनीतीशिवाय धर्म अव्यवहार्य होईल.

**इंद्र**:—देवगुरु, या तत्वज्ञानापेक्षां व्यवहार मला अधिक प्रिय आहे. बलिराजानें स्वर्गाच्या सिंहासनावर केवढें संकट ओढवलें होतें? ययाती राजानें अर्धें इंद्रपद बळकावलें होतेंच कीं नाहीं? या सर्व अरिष्टांचें कारण राजनीति पायाखालीं तुडवून, धर्माला डोक्यावर नाचविणें हेंच होय.

**अमात्य**:—राजाधिराज, देवगुरूंचा सल्ला सर्वथैव मान्य नसला तरी अगदीं कांहीं त्याज्य नाहीं. त्यांचा सल्ला कधीं कधीं आपणांस हितकारक झालेला आहे. देवगुरूंचा सल्ला झिडकारल्यामुळें दधीची ऋषीचा मृत्यु आपल्या हातून घडला आणि ब्रह्महत्त्येचें पातक वांट्यास आलें.

**विभूषण**:—देवेश्वरा, आपलें म्हणणें अगदीं योग्य आहे. धर्माचें तत्त्वज्ञान अगदीं धुक्यासारखें आहे त्या धुक्यांतून चाचपडत जातांना केव्हां कोठें अपघात होईल याचा नेम नाहीं. व्यवहार हा सूर्यप्रकाशासारखा स्वच्छ आहे. कोणत्याही गोष्टीचें खरें स्वरूप सूर्यप्रकाशांत उघडकीस आल्याशिवाय राहाणार नाहीं.

**कुंडलवर**:—विभूषण, तुमचें म्हणणें मला तंतोतंत पटतें. अहो, या स्वर्गाच्या गादीवर एकादा व्यवहारशून्य अधिपती आला, तर येथील या वैभव लक्ष्मीची काय स्थिती होईल? कल्पवृक्ष खुरटून मरून जातील; अमृताचीं तळीं आटून जातील; कामधेनु वांझ होतील; आणि या कुंडल-विभूषणांची कवडीमोल किंमत होईल. देवेन्द्र, तें कांहीं नाहीं. देवगुरूंचा सल्ला अगदीं कुचकामाचा आहे.

**विभूषणः**—आणि अमात्यांची ही मुळमुळीत मसलत बिलकूल स्वीकारितां कामा नये.

**बृहस्पतीः**—राजा, धर्म आणि राजनीति हा नसता वाद वाढविण्याची माझी इच्छा नाहीं. आपण मला सल्ला विचारलांत. आपल्या व आपल्या राज्याच्या आध्यात्मिक अभ्युदयाची जबाबदारी मजवर असल्यामुळें, त्या दृष्टीनें योग्य वाटणारा सल्ला देणें मला प्राप्त होतें. तो स्वीकारणें न स्वीकारणें आपल्यावर अवलंबून आहे. आपण सत्ताधीश आहांत. स्वर्गाच्या राज्यपदाचा अधिकार आपल्या हातांत आहे. परंतु देवेन्द्रा, ती सत्ता केवळ ऐहिक सुखाच्या परमावधिकडे आपण उधळतां कामा नये. अशा हेकेखोरपणामुळें पुष्कळ अनर्थ गुदरले आहेत, हें पक्कें लक्षांत असूं द्या. आपली आजची प्रवृत्ती आपल्याला चुकवीत आहे. माझें म्हणणें आपल्याला आज रुचण्यासारखें नाहीं. परंतु महाराज, लक्षांत असूं द्या, कीं ब्रह्मदेवाच्या विश्वरचनेंत गर्वाला पड ठेवलेली आहे. देवाधिदेवसुद्धां या चक्रांतून निसटून जाऊं शकत नाहीं. आपल्या कारस्थानांत माझें मन केव्हांही गुंतून राहणार नाहीं. आपलें कपटी कारस्थान ऐकण्याची माझी इच्छा नाहीं. ( जाऊं लागतो ) जातां जातां येवढेंच बजावून ठेवतों कीं, आपल्या कपटी कारस्थानाची इमारत कोसळून पडणार आहे; अपयशाचा वांटा आपल्याला वाढून ठेवला आहे; व शेवटीं आपले सर्व बेत फसून आपली मानहानि होईल, आणि शत्रूच्या पुढें आपणांस नाक घांसावें लागेल. ( जातो )

**अमात्यः**—राजाधिराज, गुरुमहाराज रागावून गेले, हें कांहीं ठीक झालें नाहीं. तपःसामर्थ्यानें प्राप्त झालेली दिव्य दृष्टी त्यांना नेहमीं योग्य मार्ग सुचवीत असते. त्यांनीं जातां जातां दिलेला शाप [illegible]ण्याचा संभव आहे. राजाधिराजानें या गोष्टीकडे अगदींच दुर्लक्ष करूं नये.

**इंद्रः**—( रागानें ) अमात्य, तुमचें हें दुटप्पी भाषण या ठिकाणीं चालणार नाहीं. गुरुजींनीं सल्ला देण्याचें आपलें काम केलें. परंतु त्याप्रमाणें करणें न करणें हें आमच्या खुषीचें काम आहे. गुरुजी झाले म्हणून त्यांनीं आपलीं मतें आम्हांवर लादण्याचा अट्टाहास करणें मूर्खपणाचें आहे. अमात्य, तुम्हीं आमचे नोकर आहांत.

**अमात्य:**—होय सरकार. मी आपला दास आहें. धन्याच्या मर्जीविरुद्ध बोलणें अगर वागणें सेवकवृत्तीला पटणारें नाहीं. सरकार, दासाला वाटलें, तें बोललों. धन्याचा हुकूम बजाविणें हेंच आमचें कर्तव्य आहे. आपण मला कर्तव्याची जाणीव दिलीत, याबद्दल महाराजांचा जन्मोजन्मीं दास होण्यास मी तयार आहें.

**कुंडलवर:**—कसा वठणीवर आला पण. या दुटप्पीपणाची याला संवयच लागली आहे.

**इंद्र:**—अमात्य, जा तुम्हीं. लवकरच मी कांहीं हुकूम सोडणार आहें. त्याची अम्मलबजावणी बिनचूक बिनबोभाट झाली पाहिजे. तुमच्याकडून किंवा इतर कोणाकडून थोडीशी सुद्धां कसूर झाल्याचें माझ्या नजरेस आलें, तर त्याचा परिणाम फार वाईट होईल हा देवेंद्र आपल्या हुकुमाची थोडीदेखील पायमल्ली सहन करणार नाहीं. (अमात्य जातो.) या जनक दशरथाच्या संबंधामुळें मला फार भीति वाटूं लागली आहे. जनक फार ज्ञानी आहे. संसार करून परमार्थाचें महापुण्य त्यानें साधन केलें आहे. दशरथ संयमी असून रणधुरंधर आहे. रामसीता यांच्या विवाहामुळें, हीं अति प्रबळ कुटुंबें एकजीव झालीं आहेत. शिवाय दशरथाच्या रामचंद्राबद्दल, तिन्हीं लोकांत संचार करणारे पुष्कळ ऋषी व मुनी, नेहमीं स्तुतिपर बोलत असतात. राम हा असामान्य मनुष्य आहे; त्याचा पराक्रम त्रिभुवनांत अखंड दुमदुमून राहील, असें भविष्य दिव्यदृष्टीनें त्यांनीं वर्तविलें आहे. हें भविष्य जर खरें ठरलें, तर [illegible]चें इंद्रपद डळमळूं लागेल व सर्व परिस्थिती पालटून जाईल.

**विभूषण:**—देवेन्द्र, कांहींही करून हें अरिष्ट टाळलेंच पाहिजे. असा कांहीं कट रचला पाहिजे कीं, ज्या योगानें जनक आणि दशरथ यांच्या वैभवाचें तेज कमी होईल; राम सर्व ऐश्वर्यास मुकेल; पराक्रम गाजविण्याची संधी न मिळतां, त्याला अतिशय हाल अपेष्टा भोगाव्या लागतील.

**कुंडलवरः**—मृत्युलोकांतील या मरणाऱ्या मर्त्यांना मारूनच टाकलें पाहिजे. यांना ही ऐश्वर्याची मिजास पाहिजे कशाला ? मनुष्यानें आपल्या पायरीनेंच असलें पाहिजे.

**इंद्रः**—हें पहा, आतां असें करूं. दशरथाच्या राज्यांत कलीचें पिशाच सोडून देऊं. त्या पिशाचाचा नाच सुरू झाला, म्हणजे सर्व कांहीं ठीक होईल. त्या भूतानें दशरथाच्या राणीलाच पछाडायचें आणि राणीनें त्याला वचनबद्ध करून, रामाला राज्यांतून घालवून द्यायचा. या गोंधळामुळें, वृद्ध राजा थकून जाईल व कदाचित् पिकलेलें पान गळूनही पडेल.

**विभूषणः**—वाहवा, काय युक्ती आहे पण.

**कुंडलवरः**—राजा, मग मजा होईल कीं रे ?

**इंद्रः**—बापाचें मरण ऐकून राम बेहुरूप होईल. उदासीनता आली, ह्मणजे वैराग्यवृत्ती उत्पन्न होण्याला वेळ नाहीं.

**कुंडलवरः**—आणि एकदां कां त्यानें अंगाला राखाडी लावून, डोक्यांत राख घातली, ह्मणजे झालीच त्याची राख रांगोळी.

**इंद्रः**—अशा रीतीनें त्याला दुबळा करून टाकतां येईल. मग काय, सध्यां येवढ्या गोष्टी ठरल्या ? सर्वांनीं कंबर बांधली पाहिजे.

**कुंडलवरः**—देवेन्द्रा, येतांना घाईघाईत शेला विसरलों; मोठी पंचाईत झाली आहे.

**विभूषणः**—अहो पण, आतां कशी आठवण झाली त्याची ?

**कुंडलवरः**—शेला असता, ह्मणजे आतांच राजासमोर कंबर बांधून महाराजांची खात्री पटवून दिली असती कीं, हा कुंडलवर किती तडफीचा आणि हिमतीचा आहे.

**इंद्रः**—आपणां सर्वांचें एकमत झालें ना ? चला मग, पुढील कामास लागूं.

( जातात. )

## प्रवेश २ रा.

[ दशरथाचा महाल; दशरथ शोकाग्रस्त स्थितींत बसलेला आहे. ]

**दशरथः**—( सुस्कारा टाकून ) माझ्या हातांनीं मी सूर्यवंशावर कुऱ्हाडीचा प्रयोग केला! त्या चांडाळणीची किती तऱ्हेनें मनधरणी केली. हें माझें मस्तक मी तुझ्या स्वाधीन करतों, परंतु माझ्या पाडसाची मजपासून ताटातूट करूं नकोस. किती विनविलें, परंतु त्या पापिणीला लवमात्र द्रव आला नाहीं. टाकून तरी किती प्रकारानें बोलली! एकाद्या मदमस्त हत्तीणीनें वृक्ष उलथून पाडावा, तशी माझी स्थिती झालेली आहे. एवढी मध्यरात्र झाली, तरी अयोध्या नगरी किती गजबजून जागी आहे. सर्व नगर शृंगारण्यांत जनता आज आपल्या सर्वस्वाचें मोल खर्च करीत आहे. तान्ह्या बालकांच्या आक्रोशाकडे लक्ष न देतां माता आपआपल्या अंगणासमोर, गुढ्या-तोरणें उभारून, चित्रविचित्र वेलींची रांगोळी काढीत असतील! बाळा रामा, तुझ्या अभिषेकाची ही सर्व तयारी बरें! बाळा, या सर्व लोकांना तुझें वेड तूं कोणती किमया करून लावलेंस? असंख्य जीवांना तूं भारून टाकलेंस, मग त्या चांडाळणीवर तुझी मोहनी दुबळी कशी ठरली? कोणत्या गोष्टीकडे पाहून मी आपलें समाधान करून घेऊं? अंतरिक्षांत उंच भरारी मारणारा पक्षी, आपलें इच्छित स्थळ अगदीं जवळ आलें, या आनंदांत गुंग असतां, एकाएकीं त्याचे दोन्ही पंख गळून पडावेत; व आपलें ठिकाण अगदीं डोळ्यासमोर असतांना, तो खालीं खोल दरींत कोलमडून पडावा. तशी माझी अवस्था झाली आहे. आयुष्याच्या वसंतऋतूंत फुलांफळांनीं डंवरलेल्या वृक्षवेलींवर आनंदानें उडणारा पंडोल, शिशिरांतील झंझावातानें पर्णहीन झालेल्या वनस्पतीवर हिमघातानें गारठून मरावा,—जगाची ही केवढी निर्दयता! रामा, जन्मभर राज्याचा भार वाहून, थकल्यावर विश्रांतीचें मोल घेण्याचा विचार मूळांतच कसा उपटून पडला! रामा, रामा, कोणत्या तोंडानें मी तुला 'वनवासांत जा'

म्हणून सांगूं ! माझ्यासारखा पाषाणहृदयी पिता या त्रिभुवनांत केव्हांतरी आढळून येईल कां ? ( शंख, सनई, चौघडे वाजूं लागतात. ) अरेरे, हा मंगलवाद्यांचा ध्वनी ! माझ्या हृदयाच्या चिंधड्या होत आहेत ! ! त्या कैदासणीच्या वाग्बाणांनीं झालेल्या जखमांवर हा मिठाचा पाऊस पडत आहे ! ! ! दैवा, किती कडक शासन तूं मला करीत आहेस ! ( वाद्यें वाजूं लागतात. )

( सुमंत प्रवेश करतो. )

**सुमंतः**—हें काय ? या राजमंदिराच्या भोंवतालीं या मंगलसमयीं उदासीनतेचें वारें कां बरें संचार करीत आहे ? या अभिषेकाच्या मांगल्यांत ही अमंगल भीषणता कां बरें भिवडावूं पहाते ? येथील प्रत्येक पदार्थ आज खाऊं कां गिळूं असें कां बरें करताहेत ? कांहीं तरी अनिष्ट प्रकार दिसतो आहे. सरकारस्वारी दररोज या पूर्वींच उठायची मग अद्यापि कां बरें शयनमंदीरांतून वाहेर आले नाहींत ? युवराजांना मंगलस्नान घालून, आईच्या प्रेमाची काळी तिट सुद्धां कौसल्यामातेनें लाविली आहे. सर्व पौरजन युवराजदर्शनाची चातक-पक्षाप्रमाणें द्वारीं वाट पहात आहेत. या आनंदाच्या वेळीं सरकारस्वारी कोठेंच दिसत नाहीं, म्हणून पौरजन हिरमुसले झाले आहेत. अरे, हे हुंदके कोणाचे ? ही सरकारस्वारीच कां ? ( कानोसा घेऊन ) कांहीं तरी घात दिसतो आहे. एकदम हिय्या करून दार उघडून आंत गेलेंच पाहिजे. ( आंत प्रवेश करतो. दशरथ, 'सुमंत,' 'सुमंत,' करून मूर्च्छित होतो. सुमंत सावध करतो )

**सुमंतः**—महाराज, सावध व्हा, सावध व्हा. या मंगलप्रसंगीं हें काय ?

**दशरथः**—( मिठी मारून ) सुमंता, सूर्यवंशावर आकाशाची कुऱ्हाड कोसळली रे.

**सुमंतः**—महाराज, याचा अर्थ मी काय समजूं ?

**दशरथः**—रामा, रामचंद्रा,—सुमंत, या वेळेस कांहीं एक विचारूं नकोस. तावडतोब जा; आणि बाळा रामाला बोलाविलें म्हणून सांग.

**सुमंतः**—महाराज, युवराजांना आज तसदी कशाला ? आम्हीं आपल्या सेवेला तयार आहों. या सुमंताकडून आपली सेवा होणार नाहीं, असें कां आपल्याला वाटतें ? सरकार, हा प्रकार काय आहे, तें कांहींच कळत नाहीं.

**दशरथः**—सुमंत, जा तुम्हीं तावडतोब. तुमच्या हातून माझ्या दुःखाच्या वेदना कमी होणार नाहींत. जा आधीं रामाच्या दर्शनाशिवाय मला बिलकूल आराम वाटणार नाहीं. रामराया, मला पिता होण्याचें सद्भाग्य तूं कशालारे दिलेंस !

**सुमंतः**—मी युवराजांना तावडतोब घेऊन येतों. तोंपर्यंत, महाराज, आपण मन स्वस्थ असूं द्यावें. येतों मी लवकर. ( जातां जातां—स्वगत ) मी बाहेर तरी कसा पडूं ? राजद्वारापाशीं जमलेल्या पौरजनांनीं विचारल्यास मी त्यांस काय सांगूं ? माझ्या मनाची चलबिचल पाहून त्यांच्यामध्यें कितीतरी गोंधळ उडून जाणार आहे. खरोखर ही सेवाधर्माची कसोटी आहे. ( जातो. )

**दशरथः**—दैवाची लीला अघटित आहे. काल संध्याकाळपर्यंत या संकटाची कल्पना तरी होती का ? पौरजनांमध्यें केवढा हलकल्लोळ उडणार आहे. राणीवशांत काय गोंधळ होईल याची कल्पनासुद्धां करवत नाहीं. रामराजाच्या कोमल मनाला केवढा धक्का बसणार आहे. दशरथा, म्हातारपणीं तुझ्या आयुष्याचे असे कां वरें धिंडवडे निघावेत ? नको, नको. सुखाची हांव दुःखमूलक असते. आनंदाचा अतिरेक म्हणजेच दुःखपरंपरेच्या विषवल्लीचें पीक. राघवा, मी तुला काय सांगूं ? तो माझा सुकुमार माझ्यासमोर उभा राहतांच, माझी वाचा बंद झाली तर किती बरें होईल. अजून कां बरें राजा येत नाहीं ? माझा बाळ सुखरूप आहे ना ? अतिशय कष्ट करून वाढवलेल्या सुंदर रोपट्यास, पहिल्याच पुष्पाचें हास्य पाहतांच, बागवानानें आपल्याच हातांनीं त्यावर रखरखलेला निखारा ठेवावा, त्याप्रमाणें हा सर्व प्रकार झाला आहे. आला वाटतें हा. हो त्याचींच पावलें हीं. रामा, रामा, रघुराया—( मूर्च्छित पडतो. ) ( राम बावरलेला प्रवेश करतो. )

**रामः**—आज काय हा प्रकार आहे? आज राज्याभिषेकाचा दिवस ना? आज आनंदाचा दिवस; मग या मंगल दिवशीं हें मंदीर अरण्यासारखें भयाण कां दिसतें? कां सर्वरात्र झोंप न लागल्यामुळें ही उद्विग्नता आलेली आहे? काल संध्याकाळीं, रात्र झाली तरीसुद्धां, माझे लाडके संवगडी माझ्याशीं खेळत होते. आई नको नको ह्मणत असतांना सुद्धां, कांहींजण घरीं न जातां राजवाड्यांतच निजले. त्यांनीं माझी किती प्रकारांनीं थट्टा केली? एकानें ह्मणावें, "रामा, राजा झाल्यावर आम्हांला विसरूं नको हो; नाहींतर सर्व विसरून जाऊन होशील उमट," दुसऱ्यानें ह्मणावें, "रामा, आपला राजा राजा खेळ विसरूं नको हो; राजा झाल्यावर, खेळांतील प्रधानाला आणि सेनापतीला त्याच पदांवर चढवीन, असें ह्मणाला होतास. आहेना लक्षांत?" अशा अनेक गोष्टींची त्यांनीं मला आठवण दिली. मला झोंप लागली असेल; पण ते मात्र सर्व रात्र जागे होते. मी उठण्याच्या पूर्वींच ते हांकाहांक करूं लागले. आईनें मला उठविलें. मुखमार्जन झाल्यानंतर, आईनें व इतर स्त्रियांनीं माझ्या अंगाला सुवासिक उटणें लावून, वाद्यांच्या मंजुल ध्वनींत, मला मंगल स्नान घातलें. स्नान आटोपतांच गंध लावून देवता व गुरुजन यांस पितांबरानेंच नमस्कार करीत असतां, आईनें मटामट मुके घेतले. तिच्या डोळ्यांतून आनंदाश्रु घळघळां वाहूं लागले. कोणाचीही दृष्ट लागूं नये म्हणून माझ्या गालांवर तिनें काळी तिट लावली. प्रेमानें हृदयाशीं धरून, तिनें मला आपल्या मांडीवर बसविलें. माझ्या तोंडांत साखरेची चिमूट घालून, माझा प्रेमानें मुका घेणार, इतक्यांत सुमंत घाईघाईनें आले; व मला महाराजांनीं आत्तांच्या आत्तां बोलाविलें आहे ह्मणून निरोप दिला. आई घाबरून गेली. तिला एकदम रडें कोसळलें. जिकडे तिकडे गोंधळ उडून गेला. सर्वजण नाना तऱ्हेचे तर्क चालवूं लागले. मी तसाच इकडे धांवत निघालों. शयन मंदिरांत येतांच कैकेयी मातोश्रीचें स्वरूप मला भयंकर दिसूं लागलें. नेहमींप्रमाणें मातोश्रीच्या पायांवर मस्तक ठेवून मी तिला प्रणाम केला. तिनें मला लाथेनें दूर लोटलें. पुन्हा प्रणाम केला; व महाराजांच्या दर्शनाकरितां येथें आलों. परंतु, हें काय? महाराज अस्ताव्यस्त पडले आहेत (धांवत जातो. 'बाबा'

'बाबा' ह्मणून हांक मारूं लागतो. दशरथ सावध होतो. रामाच्या मुखाकडे पाहून पुन्हां मूर्च्छित होतो. )

**रामः**—बाबा, बाबा, सावध व्हा. मी आलों आहें. मला तुम्हीं बोलावलेंत ना?

**दशरथः**—रामा, कसला मी तुझा बाबा? हंबरणाऱ्या आईपासून ताटातूट करून गोवत्साची हत्या करणारा मी कसाई आहें.

**रामः**—बाबा, असें काय आपल्या हातून झालें?

**दशरथः**—काय सांगूं बाळा? तुझ्या त्या दुष्ट कैकेयी मातेनें, त्या चांडाळणीनें माझ्या जवळून वचन घेऊन मला काळ्याकुट्ट अंधारांत लोटून दिलें.

**रामः**—तात, कसलें वचन तें? आपल्या जीवाला अपाय होईल, असें कां त्या वचनांत कांहीं आहे? तात, आपलें वचन भंग होईल, अशा संकटाची कां आपल्याला भीति वाटते? बाबा, मी लहान आहें खरा; परंतु माझ्यावर आज आपण राज्याची सर्व जबाबदारी टाकणार आहां. आपल्याला होणारे क्लेश जर मला दूर करतां येत नाहींत, तर जबाबदारी शिरावर घेण्यांत काय अर्थ आहे? बाबा, या शुभ प्रसंगीं तुमच्या मनाला दुःख देऊन, मातोश्रीनें असा दावा कां बरें साधला? तात, माझ्या हातून कांहीं प्रमाद घडला कां? तात, आपण दिलेलें वचन येवढें उग्र आहे कां? तात, हा दाशरथी राम, गुरुजनांचा कधींच उपमर्द करीत नाहीं. गुरुजनांच्या आज्ञेचें पालन करणें, हाच धडा माझ्या परमपूज्य गुरुजीनें शिकविला आहे. असें असतां तात, आपण येवढा शोक कां करितां?

**दशरथः**—(स्वगत) माझ्या मुखांतून निघणाऱ्या विषारी शद्बांबरोबर या बाळाची काय बरें स्थिती होईल!

**रामः**—बाबा, सांगा, मला संशयांत टाकून, आपल्या अंतःकरणाचे क्लेश तीव्र करूं नका.

**दशरथः**—बाळा, आज तुझा राज्याभिषेक—

**रामः**—होय, तात, मी त्याच आनंदांत आहें. आई, गुरु, सर्व पौरजन त्याच आनंदांत आहेत.

**दशरथः**—त्याच आनंदांत मी आज विष कालवणार आहें. बाळा, आज तुला राज्याभिषेक होत नाहीं.

**रामः**—बाबा, आपल्याला क्लेश होत असतील, आपल्या प्रकृतीस अस्वास्थ्य वाटत असेल, तर आजचा समारंभ तहकूब ठेवा. सर्वांचा हिरमोड झाला, तरी हरकत नाहीं; परंतु आपल्या प्रकृतीस आराम वाटेल ना?

**दशरथः**—( स्वगत ) या कोंवळ्या सरळ मनाची समजूत कशी करूं? ( उघड ) बाळ, माझ्या प्रकृतीस कांहीं झालें नाहीं बरें तुला राज्याभिषेक होत नाहीं; कारण तुझ्या कैकेयी मातोश्रीची तशी इच्छा आहे.

**रामः**—बाबा, राज्याभिषेकाची मला येवढी उत्सुकता नाहीं; पण माझ्या हातून मातोश्रीचा कांहीं प्रमाद घडला कां? तसें झालें असेल, तर गुरुजनांचा उपमर्द हा अक्षम्य गुन्हा माझ्या हातून घडला.

**दशरथः**—राया, तसें कांहीं झालें नाहीं. जीवमात्रामध्यें जो स्वार्थ असतो, तो बाहेर पडूं लागला म्हणजे द्वेषामत्सराचे विषारी उच्छ्वास पसरूं लागतात. त्या विषारी वाफाऱ्यांत मग जें जें सांपडेल, तें तें विकृत केल्याशिवाय, तो स्वार्थ माघार घेत नाहीं. तुला राज्याभिषेक होऊन, तूं राज्यवैभव भोगणार हें कैकेयीला पाहवलें नाहीं, तूं राज्यावर बसतां कामा नये; आणि सर्व राज्य तिच्या भरताला मिळावें, असें तिनें माझ्याजवळून वचन घेतलें.

**रामः**—तात, मग यांत वाईट तें काय आहे?

**दशरथः**—बाळा, तुला राज्याभिषेक होत नाहीं, ह्मणून वाईट वाटतें.

**रामः**—बाबा, यांत वाईट वाटण्याजोगें काय आहे ? भरत काय किंवा राम काय आपलींच बालकें ना ? कौसल्या, सुमित्रा, कैकेयी आह्मांला सारख्याच पूज्यमाता आहेत ना ? राम, लक्ष्मण, भरत, शत्रुघ्न या भावांमध्यें कधींतरी अंतर पडलें आहे कां ? मग कैकेयी मातोश्रीच्या इच्छेप्रमाणें भरताला राज्यपद मिळालें तर आह्मांला आनंद नाहीं कां होणार ? बाबा, मी राजा झालों काय, किंवा भरत राजा झाला काय, प्रजाजनांच्या हिताची जबाबदारी आह्मां सर्वांवर सारखीच नाहीं कां ? भरतास राज्यपद द्या; मी मोठ्या आनंदानें त्याची सेवा करीन. आमच्या मध्यें येवढा बंधुभाव आहे कीं, राम किंवा भरत यांमध्यें प्रजाजनांना तिळमात्र अंतर वाटणार नाहीं.

**दशरथः**—बाळा, तें सुखसुद्धां तुला न मिळूं देण्याची तुझ्या त्या दुष्ट मातोश्रीनें खबरदारी घेतली आहे.

**रामः**—ह्मणजे, बाबा, माझ्या भावाची मला सेवा सुद्धांकरतां येणार नाहीं ? त्याचें दर्शनसुद्धां मला मिळणार नाहीं कां ?

**दशरथः**—राम, भरतानें राज्यपद घेतल्यावर, तूं, तुझी आई किंवा तुझ्या पक्षाचे लोक कदाचित् कांहीं कारस्थानें करतील, या भीतीनें तिनें आणखी एक कट रचला आहे. तूं राज्यांत न रहातां, बारा वर्षें वनवासास जावें. न जाणों तितक्या अवधींत तूं निराळें राज्य स्थापून भरताचें राज्य हिरावून घेशील. तसें होऊं नये ह्मणून, तुला या राज्यांतील कांहीं एक वस्तू नेतां येत नाहीं. तूं वल्कलें परिधान करून वनांत गेलें पाहिजे. रामराया, ही छळाची परमावधी नाहीं कां ?

**रामः**—( पित्याच्या चरणीं मस्तक ठेवतो ) जगन्नियंत्या प्रभु, पित्याचा वचनभंग न करतां, मातोश्रीची इच्छा न मोडतां, त्यांना आनंद होईल अशी सेवा करण्यास मला सामर्थ्य दे कोणतेही कठोर विचार माझ्या मनाला शिवूं देऊं नकोस. माझें कर्तव्य मी बजावित असतां, माझा मार्ग मला

सदोदीत दाखवित जा, हीच तुला प्रार्थना आहे. (उघड) बाबा, माझ्या परमपूज्य मातोश्रीची आज्ञा मी मोठ्या आनंदानें स्वीकारतों. आपण वचनानें बद्ध झालेले आहां; मी मातृ-आज्ञेचें पालन करण्यास तत्पर आहें. बाबा, मी निघण्याची तयारी करतों. मातेचा व पौरजनांचा निरोप घेऊन, निघण्याच्या वेळेस मी आपल्या दर्शनास येतों. तात, या बालकावर आपला आशीर्वाद असावा. (नमस्कार करतो. राजा त्याला आशीर्वाद देतो. जातो.)

**दशरथः**—बाळा रघुराया, काय नशिबाचा खेळ हा ?

(पडदा पडतो.)

---

## प्रवेश २ रा.

(मतिमंद आणि मतिधीर बोलत बोलत प्रवेश करतात.)

**मतिमंदः**—मतिधीरा, तूं कांहींही म्हण; माझी मात्र छाती फाटायची वेळ आली आहे. डोक्यांत नुसती कल्पना आली कीं डोकें टाकून पळून जावेंसें वाटतें. अर्रर्र, काय ती कल्पना.

**मतिधीरः**—अरे, पण ती कल्पना सांगशील कीं नाहीं ?

**मतिमंदः**—अरे बाबा, ती कल्पना मनांत आली कीं मनाच्या चिंधड्या होतात; आणि जर कां जिभेनें मुखावाटे शब्द बाहेर काढले, तर त्या मुखाच्या चिंधड्या आणि त्या जिभेच्या चिंधड्या-अर्रर्र, काय भयंकर कल्पना !

**मतिधीरः**—अरे शहाण्या, पण काय आहे, तें सांगशील कीं नाहीं ?

**मतिमंद**:—नकोरे बाबा, तूं तें ऐकलेंस आणि तुझ्या मनाच्या चिंधड्या झाल्या; आणि मग, आपण दोघेही चिंधड्या मनाचे झालों-अर्रर्र, काय भयंकर कल्पना !

**मतिधीरः**—मतिमंदा, हें पहा, 'अर्रर्र भयंकर कल्पना; भयंकर कल्पना,' असें एकसारखें बडबडत बसलास, तर मी येथें बिलकूल थांबणार नाहीं.

**मतिमंद**:—आणि तुझें मन–तें चिंधड्या उडालेलं तुझें मन–आणि तें मन घेऊन तूं चार चौघांत गेलास–अर्रर्र, काय भयंकर कल्पना !

**मतिधीरः**—चल, दूर हो. मला वेळ नाहीं तुझी ती बडबड ऐकायला. घाबरत घाबरत माझ्याकडे आलास, तेव्हां काय भानगड आहे हें पहावें, म्हणून तुझ्या बरोबर बाहेर पडलों; तर तुझें आपलें, 'अर्रर्र, भयंकर कल्पना,' हेंच चाललें आहे. काय आहे तें नीट सांगत असलास, तर थांबतों; नाहींतर तुझें तें गाढवासारखें ओरडणें ऐकायला मला वेळ नाहीं. ( निघून जाऊं लागतो. मतिमंद त्याच्या हाताला ओळखंबितो )

**मतिमंद**:—अर्रर्र, तुझ्या हाताला मी असा ओळखंबिलों आहें; आणि तूं मला फरफटत ओढीत नेत आहेस अशा स्थितींत, वात्रट पोरांनीं शेपटीला कांहींतरी बांधलेला गाढव पळतो आहे, असें जर कां दुरून चार चौघांना वाटलें, तर–अर्रर्र, भयंकर कल्पना !

**मतिधीरः**—( त्याला लाथांनीं लोटून देतो. तो पायाला बिलगतो ) चल, चालता हो. मला जाऊं दे.

**मतिमंद**:—आणि जर कां त्या शेपटीला बांधलेल्या कांहींतरीवर अशा लाथा झाडतांना चारचौघांनीं पाहिलं, म्हणजे–अर्रर्र, भयंकर कल्पना ! ( धक्काबुक्की करून, मतिधीर लोटून निघून जातो. )

**मतिमंद**:—( त्याच्या मागोमाग जाऊन ) अरे मतिधीरा, असें काय करतोस! संकटकालीं मित्राला साहाय्य करण्याचें नाकारतोस ?

**मतिधीरः**—तुझें काय संकट आहे तें सांगशील कीं नाहीं आधीं ?

**मतिमंदः**—बरें झालें, तूं आलास परत; नाहीं तर-तूं लाथा झाडीत पळतो आहेस, आणि मी एक फेरगा तुझ्या मागें लागलों आहे-हा देखावा—भयंकर कल्पना ! (मतिधीर झिडकारून निघून जातो. आंत जाऊन त्याल घेऊन येतो) असें काय करतोस, सुहृदा, तुझें साहाय्य मागावयाचें आणि तुला सुद्धां वेळींच जागें करावें, ही तर माझी कल्पना.

**मतिधीरः**—मग यांत येवढें चिंधड्या उडवून देणारें भयंकर काय आहे ?

**मतिमंदः**—मित्रा, एकादा मोची जवळ असला, म्हणजे मला सर्व कांहीं विनधोक सांगतां येईल.

**मतिधीरः**—कोण? मोची ? आणि तो कशाला ?

**मतिमंदः**—अरे, मोची, चामडें शिवणारा. तो जवळ असला म्हणजे दोघानांहीं भीति नाहीं.

**मतिधीरः**—म्हणजे ?

**मतिमंदः**—मतिधीरा, तूं मतिमंद आहेस. अरे, तुला माझें भयंकर संकट सांगूं लागलों; आणि सांगतां सांगतां माझी छाती फाटून गेली, अगर मनाच्या चिंधड्या झाल्या, तर मग गोष्ट ऐकण्याची तुझी उत्सुकता जिरून नाहीं का जाणार ?

**मतिधीरः**—बरें मग ? मोची काय करणार त्या ठिकाणीं ?

**मतिमंदः**—अरे गाढवा, मोची जवळ असला, म्हणजे फाटलेल्या छातीला किंवा पिंजलेल्या मनाला वादीनें टांके मारून तो रफू नाहीं का करणार ? बरें, असें एकदां झालें, म्हणजे माझें काम सुरळीत पुढें चालेल, समजलास मतिधीरा; या मतिमंदाला पुढचा विचार असा मंदमंद करावा लागतो.

**मतिधीरः**—कमाल आहे तुझ्या मंदमतीची. बरं, पण तुझी गोष्ट? तें संकट कसलं?

**मतिमंदः**—होय, असा बैस खालीं. तुझें तें उत्तरीय दे पाहूं. ( तें छातीभोंवतीं व गळ्याभोंवतीं गुंडाळतो )

**मतिधीरः**—अरे, हें काय? फांस लावून घेतोस काय?

**मतिमंदः**—मतिधीरा, तुला पोंच नाहीं. अरे बाबा, माझ्या तोंडाच्या चिंधड्या शब्दाच्या वाटे छातीला ऐकूं जातां कामा नये; आणि छाती फाटली, तर ती तोंडाला दिसतां कामा नये, झणून ही अशी खबरदारी घ्यावी लागते. ( मतिधीर हात जोडतो )

**मतिमंदः**—( स्वतःकडे पाहून ) काय रे, माझ्यांत कांहीं फरक दिसतो आहे तुला?

**मतिधीरः**—नाहीं बुवा, कां?

**मतिमंदः**—नाहीं, झटलें, मला नमस्कार केलास. मला वाटलें कीं, छाती फाटणार या भीतीनें हृदयांतील परमेश्वर बाहेर पडला. ( मतिधीर हंसतो ) अरे, हंसतोस काय?

**मतिधीरः**—अरे शंखा, तुझी गोष्ट विसरलास वाटतें?

**मतिमंदः**—होय; गोष्ट तुला सांगायची आहे. अरे मित्रा, काय सांगूं तुला?

**मतिधीरः**—मला रे काय माहित काय सांगणार आहेस तूं तें?

**मतिमंतः**—काल पालटत चालला आहे.

**मतिधीरः**—बरें, मग?

**मतिमंदः**—काल होतें, तें आज नाहीं; आणि उद्यां काय असणार, तें आज सांगतां येत नाहीं. हं ( उसासा टाकतो ).

**मतिधीरः**—अरे, तुझें काय नुकसान झालें त्यांत?

**मतिमंदः**—सर्वच मनु पालटत चालला आहे. मोठी आपत्तीची वेळ आहे. मतिधीरा, तुझें माझें कसें होणार रे!

**मतिधीरः**— ह्मणजे काय?

**मतिमंदः**—या डोक्याची मला कींव येते. काय सांगूं, मित्रा, तूं अगदीं जिव्हाळ्याचा मित्र ह्मणून सांगतों. मेंदु दडवून ठेवणारी ही कवटी, अतिशय सहनशील आहे. हें बेसुमार उगवणारें केसांचें रान ती बिचारी बिनबोभाट सहन करते. मनुष्यप्राण्याच्या नखऱ्याची मिजास तिनें निमूटपणें सहन करावी. त्यानें मुकुट घालावा, पागोटें ठांसावें, फेटा लपेटावा, टोपी अडकवावी पण या कवटीनें हूं कां चूं करूं नये.

**मतिधीरः**—तुझ्या संकटाशीं याचा संबंध काय?

**मतिमंदः**—मतिधीरा, असा अधीर होऊं नकोस. सर्व कांहीं सांगतों. आज जो मी एवढा छातीचा कोट केला आहे, तें सर्व, मित्रा, तुला माझें संकट निवेदन करण्यासाठींच. तुला सांगितलेंच कीं, मनु पालटत चालला आहे. अरे जिवलगा, काय सांगूं तुला? अर्रर्र, काय भयंकर कल्पना?

**मतिधीरः**—अरे कर्मा, आला पुन्हां ह्याला वायूचा झटका. लवकरच उपाय केला पाहिजे. हं, मतिमंदा, काय सांगायचें तें लवकर सांग. नाहीं तर हा मी चाललों. (उठून जाऊं लागतो).

**मतिमंदः**—असें काय करतोस, मित्रा? तुझ्याशिवाय् मी कोणाला माझें दुःख सांगणार-? (मतिधीर खालीं बसतो) काय सांगूं तुला, या डोक्याची हृदयद्रावक कहाणी? अरे, हल्लींच्या काळांत बायका पुरुषांच्या 'डोक्यावर बसूं लागल्या आहेत'-या कल्पनेनें माझी छाती फाटून जाते आहे. हें मी ऐकलें, तेव्हांपासून मी किती खबरदारी घेतों आहे. कोठेंही एकादी

बाई दिसली कीं असा डोक्यावर 'हात ठेवतों.' तेवढ्यानेंही जर भागत नाहीं असें वाटलें, तर कोठें तरी उंचावर जाऊन उभा राहतों, आणि असे हातवारे करून, पाय सारखे उडवीत, प्रतिपक्षाला आपलें तोंड दिसणार नाहीं, आणि आपल्यालाही शत्रुचें स्वरूप दिसणार नाहीं, असें करून टाकतों. शत्रु जर धीटाईनें अंगावर चाल करून आला तर, त्याला पायांच्या बुंधाचा किंवा हातांच्या फांद्यांचा वर चढायला आधार मिळणार नाहीं, येवढी खबरदारी घेतों. येवढें सगळें करून नशिबानेंच हात दिला नाहीं; मग काय? मित्रा, तिला शरण कीरे जातों. (रडूं लागतो) हात जोडून तिची प्रार्थना करतों, "आई जगदंबे, मी तुला शिर साष्टांग नमस्कार घालतों. माझें हें शिरकमल या शितला देवीच्या पायावर वहातों. मी ही मालमत्ता तुझ्या नांवें करून देतों. तुला मी हा देह देऊन टाकतों, पण माझा जीव सोडून दे." अशी प्रार्थना करून, डोक्याची शुद्ध न ठेवतां, मुठींत प्राण घेऊन निसटून जातों.

**मतिधीरः**—मित्रा, तूं बायकांना भितोस?

**मतिमंदः**—तसा मी घाबरत नाहीं. पण मी नुकतेंच ऐकलें आहे, कीं बायका नुसत्या 'डोक्यावर चढून' थांबत नाहींत. अरे त्या वेळ अवेळ न पहातां, बेलाशक 'डोक्यावर मिरीं वाटतात'!!! काय शिरजोरपणा हा! मित्रा, त्या बयेचें ओझें सहन करून, वरती त्या दगडा धोंड्याच्या पाटा-वरवंट्याचें ओझें सहन करायचें! तिनें खुशाल 'डोक्यांत घाव घालावेत' मग त्या बिचाऱ्यानें कितीही 'डोकें फोडून घेतलें,' तरी ही जगदंबा महेशाच्या डोक्यावरील जान्हवीप्रमाणें स्थिर. मित्रा, एकाद्यानें आपला जटाभार निर्मूल उतरलेला असावा; भर ग्रीष्म ऋतूंतील सूर्याचा दाह होत असतां, तो शिरस्त्राण जरा कोठें दूर करतो आहे, तोंच त्याच्या अर्धांगीनें डोक्यावर चढून त्या प्रान्ताचा निखालस तावा घ्यावा; त्याच्या 'टाळूवरील लोणी खाऊन', वर आणखी मिरे वाटावे; काय त्याची अवस्था होईल! भयंकर कल्पना!

**मतिधीरः**—पण, हें चित्र आतां कां तुझ्या डोळ्यांसमोर आलें?

**मतिमंद.**—काय सांगूं तुला ? बाबा, अयोध्या नगरींत केवढा हाहा:कार उडालेला आहे. इकडे ये तुझ्या कानांत सांगतों. (कानांत सांगतो.) समजलास ? मग प्रजेनें काय करावें ? राज्याचा शास्ता जर दुबळा झाला, तर तुझी माझी काय कथा ! दशरथ महाराज कमी कां बलाढ्य आहेत ! पण कांहीं नाहीं. पाल दिसली कीं विंचवानें टाकलीच आपली नांगी खालीं.

**मतिधीर:**—त्याला कारणें असतात.

**मतिमंद:**—अरे गंभीर पुरुषा, कसलीं कारणें घेऊन बसलास ? पुरुष, आपण पुरुष आहोंत, हें आयत्या वेळीं विसरतात; आणि बायकांना, आपल्या स्त्रैणपणाचा विसर पडतो.

**मतिधीर:**—असें कां म्हणतोस ?

**मतिमंद:**—नाहीं तर, दशरथ महाराजांनीं केवळ कैकेयीच्या लहरी-करतां, हजारों पौरजनांचीं मनें कां बरें दुखवलीं ? आपल्या हजारों एक-वटलेल्या मनांचा ढीग, त्या बाईच्या एकट्या मनापुढें कांहींच कां नाहीं ? कांहीं नाहीं; हा पुरुष जातीचा ऱ्हास होत चालला आहे.

**मतिधीर:**—मग याला उपाय काय ?

**मतिमंद:**—आहे; या मतिमंदानें त्याही दिशेनें विचार केलेला आहे. उपाय दोन प्रकारचे आहेत,–एक प्रतिबंधक आणि दुसरा निवारक. पहिला उपाय आपण दुबळे होण्याच्या पूर्वीं करायचा; दुसरा उपाय, रोग जडल्यावर करायचा. तुला कोणता उपाय सांगूं ? सध्यां तुझी प्रकृती कशी काय आहे !

**मतिधीर:**—मला आपले दोन्हीं उपाय सांगून ठेव.

**मतिमंद:**—तुला दोन्हीं बाजूंनीं त्रास होतो आहे वाटतें ? असो. तुला प्रथम निवारक उपाय सांगतों. आपलें डोकें संगमरवरी दगडासारखें गुळगुळीत करून ठेवायचें; इतकें कीं चढणाराचे पाय आपल्या डोक्यावर थरतां कामा नये. हिय्या करून एकादी स्त्री जात वर चढलीच, तर पाय

घसरून तिचें थोबाड फुटलेंच पाहिजे. अथवा, आपलें डोकें इतकें संतप्त करायचें कीं, चढणाराचे पाय होरपळून निघाले पाहिजेत. समजा बाई तशीच वर चढली आणि मिरीं वाटायला सुरवात करूं लागली, म्हणजे आपल्या डोक्याची भट्टी इतकी धगधगीत करायची कीं, मिऱ्याच्या दाण्यांची राख-रांगोळी झाली पाहिजे. या उपायानें पुष्कळ निवारण होतें. आतां राहिला प्रतिबंधक उपाय. हा उपाय विशेष अचूक आहे. पुरुष जातीला पावलों-पावलीं नमतें घ्यावें लागतें, ही अवनतीची वाट आहे. यावर उपाय फार मुत्सद्देगिरीनें शोधून काढला आहे. मुत्सद्दी नेहमीं अशा खुबीनें वागतो कीं, शत्रुचा शत्रुपणाच नाहींसा करतो. शत्रुच उरला नाहीं, मग कसली रे भीति? भीति नाहींशी झाली म्हणजे खुशाल उजळ माथ्यानें फिरावें. ऐक मुत्सद्दी उपाय कसा आहे तो. हल्लीं दोन जाती आहेत. एक पुरुष जात व दुसरी स्त्री जात. पहिला वर्ग होत चालला आहे कमकुवत आणि स्त्री जात होत चाललेली आहे प्रबळ. दोन जातींचे बनलेले आहेत दोन पक्ष. जगाच्या रणांगणांत या दोन्ही पक्षांचा लढा आतां रंगांत येणार आहे. रणांगणावर आपण रंगरूप पाहूनच वागलें पाहिजे. आपण रंग आणि रूप पाहावें; आणि मोठ्या मुत्सद्दे-गिरीनें आपली जात बदलून टाकावी.

**मतिधीरः**—(घाबरून) म्हणजे? तूं आम्हांला बायका व्हायला सांगणार वाटतं? छे, छे; काय भयंकर कल्पना?

**मतिमंदः**—भयं-कर कल्पना–खरें ना? अरे बेटा, घाबरूं नकोस, मी तुझ्याच पक्षांतील जवान आहे. हा दुसरा उपाय फार मुत्सद्देगिरीचा आहे. अरे, तुलाच काय, पण एकदम कोणालाही पटणार नाहीं.

**मतिधीरः**—एकदमच नाहीं, तर केव्हांही पटणार नाहीं.

**मतिमंदः**—नाहीं तर, भोगा आपल्या कर्माचीं फळें. याचा परिणाम आणखी काय वाईट होणार आहे, ठाऊक आहे कां?

**मतिधीरः**— काय बुवा?

मतिमंद:—हं, मग समजेल. अरे बाबा, अशा दुर्वेत जन्मलेली पोरें, तीं सुद्धां डोक्यावर चढतात. मग तूं येवढा पसारा डोक्यावर कसा सहन करणार? अरे गड्या, 'डोकें ठिकाणावर राहाणार' नाहीं, बरं कां?

मतिधीर:—मग कोठें जाईल?

मतिमंद:—जाईल कोठें तरी फिरून. आतां पहा. कैकेयीच्या हट्टाकरितां, दशरथ राजा आपल्या पोटच्या गोळ्याला हद्दपार करतो. दशरथ राजाला बायका तीन, पण जी डोक्यावर बसली, तिच्या पुढें हा बसलाच 'डोकें खालीं ठेवून.' अशा दुबळ्या बापाचा मुलगा थोडाच पुरुषी बाण्याचा निघणार आहे! त्या पोरानें—त्या रामानें—'बरें, आपली आज्ञा,' म्हणून तुकवली कीं नाहीं मान? आईचा पगडा ज्यास्त बसला. येवढें करून थांवलें आहे कां? त्याचा भाऊ तो लक्ष्मण तोच हट्ट धरून बसला आहे. दोन्ही कर्ते सवरते मुलगे, त्या बयेच्या पायीं लागले कीं नाहीं देशोधडीला? एका शिरजोर बायकोमुळें, नवरा झाला लंपट, पोरें निघालीं भिकमार्गीं, आणि सर्व कुटुंबाची धुळधाण झाली. मुलगी जायची स्त्री जातीच्या वळणावर, मुलगा बापाच्या दुबळेपणांत सामील व्हायचा; आणि हे सर्वजण वळणें खात खात, कोठें तरी उलथून शेवटीं एकाद्या खड्यांत पडायचे. राजाची ही दशा, तर तुमची आमची काय स्थिती होईल?

मतिधीर:—आपत्ती आहे मोठी. काय रे मित्रा, आतां कसें करायचें?

मतिमंद:—तोच विचार करतों आहे. (सुचल्या सारखें करून) असें केलें पाहिजे. मीं शोधून काढलेल्या उपायांचा जेवढा प्रसार होईल, तेवढा एक सारखा प्रयत्न चालूं ठेवला पाहिजे. या उपायांचें महत्व ज्यांच्या पूर्ण डोक्यांत शिरलें आहे, आणि या भयंकर कल्पनेनें ज्यांचीं 'डोकीं भणाणून' गेलीं आहेत, अशा पुरुषांचें साहाय्य घेऊन एक संघटित प्रयत्न सुरू केला पाहिजे.

मतिधीर:—परंतु. काय रे, स्त्रीयांना हा कट समजला तर?

**मतिमंदः**—आपण जोराचा विरोध करूं; अगदीं कांहीं जमलें नाहीं, तर मुत्सद्देगिरीनें वागलें पाहिजे. आपल्या जीवावरचें संकट तर गेलें पाहिजे. नाहीं तर, उगाच हेकटपणा करून जीव गमावण्यांत काय अर्थ आहे ?

**मतिधीरः**—तडजोड कशी काय करणार ?

**मतिमंदः**—मित्रा, ठेवल्या आहेत, सर्व गोष्टी मी योजून ठेवल्या आहेत. त्यांनीं निवारक उपायांना हरकत घेतली, तर आपण प्रतिबंधक उपायांचा अवलंब करूं. (मतिधीर आश्चर्यचकित होतो) मग विरुद्ध पक्ष मान्य करीलच. तसें झाल्यानंतर, दोन्ही वर्गामध्यें बिलकूल अंतर न राहतां, आपण सर्व सारख्याच नात्यानें या जगांत कालक्रमण करूं.

**मतिधीरः**— अरे, पण, आपल्याला बायका व्हावें लागेल, त्याचें काय ? अर्रर्र, काय भयंकर कल्पना !

**मतिमंदः**—आहे, भयंकर आहे. हे मुत्सद्देगिरीचे डाव ज्यांना 'डोकें नाहीं,' त्यांना नाहीं एकदम पटायचे.

**मतिधीरः**—नकोरे बाबा; अर्रर्र, काय भयंकर कल्पना !

**मतिमंदः**—मतिधीरा, तुझ्या मतीला थोडा धीर दे. डोकें ठिकाणावर ठेव. बिलकूल फिरूं देऊं नकोस. चल, आपण आपल्या कार्याला लागलें पाहिजे. आपल्या कार्याच्या निशाणावर अर्धनारी नटेश्वराची मूर्ती आपण ठेवूं. म्हणजे आम्हीं तडजोडीला तयार आहोंत, हें अनायासें जाहीर होईल. चला; गोष्टी जोंपर्यंत आटोक्यांत आहेत, तोंपर्यंत काम सुरू केलें पाहिजे.

**मतिधीरः**—अर्रर्र, काय भयंकर कल्पना ! (मतिधीर मोठ्या कष्टानें ओढीत नेतो. दोघेही जातात.)

## प्रवेश ४ था.

( राम वनवासाच्या वेषांत बसलेला आहे. लक्ष्मण हात जोडून उभा आहे. )

**रामः**—लक्ष्मणा, काय तुझा हट्ट हा.

**लक्ष्मणः**—दादा, येवढी नाहीं का कृपा मजवर करणार? आपली आणि माझी ताटातूट झाली, माझ्या जीवाचा राम मजपासून दूर झाला, ह्मणजे अखिल जगांतील प्रकाश नाहींसा झाल्यासारखें होईल. प्रकाशाचा वर्षाव करून तेजानें तळपणारा रविराज, अस्तगिरीच्या खबदडांत कायमचा बसावा, आणि सर्व जीवमात्र जीवनाकरितां तळमळून इहलोक सोडून जावेत,— तशी माझी अवस्था होईल.

**रामः**—बंधो, प्रेमाच्या आधीन होऊन, असा धीर सोडूं नकोस. शेवट गोड होणार आहे, हें लक्षांत ठेव.

**लक्ष्मणः**—प्रभो, भविष्य काळाच्या धुक्यांतून लुकलुकणारा शेवट माझ्या मंद दृष्टीला कसा दिसणार? प्रकाश लोपून गेल्यानंतर धुक्याचा पसारा घनदाट होईल, आणि दृष्टीचा दुबळेपणा वाढत जाईल. मग सर्व जग अंधःकारांत विराम पावेल. प्रभो, प्राणाशिवाय जीव या जड वस्तूंच्या कुडींत एक क्षणभर तरी राहील कां?

**रामः**—लक्ष्मणा, माता, पिता, गुरु, आणि स्वामी, यांना वंदन करून तूं त्यांची मनोभावानें सेवा केलीस, ह्मणजेच तुला आयुष्यांतील आनंद सांपडला. बंधु-प्रेम श्रेष्ठ खरेंच; पण गुरुजनांची सेवा अधिक पुण्यकारक आहे. शिवाय भरत शत्रुघ्न येथें नाहींत. राजाचा वृद्धापकाळ झाला आहे, आणि त्यांतूनही ते माझ्या जाण्यानें मनांत दुःख करीत राहतील. अशा स्थितींत मी वनांत जाणार आहें तुला बरोबर नेलें, ह्मणजे सर्व तऱ्हेनें अयोध्या अनाथ होऊन,

माता, पिता, गुरु आणि प्रजाजन यांना असह्य दुःखांत लोटून दिल्यासारखें होईल. ह्मणून ह्मणतों, लक्ष्मणा, तूं हें वेड सोडून दे.

**लक्ष्मणः**—दादा, आपण नसतांना या निःसत्व जीवाचे हातून काय होणार आहे? जलाचा एकहि बिंदू नसलेल्या पांढऱ्या फटफटीत ढगाप्रमाणें माझी स्थिती होईल. माझ्या हातून असंख्य प्रमाद होतील; आणि सर्वतोंपरी मी ग्रासला जाईन.

**रामः**—लक्ष्मणा, तूं फार अधीर आहेस. आपलें कर्तव्य करीत असतां समान आणि समतोल बुद्धीनें वागलें पाहिजे. तूं मजवर प्रेम करतोस; मजवरच्या प्रेमामुळें, तुला दुःख होईल, हें मला कबूल आहे. पण विवेक करून, धीरानें वागलें पाहिजे. माझ्या पश्चात् तूं सर्वांचें समाधान कर. वृद्ध पित्याची सेवा कर; माता आणि गुरुजन यांची सेवा कर; प्रजेच्या हिताकरितां सदैव दक्षता ठेव. वनवास—काल संपल्यावर मीही येतों आहें.

**लक्ष्मणः**—आपला उपदेश मला शिरसा वंद्य आहे. आपली गोड वाणी मला अमृतासारखी जिवंत करणारी आहे. परंतु आपण नसतांना, माझ्या हातून कार्य होणार नाहीं, अशी मला भीति वाटते. माता, पिता, गुरुजन आणि प्रजा या सर्वांवर माझें प्रेम आहे; त्यांच्या बद्दल माझ्या अंतःकरणांत आदर पूर्णपणें वसत आहे. परंतु हे रघुनाथा, सर्व आदर आणि प्रेम आपल्या ठिकाणीं एकवटलेलें आहे. काया, वाचा आणि मन सर्वस्वीं अर्पण करून, जो आपल्या चरणाचे ठिकाणीं अनुरक्त आहे, त्याला कीर्ति, वैभव आणि प्रापंचिक स्नेहसंबंध यांची काय चाड आहे? दादा, आपली सेवा सदैव करीत रहावें, हाच माझा आनंद आहे. आपलीं चरण कमलें ज्या ठिकाणीं असतील, तेंच ठिकाण माझ्या आनंदाचें मंदीर आहे. ज्या ठिकाणीं या दीनबंधोच्या मुखचंद्राचा शीतल प्रकाश नाहीं, त्या ठिकाणीं प्रपंचाच्या दाहामुळें जीवमात्र व्याकुळ होतील. दादा, आपल्या पायांपासून या धाकट्या भावाला दूर लोटूं नका.

**रामः**—( स्वगत ) काय करावें याच्या हट्टाला. यानें मला मोठ्या पेंचांत पाडलें आहे. याच्या प्रेमळ मनाची कशानेंही समजूत होणार नाहीं. ( उघड ) वरें लक्ष्मणा, असें कर; सुमित्रा मातेकडे जा; आणि त्यांची परवानगी घे.

**लक्ष्मणः**—पण- आईनें 'नको जाऊं' ह्मटलें तर?

**रामः**—मग तुला माझ्यावरोवर येतां येणार नाहीं.

**लक्ष्मणः**—पण तुमची परवागी आहे ना?

**रामः**—माझी परवानगी आहे; परंतु सुमित्रा मातेच्या इच्छेविरुद्ध वागणार नाहीं. जा, त्यांची सम्मती घेऊन ये.

**लक्ष्मणः**—( स्वगत ) रामरायाची परवानगी आहे, असें समजतांच आई मुळींच हरकत घेणार नाहीं. ( जातो )

**रामः**—सीतेची समजूत घालण्याचा पुष्कळ प्रयत्न केला, परंतु तिनेंही आपला हट्ट शेवटपर्यंत सोडला नाहीं. वनवासांतील हालअपेष्टांचें भयंकर चित्र पुष्कळांनीं तिच्या पुढें रेखाटलें, परंतु तिनें आपला निश्चय बिलकूल ढळूं दिला नाहीं. अखेरीस तिला चल ह्मणून सांगावें लागलें. लक्ष्मणसुद्धां आपला हट्ट सोडीत नाहींच. त्याला तर माझ्या सहवासाचें अतिशय वेड लागलें आहे. असूं द्या दोघेही वरोवर असूं द्या. या प्रेमळ जीवांच्या सहवासांत, माझा वनवास मला अधिक आनंददायक होईल. राजवाड्यांतील राजपुत्राच्या सुखापेक्षां, प्रेमळ आणि कष्टाळु जीवांचें अरण्यवासांतील सुख किती अनुपम आहे, याचें पूर्णज्ञान मला मिळेल. शिवाय तेथील रहिवाशांच्या सान्निध्यांत राहिल्यानें, त्यांच्या सुखदुःखाची मला माहिती होईल. हो. माझा प्रयाण-काल जवळ येत चालला आहे. सर्व तयारी झालेलीच आहे. सीतेनें आपली सर्व तयारी ठेवलेलीच आहे. लक्ष्मणाला सुमित्रामातेनें परवानगी दिली कीं, त्यालाही लवकर तयार होण्यास सांगितलें पाहिजे. सर्व तयारी झाली ह्मणजे

बाबांचा आशीर्वाद घेण्याकरितां, त्यांच्या दर्शनास जाऊं. अरे, पण, सुमंत इकडे कां बरें येत आहेत ? हे आलेच. (सुमंत येतो) सुमंत, काय आज्ञा आहे ? महाराजांच्या प्रकृतीस आराम आहे ना ?

**सुमंतः**—होय युवराज. आपल्या दर्शनाकरितां राजे अगदीं उतावीळ झाले आहेत. ते स्वतःच इकडे येण्यास निघाले आहेत. त्यांनीं सर्व राजवाडे, सर्व मंदिरें धुंडाळून पाहिलीं; पण आपण कोठेंच दिसलां नाहीं. आपल्या वियोगाच्या दुःखामुळें ते अत्यंत व्याकूळ झाले आहेत. पुष्कळ लोक एकसारखे त्यांना भेटण्यास येत आहेत. सांत्वन होण्यापेक्षां महाराजांचें दुःख सारखें वाढत आहे. 'रामा, रामचंद्रा,' असें ओरडत ते वेडयासारखे इकडून तिकडे फिरत आहेत. कौसल्याराणी, सुमित्राराणी, एकसारख्या त्यांच्या जवळ बसून आहेत. आपला शोध करीत मी इकडे आलों. राजवाडयांत आपल्या दर्शनाकरितां कितीतरी गर्दी उसळली आहे. मी जेमतेम वाट काढीत येथपर्यंत आलों. आपली स्वारी येत आहे हें महाराजांस सांगून येतों.

**रामः**—सुमंत, महाराजांस इकडे येण्याची तसदी बिलकूल देऊं नका. मीच तिकडे आलों.

**सुमंतः**—बरें, मी जातों. (जातो)

**रामः**—मला हेंच मोठें कठीण जाणार आहे. भविष्य काळच्या परिस्थितीचें चित्र माझ्या डोळ्यांसमोर उभेंसुद्धां राहात नाहीं; परंतु ही वर्तमान काळाची परिस्थिती अधीक कष्टमय वाटते. सर्व गोष्टींना आनंदानें तोंड दिलेंच पाहिजे. (जाऊं लागतो) अरेरे काय गर्दी ही. (पडद्यांत, 'युवराज, युवराज, जातां जातां आह्मांला एकदां शेवटचें दर्शन घेऊं द्या. आपल्या दर्शनाशिवाय आमचे प्राण जात आहेत हो'') (पडद्याकडे हात जोडून) पौरजनहो, माझ्या मित्रांनों, थांबा, थांबा, असे उतावीळ होऊं नका. तुमचा प्रेमाचा निरोप घेतल्याशिवाय माझें येथून पाऊलही निघणें शक्य नाहीं. शांत रहा, शांत रहा. (स्वगत) माझ्या माता पितरांच्या वियोगापेक्षां, या प्रेमळ जनतेचा वियोगच मला कितीतरी असह्य होणार आहे. (पुन्हा गलबला) खरेंच. राजाला

जनतेच्या प्रेमाखेरीज इतर सुखें तुच्छ नाहीं कां वाटणार? मित्रांनों, तुमच्या या प्रेमाबद्दल मी कसा उतराई होऊं? अरे, द्वाररक्षकांना ते आंवरेनासे झाले. प्रेम, मित्रांनों, खरें खरें तुमचें प्रेम. सोडा, सोडा आंत त्यांना. बिलकूल प्रतिबंध करूं नका.

( चार पांच जण एकदम येतात, आणि रामाच्या पायांवर लोटांगण घालतात. राम त्यांना उठवतो व प्रणाम करतो. )

**१ लाः**—युवराजा, कोण ही निराशा. काल काय वाटत होतें; आणि आज काय अनुभवाला येत आहे !

**२ राः**—रामा, ही अयोध्या नगरी आतां ओस वाटूं लागणार. 'राम,' 'राम' करीत जनता रानोमाळ हिंडून देशत्याग करणार.

**३ राः**—युवराज, सोन्यासारखें घरदार टाकून, उन्हातान्हांतून तुम्हीं रानोरानीं एकटे दुकटे फिरणार ?

**रामाः**—मित्रांनों, तुमच्या प्रेमाची हीच कसोटीची वेळ आहे.

**४ थाः**—रघुनंदना, तुजवरील प्रेमामुळेंच हा वियोग असह्य होत आहे.

**रामः**—मजवर तुमचें प्रेम आहे, खरें ना ? मग मला प्रिय आहे तें नाहीं कां तुम्हीं करणार ?

**सर्वजणः**—रामा, तुझ्याकरितां आम्हीं काय करणार नाहीं ? हे आमचे प्राण तुझ्याकरतां देण्यास आम्हीं सदैव तयार आहोंत.

**रामः**—माझ्या प्रेमळ मित्रांनों, तसें कांहीं वेड्यासारखें करूं नका. वडिलांच्या वचनाकरितां, आणि मातोश्रीच्या आज्ञेकरितां, मला तुम्हांला सोडून गेलें पाहिजे. लक्ष्मणही मजबरोबर येत आहे.

**१ लाः**—होय, कां ?

**रामः**—होय; आणि सीताही येणार आहे.

**२ रा:**—अरेरे, रामा, त्या सुकुमार बालिकेला कशाला हालांत घेऊन जातोस ?

**३ रा:**—काय करणार ? ती बाला रामाशिवाय कशी राहणार ?

**राम:**—राजाचा वृद्धापकाळ आहे, हें तुम्हांला माहीत आहे. माझ्यावरील प्रेम, तुम्हीं राजाच्या मनाला समाधान वाटेल, अशा रीतीनें वागून, व्यक्त करा. त्यांच्या सुखाकडे नेहमीं पहात जा. आज इतकीं वर्षें, त्यांनीं तुमचें पुत्राप्रमाणें पालन केलें; त्याबद्दल उतराई होण्याची हीच वेळ आहे. माझ्या मातापितरांना तुम्हीं सुख दिलेंत, म्हणजे माझें प्रिय केल्यासारखें आहे. समजलांत, ना ? आतां सर्वांना मला भेटूं द्या. ( सर्व जाऊं लागतात. लक्ष्मण वनवासाच्या वेषांत येतो. )

**राम:**—अरे वा, तूं एकदम अगदीं सज्ज होऊन आलास. सुमित्रामातेची परवानगी मिळाली वाटतं ?

**लक्ष्मण:**—दादा, आईनें परवानगी तर दिलीच; आणि शिवाय असेंही बजावून सांगितलें कीं, " बाळा, तुझी आई जानकी आणि पिता राम आहेत, असेंच समज. त्यांच्या बरोबर तूंही वनवासांत जा. त्यांच्या सान्निध्याशिवाय तुझें जगणें व्यर्थ आहे " दादा, आईनें येवढें सांगितल्यावर, मी ताबडतोब पोषाख बदलला; आणि हा वेष धारण करून, आपल्याकडे आलों. दादा, चला; निघायचें ना ?

**राम:**—हो; राजाचें दर्शन घेऊन निरोप घ्यावयाचा आहे. चल तिकडेच जाऊं. ( गलबला ) लक्ष्मणा, या लोकांचा निरोप घेणें फार बिकट झालें आहे. ( चार पांच मुलें धांवत येतात )

**१ लें:**—वा, रामा, चांगली युक्ती काढलीस. आमच्याकडे गम्मत आहे, असें सांगून काल आम्हांला रहायाला बोलाविलेंस; आणि आपण आपला निघून चाललास ?

**२ रें:**—रामा, चांगलें नाटक करतोस ? कोणाला हंसायला लावतोस; कोणाला रडायला लावतोस.

**३ रें**:—आम्हांला मात्र शिकवतोस कीं, आईबापांचें मन कधींही दुखवूं नये; आणि आपण मात्र आपलाच हेका धरून बसतोस.

**राम**:—लाडक्या संवगड्यांनों, तुम्हीं मला शेवटीं गांठलेंतच कां ?

**४ थें**:—वाले, लामा, तांगलें आम्हांला फथवलेंस. काल आपल्यावर लाज्य आलें किनइ ह्मणून आज पलून जातोस. थांब, तुला आम्हीं आतां खेलायलात घेनार नाहीं.

**राम**:—होय; खरेंच रे खरेंच. मी तें विसरून गेलों होतों. मी आल्यावर किनई, तुमचा डाव देईन; मग झालें ना ?

**४ थें**:—तें काइनाइ; आम्हीं तुला थोलनार नाहीं. ( घट्ट मिठी मारतो ) आधीं दाव दे. त्याशिवाय नाइ थोलनार. बोल, देतोस कीं नाइ दाव ?

**राम**:—बाळ, खरेंच मी तुमचा डाव देईन; अगदीं नक्की देईन.

**४ थें**:—अगदीं खलेंच ?

**राम**:—होय, अगदीं खरेंच, मग झालें ?

**४ थें**:—खलेंच देशील ? नाइ, मी थमजलों, तुदा फतवायचा बेत आहे. तें काइ नाइ, मी मुलींच तुला थोलनार नाइ कितीही थांगितलेंस, तरी थोलनार नाइ. ( घट्ट बिलगून बसतो. सुमंत दशरथाला धरून घेऊन येतो. दशरथ राम लक्ष्मण यांना हृदयाशीं धरतो. दोघेही हात जोडून उभे राहतात. )

**दशरथ**:—बाळांनों, अयोध्येचे राजपुत्र या वेषांत बाहेर पडणार ! रत्नखचित सिंहासनावर बसण्याच्या वेळीं, रामा, तूं त्यावर लाथ मारून वनवासास चाललास. रामा, तुमच्या सुखाकरितां, मी हा सर्व व्याप वाढून ठेवला; आतां तेवढाच मला तो या उतार वयांत ताप होणार आहे. माझ्या या

थकलेल्या वयांत, तुमच्या पैकीं कोणाचाच आधार नाहीं. त्या लाडक्या बाळीला—जानकीला—सुद्धां मला आधार ह्मणून ठेवित नाहीं. बाळ, सर्व लोकांनां तुम्हीं आपला केवढा लळा लावलांत? लोकांचे ते आर्त विलाप कानांनीं ऐकवत सुद्धां नाहींत. हीं गोजिरवाणीं पाडसें, आईशिवाय कशीं राहणार? मुलांनों, उद्यां रामलक्ष्मण तुह्मांला नाहीं हो खेळायला मिळणार. तुम्हीं पुष्कळ मोठे झाल्यावर तुह्मांला ते भेटतील, बरें कां?

**रामः**—तात, प्रयाणकालची वेळ निघून जाईल. आपला आशीर्वाद—

**दशरथः**—बाळा, काय आशीर्वाद देऊं! (डोळे निपटतो) सुखी असा. लक्ष्मणाला, त्या बाळीला नीट संभाळ. लक्ष्मणा, तूं दादाला आणि वहिनीला बिलकूल अंतर देऊं नकोस. तुला ते दोघेही आईबापांच्या ठिकाणीं आहेत; त्यांची नेहमीं सेवा करीत जा. रामा, आतां केव्हां भेटणार? आतां कसली भेट! हें पिकलेलें पान लवकरच गळून पडेल झालें. जानकीला नीट संभाळ हो. नीट सलोख्यानें वागा. सर्व रघुकुलाची पुण्याई तुमच्या पाठीमागें आहे. देवाला, गुरुजनांना नमस्कार करा. हा पुत्र—वात्सल्याचा मोह आंवरून धरला पाहिजे. (दोघांचे मुके घेतो) जा, सुमंत, तुम्हीं रथ घेवून यांच्या बरोबर जा. सर्व पौरजनांना यांचें दर्शन घेऊं द्या. माझें तर पाऊलच उचलत नाहीं; कंबर अगदीं खचून गेली आहे. जा, बाळांनों, हा मायापाश तोडणें कठीण आहे. (राम लक्ष्मण मागें पहात पहात जातात) गेलीं, माझ्यापासून माझीं बालकें दूर गेलीं. प्राणा, राम वनवासांत गेले, तरी तूं कां गुटमळत राहिला आहेस! कोणत्या सुखासाठीं तूं या देहांत जीव धरून राहिला आहेस! राम—लक्ष्मण, सीते—रामचंद्रा (मूर्च्छा येऊन पडतो. पडद्यांत गलबला होतो.) (पडदा पडतो)

———

# अंक दुसरा.

## प्रवेश पहिला.

( हेरंब व हेमाड प्रवेश करतात. )

**हेरंबः**—काय हो, काय ही राज्याची स्थिति! या अयोध्या नगरीचें केवढें वैभव होतें? स्वर्गांत राहणाऱ्या देवादिकांनां सुद्धां आमचा हेवा वाटत होता.

**हेमाडः**—अगदीं अल्पकाळांत त्या वैभवाचें मातेरें झालें. आज युवराज गादीवर असते, तर केवढा उत्साह व आनंद या नगरींत दिसला असता! त्या कैकेयीनें असंख्य जीवांना दुःखसागरांत लोटून, त्यांचा तळतळाट मात्र घेतला.

**हेरंबः**—ही नगरी अगदीं स्मशानासारखी भयाण वाटते. जिकडे तिकडे उदासीनता दिसून येते. या पापिणीनें जो दाही दिशेनें अग्नी पेटविला, त्याच्या ज्वाळा अद्यापि कमी न होतां, भडका सारखा वाढतच चालला आहे. युवराजांचा राज्याभिषेक होणार होता, त्या दिवसाचा आदला दिवस आठवला, आणि आजची स्थिति पाहिली, ह्मणजे स्वर्गांतून पाताळांत फेंकून दिल्यासारखें वाटतें. आपण ऋणांतून मुक्त झालों, ह्मणून महाराजांना किती आनंद झाला होता. सर्व आयुष्यभर राज्याचा रथ चालविला; आतां रामचंद्राला सर्व कारभार सांगून, या उतार वयांत परमेश्वर-चिंतनांत आपला काळ घालवावा, या आशेनें सर्व योजना करीत असतां, महाराजांवर दैवाचा घाला पडला. आणि सर्व गोष्टी जागच्या जागीं राहिल्या.

**हेमाड**:—मला तर येथून दुसऱ्या एकाद्या देशाला जावेंसें वाटतें. जिकडे पहावें, तिकडे गोंधळ! कोणाचा पायपोस कोणाच्या पायांत नाहीं, असें झालें आहे. दशरथ महाराजांनीं पुत्र-वियोगानंतर थोडेच दिवस काढले! केवढा शोक! रामराजे वनांत गेल्यानंतर त्यांनीं धड अन्नपाणी सुद्धां सेवन केलें नाहीं. रात्रंदिवस 'राम' 'राम' असा सारखा ध्यास लागलेला असे. अगदीं शेवटीं त्यांनीं 'राम' म्हणून जी किंकाळी मारली, ती तर अजून कानांत घुमत आहे. एकाद्या सात जन्माच्या पातक्यावर सुद्धां, असा प्रसंग येऊं नये.

**हेरंब**:—नशीबांत असतें तें थोडकेंच टळतें? अहो, त्यांना तो शाप नडला.

**हेमाड**:—कसला शाप?

**हेरंब**:—एकदां असें झालें कीं, दशरथ महाराज शिकारीला गेले होते. शिकारी करितां हिंडतां हिंडतां ते एका तळयाच्या कांठीं आले. त्या तळयावर पुष्कळ प्राणी पाणी पिण्यास येतात, असें समजतांच, कांहीं शिकार मिळेल, अशा आशेनें झुडुपाच्या आड लपून बसले. बराच वेळानें त्यांना कांहीं चाहूल वाटली, आणि 'चुळचुळ' असा आवाज ऐकूं आला. सावज आहे, असें समजून त्यांनीं तावडतोब बाण मारला. बाण सोडला नाहीं, तोंच जोराची किंकाळी त्यांना ऐकूं आली. चुकून बाण मनुष्याला लागला, हें पाहून त्यांना अत्यंत वाईट वाटलें. तावडतोब ते धांवत गेले; आणि पाहतात तों, एक लहान मुलगा आपल्या तहानेनें व्याकुळ झालेल्या वृद्ध आणि अंध माता-पितरांना पाणी नेण्याकरितां चंबळी भरित असतां. बाण लागून पडलेला आहे. राजांनीं त्या बालकाला उचलिलें, आणि त्याच्या आईबापांकडे घेऊन गेले. सर्व वृत्तांत सांगून त्यांनीं क्षमा मागितली. ते दोघे पुत्रशोकानें अगदीं मरणोन्मुख झाले. मरतां मरतां त्यांनीं राजाला शाप दिला कीं, तुला पुत्रशोकानें मरण येईल. तो शाप खरा झाला.

**हेमाड**:—राजा धर्मात्मा, पण येवढेंसुद्धां पाप क्षम्य झालें नाहीं.

**हेरंबः**—एकंदरींत राजांना मृत्यु फार वाईट तऱ्हेनें आला; आतां मात्र कैकेयीच्या कारस्थानाला पक्का जोर आला; एकसारखी ती पुढची पायरी सर करित चालली आहे. भरत युवराज आपल्या मामाच्या घरीं गेले आहेत. त्यांना बोलावून आणून राज्यपद देण्याची तयारी जारीनें चालली आहे.

**हेमाडः**—ह्मणजे काय ? रामराजांना घालविण्यांत हाच कां हेतु होता ! किती कारस्थानी बाई !

**हेरंबः**—राजदरबारी नोकरी करणारांची स्थिती हल्लीं फार वाईट आलेली आहे. पोटाची खळगी भरण्याकरितां, काय वाटेल तें करावें लागतें. दशरथ महाराजांच्या कारकीर्दींत एकादें तरी अन्याय व अनीतीचें काम होत होतें कां ? धनी न्यायप्रिय आणि नीतिमान् असला, ह्मणजे नोकरांचें काम आनंदाचें होतें; नाहीं तर सर्वच गोष्टी ह्मणजे जुलमाचा राम राम.

**हेमाडः**—असें कां ह्मणतां ? नोकर झाला, ह्मणून त्यानें कांहीं नीतिधर्माला फांटा दिला पाहिजे असें थोडकेंच आहे.

**हेरंबः**—हें पहा, व्यवहार फार निराळा असतो. भरत महाराजांना त्यांच्या मामाच्या कडून आणण्याचा हुकूम मजवर सुटलेला अहे, असें समजतें.

**हेमाडः**—ह्मणजे, तुम्हीं भरताला आणायला जाणार वाटतें ? ज्या सिंहासनावर रामराजा नाहीं ह्मणून, तुह्मीं शोक करित होतां, त्याच सिंहासनावर दुसऱ्याला आणून बसवून तुम्हीं आनंदाचे सोहाळे करित बसणार ? धिःकार असो तुह्माला आणि तुमच्या सेवकवृत्तीला !

**हेरंबः**—हेमाडपंत, अहो हीच खरी सेवकवृत्ती. एकाद्या राज–व्यक्तीला पूज्य मानण्यापेक्षां राजसिंहासनाला पूज्य मानणें अधिक पुण्यकारक आहे. अयोध्येचें सिंहासन, दशरथ महाराजांची गादी, ह्मणून अधिक मान दिला पाहिजे. ( एक शिपाई येतो. )

**शिपाई:**—हेरंब आपणच कां ?

**हेरंब:**—होय. काय काम आहे ?

**शिपाई:**—राजदरबारांतून हा लखोटा आपल्याला दिला आहे. ( शिपाई मुजरा करून निघून जातो ).

**हेरंब:**—पाहिलेंत. उदईक प्रातःकाळीं मी भरत युवराजांना आणण्यास निघावें, असा निकडीचा हुकूम आलेला आहे. दशरथ महाराजांच्या निर्याणाची बातमी न देतां, गुरुमहाराजांनीं तावडतोब बोलाविलें आहे, असा निरोप द्यावयाचा.

**हेमाड:**—पण कायहो, वसिष्ठ गुरु सुद्धां या कैकेयीच्या कटांत सामील आहेत ? नाहींतर ते काय ह्मणून भरत युवराजांना बोलवित आहेत ? कां आपलें उगवत्या सूर्याला नमस्कार, हीच यांची धर्मनीति आहे ?

**हेरंब:**—तसें नाहीं. वसिष्ठगुरु हे वीतरागी, ज्ञानी पुरुष आहेत. त्यांच्या सारख्या संयमी तपस्व्यावर क्षणभंगुर सुखदुःखाचा सारखाच परिणाम होतो. दशरथ महाराजांच्या वंशाची आणि सिंहासनाची काळजी त्यांना वाहावी लागते. राज्यकारभार वंद तर ठेवून चालणार नाहीं ! प्रजेची सेवा हें अखंड व्रत तर चालूं राहिलें पाहिजे ? शिवाय हे धर्मगुरु असतात, तसेच मुत्सद्दी पण असतात. सगळ्या गोष्टींचा विचार करून त्यांना कार्य करावयाचें असतें.

**हेमाड:**—मग तुह्मीं उदईक जाणार तर !

**हेरंभ:**—हो हुकूमाप्रमाणें मला वागलें पाहिजे.

**हेमाड:**— चला. ( जातात )

---

## प्रवेश २ रा.

( पद ह्मणत भरत प्रवेश करतो. )

### पद.

दुनियेस राम प्यारा । दुनियेस जीव धारा ॥
दुनियेंत राम राही । दुनियेस राम पाही ॥
दुनियेंत राम गाई । दुनिया विलीन होई ॥
दुनियेंत राम डोले । दुनियेंत राम बोले ॥
दुनियेस राम वाली । दुनिया सुखें निमाली ॥

**भरतः**—सारखें रामभजन करित असतांना, ही मनाची हुरहुर कां बरें वाढत चाललेली आहे! पुष्कळ दिवसांत आजीला, मामांना भेटलों नव्हतों, ह्मणून आईच्या सांगण्यावरून इकडे आलों. दादा, लक्ष्मण यांना सोडून कोठेंही चैन पडत नाहीं, ह्मणून मीं येत नव्हतों. पुष्कळ दिवस झाले, तरी मन रमावें, तसें रमत नाहीं. आतां आतां तर मनाची स्थिती फारच विलक्षण झाली आहे. मनाला सारखें चुकल्या चुकल्याप्रमाणें झालें आहे. गेल्या दोन चार दिवसांत स्वप्नें तरी किती विचित्र पडताहेत. झोंपेंतून एकदम दचकून जागें व्हावें; जागें झाल्यावर तासांचे तास डोळ्यांना टक पडावी; मध्येंच भ्रमिष्टाप्रमाणें व्हावें; असें कितीवेळां तरी झालें. दादांच्या पायांपासून दूर राहिल्यामुळें त्यांची सेवा अंतरली, हें तर कारण नसेलना? ( हात जोडून ) दादा, खरंच; माझी चूक झाली. आपल्या चरणाची सेवा माझ्या हातून घडत नाहीं. क्षमा करा. आपली प्रेमळ मूर्ती आठवून, आपल्या मंगल नामाचें भक्तिपुरःसर

भजन करतों खरा; परंतु आपलें दर्शन नाहीं, ह्मणून मनाची तळमळ शांत होत नाहीं. (भजन करूं लागतो. शत्रुघ्न येतो. दोघेही भजन करितात. भरत समाधिस्थितींत जातो. रामदर्शन होतें. आनंदानें) दादा, रामराया, तुझीच ती गोड मूर्ती कां? किती सुंदर मूर्ती? हंसऱ्या पुष्पलतांच्या उपवनांत पक्षिकूजितांच्या मंजुल तालसूरांत, सर्व जग प्रमुदित करून दिव्य तेजाची सुमनें उधळीत हा बालभानु माझ्या मनाच्या क्षितीजावर उदयास येत आहे. अहाहा, दादा ही मूर्ती माझ्या डोळ्यांसमोरून ढळूं देऊं नका. मला प्रेमानें देव आणि भक्त यांस स्वर्गीय प्रेमानें भेटूं द्या. (गातो. दचकून) एका क्षणांत तुह्मीं आपलें रूप बदललेंत! तुमच्या अंगावरील राज्यभूषणें हिरावून घेणारी ती बाई कोण? लक्ष्मण आणि सीता वहिनीच्याही अंगावरील अलंकार हिसकावून घेणारी ही पापिणी कोण? बाबांच्या मांडीवरून ओढीत, राजवाड्याच्या बाहेर लोटून देणारी ती चांडाळीण कोण? अग दुष्टे काय हें तूं करित आहेस! काय ह्मणुन मी तुझ्याजवळ येऊं? बळजबरीनें माझ्या अंगावर माझ्या रामरायाचे अलंकार घालतेस? हं; खबरदार; दादा, दादा, रामराया, धांवून या—(मूर्च्छित होतो.)

**शत्रुघ्नः**—भाऊ, भाऊ, सावध हो, सावध हो. गेल्या दोन चार दिवसांत याची स्थिती फारच विलक्षण झाली आहे. काय करावें, कळत नाहीं. आईला कळविलें आहे, पण तिच्याकडूनही कांहीं निरोप आला नाहीं. भाऊ, सावध झालांत कां?

**भरतः**—(सावध होऊन) हो, शत्रुघ्ना, काय रे, असें काय झालें मला? राम-भजन करित असतांना, किती भयंकर स्वप्न पडलें! आठवण झाली कीं अंगावर शहारे येतात. शत्रुघ्ना, मी अयोध्येस केव्हां जाईन असें मला झालें आहे.

**शत्रुघ्नः**—मलाही तसेंच वाटतें. आईपासून फार दिवस दूर राहिल्या-मुळें, तिलाही तिकडे बिलकूल करमत नसेल. तिचा जीव सारखा आपल्या-कडे लागला असेल.

**भरत**:—खरंच; आपण लवकरच जाण्याचा बेत करूं. परंतु मला स्वप्न पडताहेत त्यांवरून मनांत कांहीं भलभलते विचार येत आहेत.

**शत्रुघ्न**:—तुमचें मन स्वस्थ नाहीं, म्हणून तसें होतें आहे.

**भरत**:—उमामहेषाला अभिषेक करायला सांग; आणि सर्व गोरगरीबांना अन्नवस्त्रदान करा. (एक सेवक येतो)

**सेवक**:—अयोध्येहून एक दूत आलेला आहे.

**भरत**:—धाडून दे त्याला आंत. शत्रुघ्ना, काय वरें हा निरोप घेऊन आला असणार? (दूत येतो. प्रणाम करतो)

**भरत**:—काय रे, कां आलास? सर्व खुशाल आहेत ना? बाबा, आई, दादा, वहिनी, सर्वजण खुशाल आहेत ना?

**दूत**:—महाराज, मी एकाच कामाकरितां आपल्याकडे आलों आहें. वसिष्ठ महाराजांचा निरोप आहे कीं, आपण दोघांनीं अयोध्येस तावडतोब निघून यावें.

**भरत**:—कां रे? काय काम आहे? एवढ्या घाईनें कां बोलावलें आहे?

**दूत**:—काय काम आहे, मला माहीत नाहीं. निरोप सांग आणि तावडतोब निघून ये, असा मला हुकूम आहे. महाराज, मला तावडतोब परत गेलें पाहिजे.

**भरत**:—अरे एवढा प्रवास करून आला आहेस; थोडी विश्रांती घे, जेव आणि मग जा.

**दूत**:—नको, महाराज; गुरुमहाराजांच्या आज्ञेप्रमाणें, मला विलंब करितां येत नाहीं. क्षमा असावी. (दूत जातो.)

**भरतः**--बरें, जा, शत्रुघ्ना, आपली जाण्याची तयारी करा; आपणांस लवकरच निघालें पाहिजे. ( शत्रुघ्न जातो. )

**भरतः**—'मन चिंती तें वैरी न चिंती.' माझ्या मनाची स्थिती किति विलक्षण झाली आहे. विपरीत स्वप्न आणि अनिष्ट विचार, यांनीं कांहीं सुचेनासें झालें आहे. दादांनीं दर्शन दिलें, त्यावेळीं जो आनंद झाला तो त्रिभुवनांत न मावणारा होता. परंतु, त्यानंतरचा तो भयंकर देखावा-! अजून अंगावर शहारे येतात. या दूताच्या आकस्मिक येण्यानें तर मनाची तळमळ असह्य झाली आहे. निरोप, आणि तो सुद्धां गुरु महाराजांचा, आणि अगदीं मोजक्या शब्दांत!—काय आहे, याची कल्पना सुद्धां करवत नाहीं. ( उसासा टाकून ) हं; सर्व खुशाल असोत. दादा, तुमच्या दर्शनानें, या डोळ्यांचें पारणें केव्हां फेडीन, असें झालें आहे. आपलें मंगल रामनामच, ही मनाची तळमळ शांत करण्यास समर्थ आहे.

( जातो )

---

## प्रवेश ३ रा.

( अत्रिऋषींच्या आश्रमांतील मुलें; प्रफुल्ल, उद्दाम, दमन आणि सुतीक्ष्ण, मोळया, कंदमूळें गोळा करीत आहेत ).

**उद्दामः**—प्रफुल्ल, आपल्या गुरुजींना दयामाया बिलकूल नाहीं आश्रमांत आल्यापासून पाहतों आहें, मोळया आणणें, कंदमुळें आणणें वगैरे उन्हांतान्हांतील कामें, बेलाशक ते आम्हां मुलांकडून करून घेतात. हे आह्मांला गड्यामाणसांचीं पोरें समजतात काय?

**प्रफुल्लः**—असतील कदाचित्. पण आमचें काय त्यांत नुकसान आहे. शास्त्रपठनाच्या त्रासांतून सुटून, रानावनांत भटकायला खेळायला मिळतें, त्यांत काय वाईट आहे? आपण थोडे कां खेळतों?

**उद्दामः**—हा आमचा चांगुलपणा झाला कीं, आह्मीं आपलें मन रमवून घेतों. पण गुरुजींनीं हीं कामें नोकराकडून नको कां घ्यायला?

**दमनः**—अरे, हें एक प्रकारचें शिक्षण आहे. कष्ट केल्यानें आपण काटक बनतों; शिवाय स्वावलंबनाचा धडाही आपल्यास मिळतो.

**उद्दामः**—दादा, आपलें पुराण नको. तुला नेहमीं आपल्या मोठेपणाचा आव घालून पांडित्य फार करायला पाहिजे.

**सुतीक्ष्णः**—उद्दाम, तूं आणि दमन सख्खे भाऊ, आणि असे नेहमीं काय भांडतां?

**उद्दामः**—तूंच पहा. सुतीक्ष्ण, मी आणि प्रफुल्ल बोलत होतों. या शिष्टांना मध्यें तोंड घालायची कांहीं जरुरी?

**दमनः**—उद्दाम तूं लहान भाऊ ह्मणून मी पुष्कळ वेळां गप्प करतों परंतु तुझा उद्दामपणा वाढत चालला आहे.

**उद्दामः**—दादा, उद्दामपणा वगैरे काढलास, तर बघ हो. मी बिलकूल ऐकून घेणार नाहीं. घरीं बाबांच्या रागाची नाहीं पर्वा केली, तर तुझ्या पांडित्याला भीक घालतों आहें!

**दमनः**—उद्दाम, मी इतका वेळ ऐकून घेतलें; आतां मात्र आपण मर्यादा सोडलीत. आणखी जीभ चालवलीस तर लक्षांत ठेव.

**सुतीक्ष्णः**—आलांत तुम्हीं हमरी तुमरीवर. तुम्हीं सख्खे भाऊ, आणि या शिव्यागाळीचा आणि मारामारीचा अर्थ काय? घरीं तुमचें पटत नाहीं, आईला बाबांना अतिशय त्रास देतां, ह्मणून अत्रिगुरुजींनीं तुह्मांला आपल्या आश्रमांत आणलें. तेथेंही तुमचें तेंच!

**दमनः**—सुतीक्ष्णा, बघितलेंस ना तूंच? मी काय बोललों याला? उगाच एकेरीवर येण्याचें कांहीं तरी कारण होतें?

**प्रफुल्लः**— जाऊं द्यारे, तुमची ही लढाई नेहमींची आहे. तरी बरें; युद्ध आज हात घाईवर नाहीं आलें.

**सुतीक्ष्णः**– वा, तूं आणखी तेल ओततोस?

**प्रफुल्लः**—-असते; थोडी गम्मत असते त्यांत.

**दमनः**— उगाच चिडवतो —

**उद्दामः**—चीडवीन, चीडवीन. काय करशील रे?

**दमनः**—गप्प बैस, हां. ज्यास्ती चिभली चालवलीस, तर बत्तीशी रंगवीन.

**प्रफुल्लः**—हं लागलें युद्धाला तोंड.

**सुतीक्ष्णः**—हें वाढतच चाललें—!

**उद्दामः**—दादा, तूं आपली दादागिरी चालवूं नको हं!

**दमनः**—काय ह्मणतोस रे— ( तोंडांत देतो. सुतीक्ष्ण दूर करतो प्रफुल्ल हांसतो. उद्दाम धबाके देतो. )

**उद्दामः**—( रडत ) मार पाहूं, मार पाहूं. बरें, लक्षांत ठेव. मला आडवलें ह्मणून काय? नाहींतर काढली असती तुझी दादागिरी.

**सुतीक्ष्णः**—जाऊं दे रे. दमन, तूं मोठा भाऊ, पण तुलासुद्धां समज कमी आहे.

**दमनः**—असे दिवटे भाऊ असल्यावर, समज समज किती ठेवणार? पुन्हां तर बोल; चांगल्या दातुरड्या पाडून टाकतो.

**प्रफुल्लः**—( हांसून ) हं, हं, हं, हा दुसरा छापा दिसतो आहे. रण-भेरी वाजूं लागल्या.

**सुतीक्ष्णः**—गप्प बैस, पाहूं. त्यांचें भांडण लावून देतोस, आणि मग आपण हांसत गम्मत पहात बसतोस. अगदीं करनकरा स्वभाव तुझा.

**प्रफुल्लः**—ही काय थोडकीच अस्सल मारामारी आहे! असल्या चकमकींत खणखणाट असतो; विजेचा प्रकाश नाहीं पाहायला मिळत.

**उद्दामः**—हो, हो; पाडल्यास दातुरड्या. हा सुतीक्ष्ण मध्यें पडला ह्मणून; नाहींतर उडाली होती आपली गाळण—

**दमनः**—( सुतीक्ष्णास ) पहा; तूंच पहा; कोण खोडी काढतो आहे. आणि तूं ह्मणतोस मला समज़ कमी. भाऊ झाला ह्मणून काय झालें? गैर दिसलें, कीं चेचायलाच पाहिजे.

**प्रफुल्लः**—( उद्दामास, हांसत ) चल; शत्रूंत कांहीं अर्थ दिसत नाहीं. मर्दानीपणापेक्षां तत्वज्ञान अधिक दिसतें आहे. अशा प्रतिस्पर्ध्यांबरोबर लढणें, धर्मयुद्धाच्या नियमाविरुद्ध आहे. अरे, सारखा जोड असल्याशिवाय, मातींत लोळण घेण्यांत काय अर्थ आहे? शरीराला धड मालीसही मिळत नाहीं; आणि प्रेक्षकांची निराशा झाल्यामुळें, त्यांच्या शिव्या मात्र खाव्या लागतात. मार खाणें ही मर्दानी आहे; शिव्या खाणें ही ज़नानी आहे.

**सुतीक्ष्णः**—प्रफुल्ल, कृपा करून येथून निघून जा कसा.

**प्रफुल्लः**—( उद्दामास ) चल, आपण कांहीं तरी खेळ खेळूं. सध्यां युद्ध तहकूब आहे. तहाच्या वाटाघाटींत काय ठरतें आहे तें जाहीर होईलच.

**उद्दामः**—( झिडकारून ) जा, तूं; मी नाहीं येत.

**प्रफुल्लः**—हं, या छावणींतल्या लढवय्याचा क्षोभ अजून ओसरलेला दिसत नाहीं. या पक्षाला तडजोड मान्य होईल असें दिसत नाहीं. हा

धुमसणारा अग्नी लवकरच पेट घेईल, अशीं चिन्हें दिसताहेत. दुसऱ्या छावणींत डोकावून पाहावें. ( दमनास ) दमना कांहीं खेळ खेळूं येतोस कां ? ( दमन उद्दामाकडे पहात पहात प्रफुल्लावरोबर जातो) अंहं; या पक्षांत पोक्तपणा अधिक दिसतो. रणझुंझारपणा याच्या अंगीं फारच कमी आहे. तलवार बाहेर काढल्यावर रिकाम्या म्यानांत जर कां पोक्तपणा घुसला, ह्मणजे हातांतील तलवार गवताच्या काडी इतकी दुबळी होते. पोक्तपणाच्या अनुलेपनानें, मर्दानीपणाचा झणझणीतपणा जिरून जातो. पहा, एकाच आईबाच्या दोन पोरां-मधील फरक. एक वयानें लहान, पण मर्दानी बाण्याचा, अर्थात् जोमदार. दुसरा जगांत आधीं आलेला, ह्मणजे वयानें मोठा. जगाची हवा अधिक लागल्यामुळें, मर्दानीपणा दमट होऊन, पोक्तपणाची बुरी आलेला; एकंदरींत गंभीर, पण कमजोर. एकाच वृक्षाला दोन जातीचीं फळें. जगाला कोणतें अधिक गोड लागतें, तें जग ठरवीलच. असो ( दमनास ) काय, खेळायचें ना ?

**दमन:**—आपण दूर कोठें तरी जाऊन बसूं. या कारट्यानें उगाच डोकें भणाणून सोडलें.

**प्रफुल्ल:**—हं, उष्णता कमी होत चालली. पोक्तपणाचा गारठा वाटूं लागला. आपल्याला सर्दी होणार नाहीं, येवढी खबरदारी घेतली पाहिजे. ( दोघेही जातात )

**सुतीक्ष्ण:**—उद्दाम, मी तुला किती वेळां सांगितलें कीं, ही तुझी वर्तणूक गैर आहे. किती लवकर चिरडीस येतोस ?

**उद्दाम:**—मग दादा कां मला बोलतो ?

**सुतीक्ष्ण:**—तो बोलला, ह्मणून तूं एकदम त्याला उलट बोलावेंस ? किती केलें, तरी तो तुझा वडील भाऊ आहे.

**उद्दाम:**—पण वडील भावानें आपली किंमत ठेवून घ्यायला पाहिजे. उठल्या सुटल्या आपली दादागिरी नाहीं दाखवितां कामा त्यानें.

**सुतीक्ष्णः**—अरे, टाळी एका हतानें कां वाजते कधीं ? तूं नीट वागूं लागलास, ह्मणजे तुझा दादासुद्धां नीट वागेल. आपल्या धाकट्या भावाला, आपण उगाच खैसवैस करतों, याची त्यालाच लाज वाटूं लागेल. ( शंख वाजतो ) अरे, गुरुजी आश्रमांत बोलावताहेत. चल लवकर. पण हे दोघे,-दमन आणि प्रफुल्ल-कोठें भटकत आहेत ? हे शिस्त मोडतात, आणि गुरुजी बोलले, ह्मणजे यांना राग येतो. चल, उद्दाम, आपण तरी जाऊं या. गुरुजींचें काय काम आहे, कोणास ठाऊक ? कांहीं विशेष काम असेल; नाहींतर यावेळीं बोलाविणें नाहीं यायचें. हे दोघेही अजून येत नाहींत. ( पडद्यांत "सुतीक्ष्णा, सुतीक्ष्णा, इकडे ये; धांवत ये रे." ) काय रे, हा प्रफुल्लाचा आवाज; हा घाबऱ्या घाबऱ्या कां हांका मारतो आहे ! काय झालें, पाहूं चल.

**उद्दामः**—जा तुम्हीं; ते येतील गरज असली तर. ( सुतीक्ष्ण जाऊं लागतो; इतक्यांत दमन लंगडत येतो. )

**प्रफुल्लः**—केवढी मोठी ठेंच लागली; अतिशय रक्त वाहिलें.

**सुतीक्ष्णः**—चल, आश्रमांत घेऊन जाऊं; ह्मणजे कांहीं औषधोपचार करितां येईल.

**उद्दामः**—( हंसत ) चांगली खोडकी मोडली. देव कांहीं लांब नव्हता. ( दमन डोळे वटारतो )

**प्रफुल्लः**—झाली उंदरामांजराची भेट.

**सुतीक्ष्णः**—उद्दाम, तूं ऐकत नाहीं कां माझें ! ( शंखनाद ) अरे, गुरुजी आपल्याला बोलावीत आहेत.

**दमनः**—सुतीक्ष्ण, माझ्यानें चालवत नाहीं. मला तहान फार लागली आहे. ( शंखनाद जोरानें )

**सुतीक्ष्णः**—प्रफुल्ल, तूं बैस येथें. गुरुजींचें काय काम आहे, तें मी पाहून येतों, दमन, थांब मी येतांना पाणी घेऊन येतों. उद्दाम, तूं चल माझ्या बरोबर. मला वेळ लागला, तर तूं पुढें पाणी घेऊन ये. चला.

**उद्दाम:**—माझें काय अडलें आहे! प्रफुल्लाला पाहिजे असेल, तर येतों मी. दादाकरितां बिलकूल येणार नाहीं.

**प्रफुल्ल:**—कसा बंधु-प्रेमाचा मासला आहे!

**सुतीक्ष्ण:**—बरें, चल. प्रफुल्लाकरितां चल. ( दोघे जातात )

**प्रफुल्ल:**—ते येईपर्यंत, त्या झाडाच्या सांवलींत आपण बसूं.

( दोघेही जातात )

( राम लक्ष्मण प्रवेश करतात )

**लक्ष्मण:**—दादा, तो पहा कावळा. हो, तोच तो. त्याच्या चोचींत, वहिनीला तुझीं दिलेली फुलांची माळ आहे. वहिनींच्या पायाला टोंच मारून केवढें रक्त काढलें त्यानें! दादा, तो तहा, त्या डहाळीवर बसला आहे.

**राम:**—दिसतो आहे खरा. तो कावळा मायावी असावा.

**लक्ष्मण:**—कोणी कां असेना. येवढी जखम केल्यानंतर, त्याला सुटा जाऊं देणें बरोबर नाहीं.

**राम:**—ती घे पाहूं गवताची काडी, ( काडी देतो. राम ती बाणासारखी सोडतो. )

**लक्ष्मण:**—दादा, त्या गवताच्या काडीनें काय होणार आहे?

**राम:**—अशा क्षुद्र प्राण्याला आणखी शस्त्र काय करायचें? कावळ्याला काडी हीच काळासारखी आहे. लक्ष्मणा, हें स्थळ किती रमणीय आहे! जगाचीं तीं उत्तुंग शिखरें जगाकडे किती अभिमानानें दृष्टी फेंकीत आहेत. सुंदर वनफुलांनीं नटलेल्या गिरिगुहा मधुलोलुप भ्रमरांच्या गुंजारवांनीं गजबजून गेल्या आहेत. वर्षाकालीन मेघांनीं आकाश अगदीं व्याप्त झालेलें आहे. विष्णुभक्तास घरीं आलेला पाहून विरक्त मनुष्य आनंदित होतो, त्याप्रमाणें हे मोर मेघास पाहून आनंदानें नाचत आहेत. मेघांच्या कठोर आणि उन्मत्त गर्जनेनें

सृष्टी आपला क्रूर स्वभाव जीव मात्राला दाखवीत आहे. नागिणीसारखी नाचणारी चंचल चपला, सद्गुणी मनुष्याच्या अल्पायुष्याची ओळख करून देत आहे. मूर्खांच्या सभांतील संतांच्या मूक वृत्तीनें, हा प्रचंड पर्वत पर्जन्याचा आघात मुकाट्यानें सहन करीत आहे. थोड्याशा संपत्तीनें उन्मत्त होणाऱ्या नराधमाप्रमाणें, या पोकळडौली नद्या फोंफावत चालल्या आहेत. अखेरीस आश्रयाकरितां कावऱ्या बावऱ्या होऊन, त्या समुद्रास मिळाल्यामुळें, शांतीसमाधीचें सुख उपभोगित आहेत. बटुंच्या वेद घोषाची ओळख, बेडूक आपल्या ओरडण्यानें करून देत आहेत. जिकडे तिकडे गवत उगवल्यामुळें हिरवी गार झालेली पृथ्वी आपला शांत स्वभाव जगाच्या निदर्शनास आणित आहे. नवीन पल्लवांच्या योगानें वृक्ष नवीन पोषाख घातलेल्या बालकांप्रमाणें आनंदानें डुलत आहेत. नवीन पिकाच्या भरभराटीनें सर्व लोक सुसंपन्न झालेले दिसत आहेत. शेतकऱ्यांचा आनंद गगनांत मावेनासा झाला आहे. लक्ष्मणा, अशा रम्य वेळीं, मला थोडी डुलकी घेण्याची इच्छा झालेली आहे.

**लक्ष्मणः**—दादा, तुम्हीं अगदीं शांत चित्तानें निजा. परंतु या कुशशय्येखेरीज, येथें काय मिळणार आहे. ( शय्या तयार करतो )

( पुष्पें आणि फळफळावळ घेऊन गुहक प्रवेश करतो )

**गुहकः**—प्रभु रामचंद्र या अरण्यांत संचार करीत आहेत, ही बातमी त्या ऋषीनें दिल्यापासून, दर्शनाची मला सारखी तळमळ लागली आहे. प्रत्येक दरी, प्रत्येक गुहा, प्रत्येक वृक्ष शोधला; परंतु देवाचें दर्शन झालें नाहीं. रघुरायाचीं पदकमलें, दृष्टीस पडण्याचें भाग्य केव्हां उदयास येईल, तें खरें. राघवा, आज दोन दिवस झाले; अन्नपाण्याशिवाय शोध करीत हिंडत आहें. ही भक्ताची भेट आपण केव्हां स्वीकारणार ? राम रघुवीरा माझ्या पदरीं येवढें पुण्य नाहीं कां ? ( खालीं बसतो. रामाची दृष्टी जाते )

**रामः**—लक्ष्मणा, तो कोण बसला आहे ? कष्ट करून थकला भागलेला दिसत आहे. विचार बरें त्याला.

**लक्ष्मणः**—( नमस्कार करून ) महाराज, आपण कोण आहांत ? या अरण्यांत राहतां काय ?

( गुहक न्याहाळून पाहतो. एकसारखा नमस्कार करतो )

**लक्ष्मणः**—महाराज, आपण कोण आहांत ? याला माझी भाषा कळते कीं नाहीं; कोणाला ठाऊक.

**गुहकः**—हा मुलगा कोण ? आणि या अरण्यांत ? ( न्याहाळून ) छे, हा येथला दिसत नाहीं. कीती तेज आहे. हाच माझा प्रभु नसेल ना ? ( आनंदाश्रु ढाळीत ) रामचंद्र प्रभु–

**लक्ष्मणः**—हा दुःखी कष्टी आहे कीं काय ? वाट चुकून तर हा येथें आला नाहीं ?

**गुहकः**—रघुपती, रामप्रभु– ( पायांवर लोळण घेतो. )

**लक्ष्मणः**—हा आमचाच शोध करीत आला आहे, असें दिसतें आपल्याला कोण पाहिजे? रामचंद्र प्रभु ?

**गुहकः**—( आनंदानें ) होय, देवा.

**लक्ष्मणः**—ते पहा, रामचंद्र त्या वृक्षाखालीं शिलेवर बसले आहेत.

**गुहकः**—(प्रणाम करून) अहाहा, देवा, काय तुझें रूप ! देवा माझी जन्ममृत्युची यात्रा संपली. तेहत्तीस पिढ्यांचा उद्धार झाला. याच पाया-पाशीं मरण आलें, तर स्वर्गाचें इंद्रपद मिळाल्यासारखें होईल. प्रेमाच्या मूर्ते ! असलीं बाळें रानोमाळ हिंडवलीं, ते आईबाप रक्तमांसाचे बनलेले नसावेत. देवा, माझ्या डोळ्यांचें पारणें फेडूं दे.

**रामः**—याचा हा भोळा भाव मला अगदीं मोहून टाकित आहे. या, बसा माझ्याजवळ.

**गुहकः**—छे; देवाचा मी नीच सेवक आहें. देवा, या गरीबाच्या भेटीचा स्वीकार झाल्यास—( फळें देतो. )

**रामः**—हो, हो, आनंदानें. ( स्वगत ) या फळांत सुद्धां भक्तीभावाची गोडी उतरली आहे. या फळाचें नांव काय बरें ?

**गुहकः**—हीं एका रानटी झाडाचीं फळें आहेत. प्रभुला आवडलीं नाहींत असें वाटतें ?

**रामः**—नाहीं मित्रा, मला तीं फार गोड लागलीं, म्हणूनच मीं नांव विचारलें.

**गुहकः**—प्रभुनीं आवडीनें खालेल्या या फळांना 'रामफळ' म्हणतात.

**रामः**—( स्वगत ) माझेंच नांव देऊन टाकिलें. किती भोळ्या भावाचें प्रेम आहे हें !

**गुहकः**—देवा, माझ्या नगरीला आपले पाय लागतील कां ? आपला दास म्हणून याला अजरामर करणें प्रभुच्या हातांत आहे.

**रामः**—पित्याच्या आज्ञेप्रमाणें याच वेषांत बारा वर्षें मला राहिलें पाहिजे ; म्हणून नगराचा आश्रय करणें उचित नाहीं.

**गुहकः**—देवा, आपल्याला हालअपेष्टा सोसाव्या लागाव्यात नां ?

**रामः**—लक्ष्मण, मी थोडावेळ डुलकी घेतों. ( गुहक पानें फुलें गवत याची शय्या तयार करितो. लक्ष्मण मांडीवर पाय घेऊन चेपतो. गुहक धनुष्य बाण घेऊन पहारा करितो. )

**लक्ष्मणः**—गुहका, तुझे डोळे पाण्यानें कां भरून आले ?

**गुहकः**—लक्ष्मणजी, या जगन्नायकाला गवतावर उघडें पडावें लागत आहे ! सुवासिक फुलें, उंचीं अत्तरें, चंदनाचे रत्नखचित पलंग, हिऱ्यामाणकांचे दिवे—अशा वैभवामध्यें निजणाऱ्या प्रभुला कुश-शय्येवर शयन करावें लागत आहे, तें बघवत नाहीं !

**लक्ष्मणः**—मित्रा, सुख आणि दुःख हे कोणी कोणाला देत नाहीं. जो तो आपल्या कृतकर्माचें फल भोगतो. जगांतील व्यवहार मोक्ष साधनाला

आडकाठी करितात. जगाच्या बाजारांत राजाचा रंक होतो, आणि रंकाचा इंद्र होतो. विषयापासून जीव विरक्त झाला, म्हणजेच प्रभुचरणाची आसक्ती उत्पन्न होते. प्रभुची चरणसेवा म्हणजेच मोक्षाची ठेव.

( राम हलतात. लक्ष्मण पाय चेपतो. )

( सुतीक्ष्ण, दमन, प्रफुल्ल अणि उद्दाम प्रवेश करतात. )

**सुतीक्ष्णः**—तें पाहिलेंत कां काय आहे तें! अत्रिगुरुजींनीं सांगितलें आहे कीं, आपल्या या अरण्यांत अयोध्येचे राजपुत्र–राम आणि लक्ष्मण संचार करित आहेत. ते देव स्वरूप असल्यामुळें, त्यांचें दर्शन होणें फार पुण्यायीचें आहे. कोठें माहिंती लागली, किंवा कोणी भेटलें तर मला तावडतोब येऊन कळवा असें गुरुजीनीं बजावून सांगितलें आहे. तेच नाहीं ना रे हे?

**दमनः**—काय सांगावें? कदाचित् ते सुद्धां असतील.

**प्रफुल्लः**—आपण जाऊन विचारूं.

**उद्दामः**—नको रे बुवा, तो पहारेकरी पहा कसा दिसतो आहे. पण काय रे, तो धाकटा भाऊ मोठ्या भावाचे पाय चेपतो आहे!

**दमनः**—ह्मणूनच गुरुजी त्यांना देवरूप मानतात.

**प्रफुल्लः**—अरे, हीं देवाचीं कामें तुह्मां आह्मांला साधायचीं थोडीच?

**सुतीक्ष्णः**—प्रफुल्ल, ही थट्टा मस्करीची जागा नाहीं. दमन, आपण त्या पहारेकऱ्याला विचारूं; (भीतभीत जातात. गुहक दूर जाण्यास खुणावतो.)

**गुहकः**—मुलांनो, जा. येथें गडबड करूं नका. प्रभुराज निजले आहेत.

**सुतीक्ष्णः**—कोण आहेत ते?

**गुहकः**—जा तुम्हीं; देव आहेत ते.

**दमनः**—आह्मांला त्यांचें नांव तर सांगा.

**गुहकः**—देव आहेत देव.

**प्रफुल्लः**—कोणते देव? अयोध्येचे राजपुत्र?

**गुहकः**—हो, हो; प्रभु रामचंद्रजी आहेत; आणि ते दुसरे, त्यांचे धाकटे भाऊ लक्ष्मणजी आहेत.

**दमनः**—सुतीक्ष्णा, तेच रे तेच.

**उद्दामः**—चला, आपण गुरुजींस बातमी देऊं.

**सुतीक्ष्णः**—थांबा; आपल्याला भेट होते कां पाहूं. आले तर आपल्या आश्रमांतच घेऊन जावूं.

**उद्दामः**—ते येतील कां आपल्या बरोबर?

**सुतीक्ष्णः**—थांब. ( गुहकास ) आह्मांला देव भेटतील कां? आमच्याशीं ते बोलतील?

**गुहकः**—हो, हो; तुमचें काम काय आहे?

**सुतीक्ष्णः**—त्यांना अत्रिऋषींच्या आश्रमांत येण्याविषयीं विनंति करावयाची आहे.

**गुहकः**—ते झोंपून उठले, ह्मणजे भेटा त्यांना.

**उद्दामः**—आह्मीं जवळ गेलों, तर ते रागवायचे नाहींत ना?

**गुहकः**—छे, छे, छे, बाळांनों, आमचा प्रभु ममतेची मूर्ती आहे. मन दुखविणारा एक शब्दही प्रभूंच्या तोंडून निघणार नाहीं. तुह्मीं थांबा जरा.

**उद्दामः**—सुतीक्ष्ण, ते भाऊ भाऊ कधीं भांडत नसतील?

**प्रफुल्लः**—अरे हो; मारामारीसुद्धां करितात.

**उद्दामः**—तूं नको मध्यें बोलूं. मी तुला नाहीं विचारीत.

**प्रफुल्लः**—छे, छे, असे जोराचे शब्दसुद्धां, एकमेकांकडे पाहून उच्चारीत नाहींत.

**सुतीक्ष्णः**—उद्दाम, ते अतिशय प्रेमानें वागतात. वडील भाऊ वनवासांत निघाल्याबरोबर, धाकटा भाऊ आपण होऊन त्याच्या बरोबर गेला. ते येवढे प्रेमानें वागतात, ह्मणूनच आपल्या गुरुजींसारखे मोठे मोठे ऋषीमहर्षी त्यांना देवाप्रमाणें मान देतात.

**उद्दामः**—सुतीक्ष्णा, मला शिकवशील तसें. (राम जागे होतात.)

**गुहकः**—मुलांनों, देव जागे झाले; थांबा, घाई करूं नका.

**रामः**—लक्ष्मणा, मी बराच उशीर निजलों, नाहीं?

**लक्ष्मणः**—नाहीं, दादा, फार वेळ झाला नाहीं.

**रामः**—गुहक कोठें आहे? तुम्हीं दोघे मुळींच पडलां नाहीं?

**गुहकः**—नाहीं, देवा. आम्हीं बोलत बसलों होतों.

**रामः**—वा, थोडी झोंप घ्यायची कीं नाहीं. त्यानें हुषारी वाटते. बरें हीं मुलें कोण?

**गुहकः**—आपल्याला भेटायला थांबलीं आहेत.

**रामः**—या बाळांनों, या बसा येथें. या घाबरूं नका. कोठलीं तुम्हीं? मला भेटण्याकरितां थांबलांत? कां बरें? काय काम आहे?

**सुतीक्ष्णः**—आम्हीं अत्रिगुरुजींच्या आश्रमांतील विद्यार्थी आहोंत. माझें नांव सुतीक्ष्ण, याचें प्रफुल्ल, दमन आणि उद्दाम, हे दोघे भाऊ आहेत. आम्हीं या रानांत नेहमीं येतों. मोळया गोळा करीत असतांना आमच्या या दमनाच्या पायाला दगड लागला. पाणी आणण्यास मी आश्रमांत गेलों होतों; त्या वेळीं गुरुजीनीं आपण या अरण्यांत संचार करित आहांत, असें सांगितलें. आम्हीं परत जात असतां, आपलें दर्शन झालें. आमचें काम कांहीं नाहीं. पण गुरुमहाराजांनीं सांगून ठेविलें आहे कीं, आपली बातमी लागली कीं, ताबडतोब त्यांना जाऊन कळवायचें. आम्हीं ह्मटलें, बातमी देण्यापेक्षां, आपल्याला आश्रमांत घेऊन जावें; ह्मणजे गुरुजीनां अधिक आनंद होईल.

**रामः**—पाहूं, बाळा तुझा पाय. अरे यांत माती फार शिरलेली आहे, जा, ( उद्दामास ) बाळ, याचा पाय कशानें तरी पूस पाहूं. ( उद्दाम आपल्या वस्त्रानें पुसतो )

**प्रफुल्लः**—अरे वा; हा रामाचा लक्ष्मण झाला.

**रामः**—शाबास, बाळ. अशीच भावाची सेवा करावी.

**प्रफुल्लः**—हे तर नेहमीं भांडत असतात. हें आत्तांच्या पुरतें ललित दिसतें आहे.

**रामः**—होय ? आतां नाहीं भांडायचे. तुमच्या गुरुजींचा आश्रम किती लांब आहे येथून ?

**सुतीक्ष्णः**—अगदीं जवळ आहे येथून. तो त्या पलीकडच्या टेंकडीवर.

**उद्दामः**—ती पर्णकुटिका दिसते ती—

**रामः**—तुमचे गुरुजी मला रागवायचे नाहींत ना ?

**सुतीक्ष्णः**—छे; आपली ते पूजा करणार आहेत.

( जयंत धांवत येऊन पायांवर लोटांगण घालतो. )

**जयंतः**—रामराया, मी शरण आलों आहें. माझ्या हातून अक्षम्य गुन्हा झालेला आहे. प्रभु, मला क्षमा करा; माझे प्राण वांचवा.

**रामः**—लक्ष्मणा, हा कोण आहे ? झालें काय याला ?

**लक्ष्मणः**—अरे, काय झालें तुला ?

**जयंतः**—नाहीं, नाहीं, आपण अभय दिल्याशिवाय मी हे चरण सोडणार नाहीं. पुन्हां नाहीं मी करणार. मला क्षमा करा.

**लक्ष्मणः**—अरे उठून सांगशील कीं नाहीं काय झालें तें ?

**जयंतः**—आधीं अभय पाहिजे.

**रामः**—ऊठ, तुला अभय आहे.

**जयंतः**—रामराजा, मी आपला भयंकर अपराध केला आहे. आपण केलेल्या शासनास मी पात्र असलों, तरी मला ती शिक्षा असह्य होत आहे. प्रभु, आपण सोडलेला ब्रह्मशर माझा पाठलाग करून मला अगदीं नकोसें करित आहे.

**रामः**—कोणता ब्रह्मशर? आणि तुझ्या पाठीमागें कां?

**जयंतः**—मला क्षमा करा. सांगायला मला शरम वाटते. मी देवेश्वर इंद्राचा मुलगा जयंत. आपलें सामर्थ्य पहावें, या दुष्ट बुद्धीनें, वडीलांच्या चिथावणीवरून, मी कावळ्याचें रूप धारण केलें. आपण गुंफून दिलेली माळ सीतादेवी घेऊन उभी असतां, त्यांच्या पदकमलाला टोंच मारून, मी तो हार लांबविला. आपण जी गवताची काडी फेंकलीत, तिला ब्रह्मशराची शक्ती आली. तो शर तिन्ही लोकांत माझ्या पाठीमागें लागला. मी सर्वांना शरण गेलों-प्रत्यक्ष देवेंद्राला सुद्धां शरण गेलों; परंतु त्या ब्रम्हास्त्रापुढें कोणाचेंही सामर्थ्य चालेना. महामुनी नारद भेटले, आणि भूलोकावर आपल्याला शरण गेल्याशिवाय, रक्षण करण्यास कोणीही समर्थ नाहीं, असें त्यांनीं सांगितलें, व आपल्याला शरण जाण्याचा उपदेश केला. सर्व भूमंडळावर आपला शोध करित करित मी येथें आलों. महाराज, आपण रक्षण केल्याशिवाय, माझा दुसरा कोणीही त्राता नाहीं. आपल्या कृपाळुपणाची त्र्यैलोक्यांत ख्याती आहे. माझा जीव वांचविण्यास आपणाशिवाय कोण समर्थ आहे?

**गुहकः**—प्रभुची हेटाळणी करतोस?

**उद्दामः**—कांहीं नाहीं, मुळींच याचा बचाव करूं नका.

**प्रफुल्लः**– आधीं कोठें गेली होती अक्कल?

**दमनः**—भोग आपल्या कर्माचें फळ.

**सुतीक्ष्णः**—प्रभु हा शरण आलेला आहे. याचें रक्षण न करणें योग्य होणार नाहीं.

**रामः**—बरोबर आहे; बाळा, तुझें ह्मणणें योग्य आहे. आपला गुन्हा यानें कबूल केला आहे, आणि त्याला पश्चात्तापामुळें वाईटही वाटत आहे. शरण आल्यावर त्याचें तारण न करणें अयोग्य आहे. तुम्हीं आपल्या गुरुजींना विचारा; ते सुद्धां हेंच सांगतील. जयंत, तूं वाईट कृत्य केलेंस; तुला पश्चात्ताप झाला आहे ह्मणून, मी तो बाण परत घेतों. जा, पुन्हां असें धाडस करूं नकोस. लक्ष्मण, मित्रा, चला, आपण या मुलांच्या बरोबर, यांच्या आश्रमांत जाऊं आणि ऋषीराजाचें दर्शन घेऊं.

(जातात. पडदा पडतो.)

---

# अंक तिसरा.

## प्रवेश पहिला.

( इंद्राचा दरबार. इंद्र, अमात्य, विभूषण, कुंडलवर.)

**अमात्यः**—देवेश्वरा, बृहस्पतींचा उपदेश योग्य आहे, याचा अनुभव आपल्याला सर्व बाजूंनीं येत आहे. कांहीं बावतींत यश आलें खरें; तथापि मानहानी कांहीं कमी झालेली नाहीं.

**इंद्रः**—( रागावून ) अमात्य, नोकरांनीं धन्याचे हुकूम पाळायचे असतात; त्यांवर शेरे मारायचे नसतात, हें तुह्मीं वारंवार विसरतां. धनी वाटेल ते हुकूम सोडतो; त्यांच्या बऱ्यावाईटाची जबाबदारी तो ओळखून असतो. ह्या गोष्टी तुह्मीं आह्मांला शिकवायला नको आहेत. नोकरांनीं शिस्तीचें उल्लंघन करणें, ह्या सेव्य-सेवकाच्या संबंधाचा उपमर्द आहे. नोकरांनीं आपली पायरी संभाळून राहिलें पाहिजे.

**अमात्यः**—( हात जोडून ) सरकार, उपदेश करण्याच्या हेतूनें मी मुळींच बोललों नाहीं. धन्याचें हित तेंच आपलें हित; धन्याचा मानमरातब, तोच आपला मानमरातब; त्यांची मानहानी, तीच आपली मानहानी; या गोष्टी लक्षांत ठेवूनच मीं बोलण्याचें धाडस केलें. शिस्त मोडल्याची कल्पना माझ्या मनाला शिवली देखील नाहीं. जयंताच्या फसगतीचें—

**इंद्रः**—( रागानें ) चालते व्हा येथून. जयंताच्या फसगतीची आठवण देण्याची जरूरी नाहीं. तुम्हीं आपली पायरी सोडून बोलत आहांत. बृहस्पतीनीं आम्हांला पुष्कळ शहाणपण शिकविलें; आणि आतां हे आले गादी चालवायला. अमात्य, पुन्हां तुह्मांला बजावून सांगतों कीं, तुमचें हें उद्धटपणाचें वर्तन, आमच्या दरबारीं खपणार नाहीं. शिस्तीचें उल्लंघन न करितां,

आमच्या दरबारच्या रीतिरिवाजांप्रमाणें, जर तुह्मांला नोकरी करणें पसंत असेल, तर रहा; नाहीं तर आपला मार्ग मोकळा आहे.

**अमात्यः**—( स्वगत ) धन्याचें हित धन्यापेक्षां नोकरांनांच अधिक कळतें. धन्याला डोळ्यावरील धुंदीमुळें अंधपणा येतो; परंतु नोकर इमानामुळें डोळ्यांत तेल घालून बसलेले असतात. तथापि पुष्कळ वेळेला मौनव्रत धारण करणें हेंच योग्य असतें. ( उघड ) महाराज, मीं आपलें मन दुखविलें असल्यास, या दासाला क्षमा असावी.

**इंद्रः**—कुंडलत्वर, विभूषण, पुढें काय करायचें तें आपल्याला ठरविलें पाहिजे. रामाला राज्यावर न बसूं देतां, अयोध्येच्या बाहेर काढण्यांत आपल्याला पूर्ण यश आलें आहे. अयोध्येची राज्यसत्ता आपल्या प्रयत्नानें बरीच खिळखिळी झाली आहे. जयंताच्या बाबतींत पड खावी लागली, हें थोडें वाईट झालें.

**विभूषणः**—तीच गोष्ट माझ्या मनाला सारखी लागून राहिली आहे.

**इंद्रः**—आपल्याला निराश होण्याचें कारण नाहीं. यक्ष किन्नरांचें साहाय्य असल्यावर, भूलोकावरील एका पोराला आपण घाबरायचें ?

**कुंडलत्वरः**—पुढें खबरदारी फार घ्यायला पाहिजे.

**इंद्रः**—भरताला तर आपण अयोध्येच्या वाटेला आणलाच. येथपर्यंत ठीक झालेंच. भरताला रामाचा ध्यास लागला आहे, त्याची मात्र भीति वाटते. राज्याचा त्याग करून, तोही संन्यासी बनला, तर मोठीच अडचण उत्पन्न होणार आहे. सर्व लोकही देशत्याग करतील. त्या सर्वांनीं आग्रह करून रामाला गादीवर आणला तर-?

**विभूषणः**—मग आपला सर्वच बेत ढासंळला ?

**कुंडलत्वरः**—छे, हो; तसें झालें तर एकार्थीं चांगलें होईल. पित्याला जिवंतपणीं वचन दिलेलें असतां, त्याच्या मृत्युनंतर वचन मोडणाऱ्या पुत्राचा नीचपणा सर्व जगाच्या निदर्शनास येईल.

इंद्रः—हें काय थोडें झालें? आतां आपण असें करूं; आपल्या कारस्थानांत आपल्याला प्याद्यांची हलवाहलव करायची नाहीं. आपण मनाचीं सूत्रें हातांत घेऊं. रामाच्या, भरताच्या किंवा लोकांच्या मनःप्रवृत्तीवर ताबा चालवूं; ह्मणजे सर्व गोष्टी मुकाट्यानें होतील.

विभूषणः—पण तें आपल्याला साधेल कां?

कुंडलवरः—हो, नाहीं तर सर्वच फसायचें.

इंद्रः—फारच खबरदारी घेऊं ह्मणजे झालें. वाणीवर सत्ता चालविण्याकरितां आपण सरस्वतीची मदत घेऊं. तिचें साहाय्य असलें ह्मणजे बराच गोंधळ उडवून देतां येईल.

कुंडलवरः—मग मोठी मौज उडेल.

( बृहस्पती एकदम प्रवेश करतो. )

बृहस्पतीः—देवेश्वरा, अद्यापी तुमचे डोळे उघडत नाहींत! त्या पुण्यश्लोक रामचंद्राचें सत्व हरण करण्याचे विचार अजून तुमच्या डोक्यांतून निघून जात नाहींत? अरे देवेन्द्रा, नुसत्या गवताच्या काडीनें त्राहीत्राही करून सोडण्याची शक्ती ज्याच्यामध्यें आहे, त्याच्या सामर्थ्याबद्दल मत्सर बाळगून चालणार नाहीं. स्वर्गाचा अधिपती या उन्मादामुळें, तूं आपल्या आणि सर्व देवांच्या नाशास कारणीभूत होशील, हें लक्षांत ठेव. मृत्यु लोकांवरील सर्व प्राण्यांना क:पदार्थ मानल्यास, अंतीं तुला पश्चात्ताप होईल. तूं जातोस तो मार्ग चुकीचा आहे. पापाचा आहे. वैभवाच्या घमेंडीमुळें, अधिकारसत्तेच्या उन्मादामुळें, परदुःखाच्या बेपर्वाईमुळें, तुला कितीवेळां खालीं पाहावें लागलें याचा विचार कर. अरे, महापराक्रमी विष्णूलासुद्धां जालंदराच्या महापतिव्रता वृंदेकडून शाप घ्यावा लागला. शिबिराजानें आपलें मांस शिजवून दिलें, त्या वेळीं, इंद्रा, तुझी कमी कां फजिती झाली? परोपकारी पुण्यशील दधिचीनें आपल्या अस्थि देण्याच्या पूर्वी, वृत्रासुरानें तुला पराभूत केलें, तें तुला आठवतें कां? बळीराजाच्या पुण्याईमुळें, तुझें धावें धणाणलें होतें, तें विसरलास वाटतें?

नहुषानें इंद्रपद भोगलें, त्यावेळीं आपण काय करित होतां ! ययातीनें अर्धें इंद्रपद बळकावलें, त्यावेळीं आपण स्वस्थ कां बसलांत? त्रिशंकुला खालीं पाडतांना विश्वामित्रापुढें आपलें कांहींएक चालणार नाहीं, हें सत्य पटल्यानंतर आपला इंद्रपदाचा तोरा कोठें गेला ? देवेन्द्रा, असा अधिकार-मदानें उधळून जाऊं नकोस. मृत्युलोकांतील प्राण्यामध्यें, स्वर्गाच्या इंद्राशीं झगडण्याचें सामर्थ्य आहे, हें ध्यानांत ठेव. मृत्युलोकांतील सामर्थ्यवान् पुण्यश्लोकांशीं वैर करितांना खबरदारी घेऊनसुद्धां, अपयशाचा संभव असतो रामचंद्राच्या बाबतींत तेंच होणार आहे. दशरथ राजाचें सामर्थ्य आणि जनकराजाची पुण्याई यांचा पाठिंबा त्यांना आहे. रामचंद्र स्वत: पराक्रमी असून, देवादिकांना लाजविणारी उदार बुद्धी त्यांच्यामध्यें आहे. केवळ मत्सरबुद्धीनें छळ करणें तुम्हांला साधणार नाहीं. उगाच हट्टास पेटूं नका. महात्म्यांच्यापुढें देवांचेंसुद्धां चालत नाहीं. ( विभूषण, कुंडलवर एकमेकांच्या तोंडाकडे पहातात. )

**इंद्रः**—देवगुरु, या सर्व गोष्टींचा आम्हीं पूर्णपणें विचार केलेला आहे. ठरलेला निश्चय बदलण्याची आम्हांला बिलकूल आवश्यकता वाटत नाहीं.

**बृहस्पतीः**—जा, उन्मत्त राजा, तुझ्या कर्माचें फळ तुला मिळाल्याशिवाय राहणार नाहीं. माझे शब्द खरे ठरतील; आणि स्वर्गाच्या इंद्राची फटफजीती होईल. राजा, अविचारानें वागतोस, पण तुला पश्चात्ताप होईल. मग मात्र सर्व देवांचें पुण्यबलसुद्धां कुचकामाचें ठरेल. जा, राजा, भोग आपल्या कृतकर्माचीं फळें. ( रागानें जातो. )

**इंद्रः**—देवहो, चला; अशा दटावणीनें घाबरून जाण्याचें कारण नाहीं. आपण आपलें सर्व सामर्थ्य खर्च करूं; आपल्या कारस्थानांत अपयश येण्याची भीति बाळगण्याचें बिलकूल कारण नाहीं.

**कुंडल० व विभू०ः**—आमची कंबर खचल्यासारखी झाली आहे.

**इंद्रः**—( रागानें ) भ्याडांनों, धिःकार असो तुमच्या देवपणाला ! त्या संन्याशाच्या गुरगुरण्याला भीक घालतां ? राज्यांतील कारस्थानें मुत्सद्यांना समजतात; संन्याशांना समजत नाहींत. रणांगणावरील झुंझारपणा लढवण्याला

प्रीय असतो; संन्याशाला भीति वाटते. आपल्या बाहुमध्यें सामर्थ्य असल्यानंतर, त्रिभुवनांत अशी कोणती शक्ती आहे कीं, जी आमचा प्रतिकार करण्याचें धाडस करील? माझा निश्चय ठाम झालेला आहे; तुम्ही मजबरोबर या नाहींतर नका येऊं. अशा भागूबाई शिपायांची मला मुळींच जरूरी नाहीं. जा, चालते व्हा. तीं कुंडलें आणि भूषणें घालून नामर्दासारखें खुशाल मिरवीत फिरा. ( जातात. ) अटोकाट प्रयत्न करून, या कामांत यश मिळविलेंच पाहिजे. ( जातो. )

---

## प्रवेश २ रा.

( अयोध्यानगरीची वेस, रान व नगरींत जाणारा रस्ताः वेडें बालक प्रवेश करतें. )

बालकः—( वेडे चाळे करितें ) गाडग्यांत पाणी नाहीं! माझें गाडगें फुटकें आहे! याला ठिगळ लावूं कां? कां या पानांनीं शिवूं? या पानांत पण पाणी नाहीं! ( पानास ) तूं कां आलास माझ्याजवळ? पाणी आहे कां? या दगडाखालीं पाणी आहे! आहे हो आहे! आली वाटतें ती बाई—नेणार कां सगळें पाणी येथून! पण बाई, मला ठेवा हं, थोडें पाणी. पाणी नाहीं; तें अमृत आहे! ये पांखरा, उगाच ओरडतोस; वेडा कुठला ये पाणी पी; तुझ्या त्या चिमुकल्या चोंचीनें पी. सगळें नको हो पिऊं. मी येऊं तुला आणायला? मग तूं दूर कां पळतोस? मी येतों हं. ( इकडे तिकडे धांवतो; दगडास ) तूंच मला पाणी दिलेंस; तूं देव आहेस; तूं अयोध्येचा देव आहेस; तुला मी फुलें वाहीन; तुझी पूजा करीन; तुला नमस्कार करीन. देवा घे माझा नमस्कार. ( रडूं लागतो. ) बाई, तूं कशाला आलीस? तूं मुलाची आई आहेस? मी पण तुझा मुलगा आहें. मला लोटून दिलेंस? सगळें पाणी

नकोना नेऊं ? नेणार ह्मणतेस? मी नाहीं नेऊं देणार. असा मी या दगडावर बसणार. सगळें पाणी नेलें ? थेंब सुद्धां ठेवला नाहीं ? या गाडग्यांत सुद्धां थेंब नाहीं. मग देशील ? नाहीं आतां पाहिजे. ( दगड उचलून ) सगळें पाणी पळविलेंस ? तूं कां मला फसविलेंस ? पांखरा, तूं सुद्धां मला फसविलेंस ? या कपड्यांत तुझ्या चोंचींतले दोनच थेंब टाक. उडालास ? फसविलेंस मला. येरे येरे पावसा; मला अगदीं थोडें पाणी दे. या गाडग्यांत एकच थेंब टाक. नेलें ! त्या दुष्ट वाऱ्यानें पळविलें त्या पावसाला ! चांडाळ आहेस. पाणी कुठें आहे, तें सांगा न कोणी— ( जातो )

( भरत आणि शत्रुघ्न प्रवेश करितात. )

**भरतः—**

पदः—हजरत सलाम घ्यावाः—

झुलवित जगास कावा । मनास न ठाय व्हावा ॥ देवा ॥
चांद अंबरीं; सागर भूवरी । एक दुजा हंसवावा ॥ देवा ॥
मेघ नभाचा; मोर वनाचा । आनंदें नाचावा ॥ देवा ॥
जगतीं जन्मता, आईस दुग्धता । बाल-भाव खुलवावा ॥ देवा ॥
ईश त्रिलोकीं, दास भूलोकीं । भक्ती-रसांत रमावा ॥ देवा ॥

शत्रुघ्ना, आपण मंडळीच्या पुष्कळ पुढें आलों. येवढं लवकर आलों, तरी मला वाटतें आपण एकदम उडून राजवाड्यांत जावें.

**शत्रुघ्नः**—भाऊ, आपण लवकरच घरीं जाऊं.

**भरतः**—( दचकून ) हे जीवजंतू भयंकर आणि अमंगल शद्ब कां बरें करित आहेत? खर-शृगालांचें ओरडणें ऐकून, माझ्या मनांत धडकी भरत आहे. ही अयोध्या नगरी इतकी उदास कां बरें दिसते? शत्रुघ्ना, माझें अवसान गेल्यासारखें मला झालें आहे.

**शत्रुघ्नः**—अगदीं जवळ आल्यामुळें, मन अगदीं अधीर झालें आहे.

**भरतः**—परंतु ते लोक पहा; आपल्याला पाहतांच दिशा बदलून दुसऱ्याच वाटेनें जात आहेत; मुजरा करण्याचेंमुद्धां ते टाळीत आहेत. (श्रमिष्ट बालक धांवत येऊन रडूं लागतें )

**बालकः**—मला पाणी द्याहो. कोणीच पाणी देत नाहीं? पहा, या भांड्यांत एक थेंबही नाहीं. त्या बाईनें सगळें पाणी टाकून दिलें. तुमच्या पायाखालीं पाणी आहे. ( भरतास ) तुझ्या पायाखालीं पाणी आहे. (पाय उचलूं लागतो. )

**शत्रुघ्नः**– कोण आहे हा ?

**भरतः**—शत्रुघ्ना, हा तहानेनें अगदीं व्याकूळ झालेला दिसतो आहे. पाण्याशिवाय मनुष्य कसा माशासारखा तळमळतो, पहा.

**बालकः**—तिकडे नाहीं पाणी; तूं जाऊं नकोस. त्या बाईनें सगळें पाणी नेलें. ( रडूं लागतो. ) त्या बुवाला एक थेंबसुद्धां पाणी दिलें नाहीं. सगळ्या गांवांत पाणी नाहीं. त्या रानांत पाणी ओतलें आहे. मला पाणी द्याहो थोडें.

**भरतः**—पाण्याशिवाय हा अगदीं श्रमिष्ट झाला आहे. बाळा, तुला तहान कां लागली आहे ? चल मी तुला पाणी देतों.

**बालकः**—पाणी कोठें आहे ? पाणी रानांत आहे; तिकडे गांवांत नाहीं; येथें पाणीच नाहीं. जा, तुला सुद्धां पाणी मिळणार नाहीं. आई, मला पाणी दे ना. चला आपण पाणी पिऊं. पाणी पिऊं या । पाणी पिऊं या । सर्वजण मिळून आपण पाणी पिऊं या ।। गांवांत पाणी नाहीं । घरांत पाणी नाहीं । पाणी असे रानांत । चला; पिऊं या ।। ( नाचत उड्या मारीत जातो. )

**शत्रुघ्नः**—काय त्या पोराची स्थिती ! खरोखर, मासे पाण्याशिवाय तळमळत असतील, तेव्हां त्यांच्या जीवाला किती यातना होत असतील !

**भरतः**—माझ्या मनाची अशीच तळमळ चाललेली आहे. माझ्या

जीवाचें जीवन हरपल्यासारखें झालें आहे. शत्रुघ्ना, कांहीं तरी अनिष्ट प्रकार दिसतो आहे. तहानेनें कासावीस झालेलें बालक आतांच कां भेटावें. प्रभुराया, ही तळमळ शांत करण्यास तुह्मींच समर्थ आहांत. (आंत जातो)

---

## प्रवेश २ रा.

(वसिष्ठ, विश्वामित्र, सुमंत मूर्च्छित भरताला वारा घालीत आहेत.)

**वसिष्ठः**—राजपुत्रा, असें काय करतोस! असा धीर सोडून कसें चालेल!

**सुमंतः**—महाराज, सावध झालांत कां?

**विश्वामित्रः**—थोरावर केवढी आपत्ती कोसळली!

**भरतः**—(सावध होतो) बाबा, केवढा तुह्मांला पुत्र शोक!, त्रैलोक्यांत पराक्रमी झालेल्या राजाला ह्मातारपणीं पुत्रशोकानें मरण यावें! आई,—कसली आई!—चांडाळणी, पापिणी, तूं सर्वस्वीं कुलाचा घात केलास! पतीला ठार मारून तूं कोणत्या पुण्याईची जोड केलीस? असल्या प्रकारची तुझी दुष्ट वासना होती तर, मला उपजतांच नख लावून जगांतून कां नाहींसें केलें नाहींस? पापिणी, मूळावर घाव घालून, तूं पालवीवर पाणी शिंपडलेंस! मासे जगविण्यासाठीं तूं पाणीच उपसून टाकिलेंस! कुटिले, ही दुष्ट भावना मनांत येतांच, तुझ्या काळजाचे तिळतिळ तुकडे कसे झाले नाहींत! बाबा, या चांडाळणीवर तुह्मीं एकदम कसा विश्वास टाकिलात! बाबा, मला रामरायांच्या स्वाधीन न करितां, तुह्मीं कसे निघून गेलांत! रामरायांना वनवास आणि तोसुद्धां माझ्याकरितां!—देवा; तुझ्या निर्दयतेला सीमाच कधीं नसते कां? राम-राम माझ्या प्राणा, तूं तरी मला आतां कोठें सांपडणार! कसा दुर्दैवानें सर्व बाजूंनीं आपला कावा साधला!

**वसिष्ठः**—बाळा, मनाला थोडा धीर दे. सर्वांना आतां तूंच आधार आहेस. भरता, भवितव्यता ही अति प्रबळ आहे. हानि लाभ, जन्म मरण, यश अपयश हीं एका प्राक्तनाच्या आधीन आहेत.

**भरतः**—गुरुमहाराज, आपत्तींना कांहीं सीमा नको कां? सर्वच गोष्टी कशा विलक्षण घडून आल्या. बाबांचा मृत्यु, परम प्रिय माणसांचा विरह, प्रत्यक्ष जन्मदात्या आईचा दुष्टपणा,-या सर्व गोष्टी किती विचित्र आहेत! माझ्या रघुनाथाशिवाय आतां कोण त्राता राहिलेला आहे. गुरुमहाराज, रामरायांचीं चरणकमलें आतां केव्हां माझ्या दृष्टीस पडतील?

**विश्वामित्रः**—भरता, थोडासा विवेक कर. झालेल्या सर्व गोष्टी टाळतां येणें शक्य नव्हतें. इतकेंच नव्हे; तर पुढें घडणाऱ्या गोष्टी, त्यासुद्धां आपल्याला फिरवितां येणार नाहींत. कैलासनाथांच्या सर्व लीला आहेत. आपल्या सर्व तपःसामर्थ्यानें त्याचा पार लागणार नाहीं.

**सुमंतः**—महाराज, कौसल्या आईची काय स्थिती झाली असेल बरें! त्यांच्या आधींच जळलेल्या हृदयावर मीठ सारवल्यासारखें झालें असेल! त्यांची समजूत कोणी कशी करायची! आपणच जर असे हताश झालांत, तर त्यांना आधार कोण देणार!

**भरतः**—( दुःखानें ) आई--कौसल्या आई,-रामरायाला जन्म देणारी देवी-! स्त्री जातीच्या कोमल हृदयाची या वज्राघातानें काय दशा-आई, तुझ्या धैर्याची मी कल्पना तरी कशी करूं? आई, तुझ्या त्या मातृप्रेमाच्या लाडक्या अंतःकरणांत मला जागा आहे ना? तूं कां मला जागा द्यावीस? भरताला राज्यपद पाहिजे या अट्टाहासाच्या मुळाशीं मी स्वतः आहें, ही कल्पना तुझ्या मनाला पटली असेल कां? आई, असा नको समज करून घेऊं. त्या पापकृत्यांत माझा कांहीं हात असेल, तर महादेवानें मला रौरव नरकांत लोटून द्यावें! या नीच कृत्याचा यत्किंचितही अंश मला नुसता कळला असेल, व त्याला माझी सम्मती असेल, तर भगवंतानें या पातक्याला जगांतून एकदम नाहींसा करावा. राज्यपदाच्या अभिलाषाची नुसती कल्पना माझ्या मनाला

शिवली असेल, तर माता, पिता, पुत्र ह्यांची हत्या केल्याचें,-गाईचे गोटे आणि देवतुल्य ब्राह्मणांचीं गांवें जाळल्याचें,-मित्र व राजा यांना दगलबाजपणानें विष-प्रयोग केल्याचें,-अघोर पातक लागेल, हें मी जाणून आहें !

**वसिष्ठ**—भरता, तुझ्याबद्दल त्या माउलीला असा कसा संशय येईल ? रामप्रिय माता ती—

**भरत**—खरोखर, माते, असें तुला कधींच वाटणार नाहीं. चंद्रापासून विषाचा वर्षाव होईल, हिमापासून अग्नी पाझरेल, पाण्यांतले प्राणी पाण्याशीं वैर करतील, परंतु तुझ्या मनांत असा विचारच येणार नाहीं. आई, क्षमा कर. दुःखावेगामुळें तुझ्या अंतःकरणाची ओळख विसरलों. क्षमा कर. दादा, तुम्हीं केव्हां मला दर्शन देणार ? त्या दिवशीं आपली मंगलमूर्ती माझ्या डोळयांनीं प्रेमभरानें पाहिली. पण, देवा, तो भयंकर देखावा माझ्या डोळ्यासमोर उभा करूं नका. आपल्या त्या श्यामल मूर्तीला कंगाल स्वरूप देणारी ती कर्कशा माझ्यासमोर आणूं नका ! चांडाळणी, त्या वेळेस तूं कशाला आली होतीस ? ( पडद्यांत आवाज होतो; आरोळी,-" खबरदार ओरडलीस तर; कपाळ मोक्ष करीन,"-आवाज, " मर; भोग आपल्या पापाचीं फळें,"—रक्तानें माखलेले कपडे घातलेला शत्रुघ्न प्रवेश करतो. )

**भरतः**—शत्रुघ्ना, हें काय ? तुझे कपडे रक्तानें कसे माखले ? आणि तूं असा बावरा कां ?

**शत्रुघ्नः**—कपाळ मोक्ष करून, जगांतून नाहींशी करणार होतों; पण बचावलीस —

**भरतः**—बाळा, संतापाच्या भरांत काय भलतें सलतें नाहींना केलेंस ? काय केलेंस, बाबा, सांग आधीं.

**शत्रुघ्नः**—कायमची नाहींशी करणार होतों. कैकेयीमातेच्या कानांत विष ओततेस काय ? कांहीं नाहीं; त्या दुष्ट मंथरेनें हें सर्व केलें. आतांच

मोठ्या डौलानें नटून सजून ती इकडे येत होती. तिचा तो मायावीपणा पाहून माझें रक्त उसळून गेलें. ताडकन् मी कुबडावर लाथ मारली; तें गळून पडलें आणि तिच्या रक्ताच्या गुळणीनें माझे कपडे मलीन झाले.

**भरतः**—बाळा, संताप आंवरून धरायला पाहिजे हे सर्व नशीबाचे खेळ आहेत. उगाच त्रागा करून काय होणार आहे? सुमंत, जा, पहा बरें, तिची कशी काय स्थिती आहे. तिच्यावर राग काढून काय उपयोग? जा, तिला कांहीं औषधोपचार होईल अशी तजवीज करा. (सुमंत जातो)

**वासिष्ठः**—भरता, आतां असें बसून कसें चालेल! महाराजांच्या क्रियाविधींची व्यवस्था केली पाहिजे. तळमळत गेलेल्या आत्म्याला शांती मिळावयास नको कां?

**विश्वामित्रः**—शिवाय प्रजारंजनाचें काम बंद पडतां कामा नये. प्रजेला महाराज लेंकराप्रमाणें जपत असत. प्रजेला अंतर न देणें, यांतच महाराजांना सुख होईल.

**भरत**—हो. तींही कर्तव्यें आहेत. दोन्हीं कार्यें महत्वाचीं आहेत. पण गुरु महाराज, मला बिलकूल उत्साह राहिला नाहीं.

**वसिष्ठ**—पण त्याला काय इलाज आहे? (उठून चालूं लागतात. सुमंत आडवित असतांना, भ्रमिष्ट बालक गात येतो.)

**बालक**—गांवांत पाणी नाहीं। घरांत पाणी नाहीं। पाणी असे रानांत। चल, पिऊं या ॥ गाडग्यांत पाणी नाहीं। झाडांत पाणी नाहीं। पाणी नसे जगांत। जीव सोडूं या ॥

**भरत**—हाच तो बालक. अरेरे! काय बिचारा पाणी पाणी करीत रानोमाळ हिंडतो आहे. सुमंत, पाणी नाहीं कां पीत हा?

**शत्रुघ्नः**—मग? कांहीं संकटांनीं कां हा वेडा झालेला आहे.

**सुमंतः**—याची कर्मकथा ऐकून, आपलें दुःख उचंबळूं लागेल. महाराज, रामराजे ज्या वेळीं नगर सोडून वनवासांत जाऊं लागले, त्या वेळीं सर्व

लोक दुःखविव्हळ होऊन त्यांच्या बरोबर जाऊं लागले. युवराजांनीं पुष्कळ समजावून सांगितलें, तरी बायकामुलें यांचा आक्रोश कांहीं केल्या थांबेना. रामरायांचे सवंगडी त्यांना सोडीनात. हा मुलगाही त्या मुलांत होता. यानें रडून रडून आकांत केला; तहान लागली, ह्मणून त्यानें आईजवळ पाणी मागितलें. इतक्यांत, रथ जोरानें चालूं लागला ह्मणून, मोठ्यानें ओरडा झाला, आणि हा मुलगा एकदम मूर्च्छित होऊन पडला. त्या वेळेपासून हा भ्रमिष्ट झाला; आणि पाणी पाणी करित सारखा हिंडतो आहे.

**भरतः**—अरेरे, रामचरणाकरितां तुझें हें वेड आहे! रामराया, तूं किती जणांना आपलें वेड लावून गेलास! बाळ, तूं ह्मणतोस तेंच खरें आहे. खरोखर, राम नसतांना सर्व जग जीवन-रहीत वाटतें. पाण्याशिवाय तळमळणाऱ्या माशाप्रमाणें, सर्व जगाची अवस्था झाली आहे. रामप्रभुकरितां, तूं हा वेश धारण केलास, हो? खरोखर, पाणी रानांत आहे. तूं खरा रामभक्त आहेस. (त्याच्या पायांवर डोकें ठेवतो. बालक, आपले कपडे त्याच्या अंगावर घालतो, व गाडगें त्याच्या कपड्यांत बांधतो; गात नाचूं लागतो) या वेषांत मला रामराय भेटतील कां?

**पद**—पति असे देवचि०

मज तूं लागूं दे वेड। जगाची काय मज चाड॥
मनाचा तोल जाऊं दे। जगाचा बोल लागूं दे॥
आतां हो तारि तें वेड। जगाच्या जाई मी आड॥
सखा होई मला वेड। न दुसरा पुरवि तो लाड॥
जगाचा आदि वेडांत। जगाचा अंत वेडांत॥
जगाला भेटी ना वेड। जगाला सोडीना वेड॥

(पडदा पडतो.)

## प्रवेश ४ था.

——:o:——

( मतिमंद आणि मतिधीर प्रवेश करितात. )

**मतिमंद:**—उद्यांच्या दरबारची तयारी कोठपर्यंत आली आहे? दरबार अगदीं प्रचंड होणार आहे, असें दिसतें. पण काय रे, भरत महाराज राज्यपद घेत नाहींत, असा फार बोलवा आहे; खरें कां ? तर मग मोठी पंचाईत होणार आहे. कैकेयी राणीसाहेबांचा सर्वच कट ढांसळला ह्मणायचा ?

**मतिधीर:**—दरबारांत काय होईल, तें सांगतां येत नाहीं. पण एकंदरींत मोठा घोंटाळा होणार आहे, असें दिसतें. कैकेयी राणीसाहेब, जर कां अधिक बिथरल्या, तर आणखी कोणते भयंकर प्रसंग येतील, सांगवत नाहीं. ती म्हणजे वाघीण आहे; पिसाळली म्हणजे प्रत्यक्ष मुलाचा सुद्धां बळी घेण्यास मागेंपुढें पाहणार नाहीं.

**मतिमंद:**—भरत महाराज पण वनवासांत जायचें म्हणतात? हें आहे तरी काय खूळ? घरदार सोडून, ही भीक मागायची चळवळ फारच फैलावत चालली आहे.

**मतिधीर:**—भरत महाराज वनवासांत जात आहेत, हें खूळ वाटतें ?

**मतिमंद:**—नाहीं तर काय ? घरदार सोडायला कांहीं कारण ? तसें करायला कांहीं कारण नाहीं कां लागत ? मी सांगूं ? धनी खायला घालीत नसला, तर गुरांनीं बाहेर भटकणें, याला कांहीं तरी कारण आहे. गुरु खाष्ट असला, तर विद्यार्थ्यानें बाहेर भटकणें, साहजिक आहे. शाळा चुकविण्याच्या हेतुनें कां होईना, शाळेच्या वेळेवर घरांतून बाहेर पडणें, अवश्य आहे. चांदणें नाहीं असें पाहून, चोरांनीं बाहेर पडावें, यांत धोरण आहे. बायको कजाग असली, तर नवऱ्यानें घरदार सोडणें, किंवा नवरा वाईट असला, तर बायकोनें घरांतून निघून जाणें, व्यवहाराला धरून आहे. भरपूर

दक्षिणा मिळायची असली, तर तेराव्याला किंवा लग्नाला, एकदम घरदार सोडून जाणें, भटजीस अगदीं शोभणारें आहे. मुलीला नवरा शोधायचा असला, तर घराबाहेर हिंडणें, भाग आहे. श्रीमंत निपुत्रिक दत्तक घेणार आहे, असें कळतांच, आपलें घरदार सोडून, त्याच्या घरीं ठाणें देणें, धूर्तपणाचें लक्षण आहे. सासूबाई फार लाड पुरविणाऱ्या असल्या, तर जांवईबोवानें, आपल्या घराची पर्वा न करितां, सासुरवाडीस जाणें प्रेमळपणाचें द्योतक आहे. बायको दागिन्यांकरितां हट्ट धरून बसली असेल, तर आपलें घर सोडून, बाहेर जाऊन बसणें, धीराचें काम आहे, धनको धरणें धरून बसला असेल, किंवा घराची झडती होण्याचा समय आला असेल, तर घरांतून बिनबोभाट पळ काढणें, हिमतीचें काम आहे. पोरांचें लेंढार त्रासून सोडीत असल्यास, जन्मदात्रीच्या ताब्यांत ती सजीव सृष्टी करून, बाहेर निघून जाणें, पुरुषार्थाला धरून आहे. या घर सोडण्यांत व्यवहारज्ञान आहे; त्यांत स्वार्थ-त्यागाची गंभीर तत्वें गोंवलीं आहेत. तसें कांहीं आहे कां हल्लींच्या चळवळींत? ह्मणूनच मी खूळ ह्मणतों. बापानें सांगितलें, 'जा रानांत,' सोडलें घरदार; 'दादांच्या बरोबर मीही चाललों,' निघाले बंधुराज; 'जिकडे पति, तिकडे मी,' निघाली पतिव्रता बरोबर; युवराज चालले, लोक चालले; या खुळचटपणाचा अर्थ काय? प्रत्येक काळचें एक एक खूळ असतें. एकदां तें बायकांचें बंड झालें; आतां आले आहे, हें भीक मागायचें बंड. कशा एक एक चळवळी जीव धरतात पहा!

**मतिधीरः**—ही भीक मागायची कां चळवळ आहे? आपल्या आवडत्या माणसाकरितां, सुखचैनीवर लाथ मारून, कष्टांचें आयुष्य पत्करणें, ह्मणजे कांहीं बोलायचें काम नाहीं.

**मतिमंदः**—कोण ह्मणतो बोलायचें काम आहे ह्मणून? अगदीं कृती करून, भीक मागायचें काम आहे. पण त्या भीक मागण्याची कांहीं जरूरी? शुद्ध भिकारडेपणा आहे, झालें.

**मतिधीरः**—यांत असें एक गूढ आणि गंभीर तत्व आहे कीं आपल्याला

प्रिय असणारीं माणसें, ज्या ठिकाणीं आणि ज्या स्थितींत असतील, त्या ठिकाणीं आणि त्या स्थितींत आपण राहणें, हें निर्हेतुक प्रेमाचें द्योतक आहे.

**मतिमंदः**—( हंसून ) हां, हां, हां, किती गूढ आणि गंभीर तत्व आहे. गंभीरमती, तत्व अगदीं गंभीर असेल; पण व्यवहार, महाराज, व्यवहार धरून आहे कां? व्यवहार जिथें साधत नाहीं, तेथें तुमच्या त्या गूढ आणि गंभीर तत्वांना कोळून कां प्यायचें आहे? मोठ्या गंभीरपणाच्या गोष्टी सांगून, मी व्यवहारशून्य गंभीरराव बनणार नाहीं. बापाचें मुलानें ऐकणें, आज्ञाधारकपणा आहे; मग मुलाचें बापानें ऐकणें, पाप आहे वाटतें? पत्नीनें पतीला जीवापलीकडे जपावें; पण पतीनें मात्र पत्नीला पाचोळा समजावें! राजाबरोबर, प्रजेनें एकदम देहत्याग करावा; पण प्रजेच्या हालअपेष्टांच्या वेळीं राजानें मात्र ऐषआरामांत कसूर करतां कामा नये. डोक्यावर हांडे आणि कडेवर मूल घेऊन, भर उन्हांतून, योजनभर दूर असलेल्या नदीचें पाणी आणतांना आपल्या लाडक्या पत्नीला पाहून, डोक्यावरचे हांडे, किंवा कडेवरचें मूल घेण्यास पतिराज, अस्तन्या सारून होतील कां पुढें?

**मतिधीर**—अं हं.

**मतिमंद**—मग? मग? तें लाडक्या माणसाचें तत्व गेलें कोठें? कां? बोलत नाहीं. तत्वापेक्षां, व्यवहार निराळा आहे, खरें ना? अहो, तत्वाची व्यवहाराशीं फारकत होतां कामा नये.

**मतिधीर**—मतिमंदा, तूं मतिमंद नसून मतितीक्ष्ण आहेस.

**मतिमंद**—नुसत्या तात्विक मतिधीरांना, व्यवहारी मनुष्य मंदमती वाटतो. हाच तुमच्या आमच्यामध्यें फरक.

**मतिधीर**—पण आपले भरतमहाराज रामराजांचा शोध करण्याकरितां निघणार आहेत, असा बोलवा आहे. वसिष्ठगुरू, सुमंत वगैरे मंडळीसुद्धां बरोबर जाणार आहेत, असेंही ऐकतों. प्रसंग आलाच तर आपणही आपला विचार केलेला असला, म्हणजे बरें.

**मतिमंद**—कसला विचार करून ठेवतोस. ऐन वेळीं व्यवहाराला धरून वागणें, यांतच हित असतें. दुसऱ्यानें सरी घातली, म्हणून मीं दोरी घालावी यांत कांहीं अर्थ नाहीं. शिवाय, "खाईन तर तुपाशीं, नाहीं तर उपाशीं" हें एकपत्नी व्रत व्यवहारांत टिकत नसतें. "सूर्य उगवेल ती पूर्व, आणि मावळेल ती पश्चिम,' हीच व्यवहाराची गुरुकिल्ली आहे.

**मतिधीर**—पण प्रसंग आला तर तूं काय करणार ?

**मतिधीर**—उगवत्या सूर्याला नमस्कार, येवढें लक्षांत असूं द्या. पाहूं; उद्यांच्या दरबारांत काय होतें तें पाहूं ; त्याप्रमाणें आपलें धोरण ठेवूं, झालें.

**मतिधीर**—पण मला इशारा कसा देणार ? नाहीं तर हा तुझा दोस्त वाट चुकायचा.

**मतिमंद**—अगदीं मी तुझा दोस्त, नाहीं रे; बरें आहे; घाबरूं नकोस. आधीं उद्यां काय होतें, तें तर पाहूं. (जातात.)

---

## प्रवेश ५ वा.

(सभागृह-वसिष्ठ, विश्वामित्र, सुमंत व इतर पौरजन बसले आहेत.)

**वसिष्ठ**:—सुमंत, झाली सगळी व्यवस्था ? भरत शत्रुघ्न यांना निरोप पाठविण्यास कांहीं हरकत नाहीं ना ?

**सुमंत**:—कांहीं नाहीं. वर्दी पोहोंचविण्याची मी करतों व्यवस्था. (सुमंत जातो. ललकाऱ्या होतात. भरत शत्रुघ्न येतात. गुरुजनांस नमस्कार व सिंहासनास प्रणाम करून खालीं बसतात.)

**भरत**:—गुरुमहाराज, कामास सुरुवात करण्यास हरकत नाहीं.

**वसिष्ठ**:—आजचा प्रसंग केवळ सुखाचा किंवा दुःखाचा नसून सुख-दुःखांनीं मिश्रित असा आहे. सूर्यवंशावर अशा प्रकारचा प्रसंग आजपर्यंत आलेला नाहीं. रघुकुलांतील राजधुरंधरावर येवढी जबाबदारी कधींही पडलेली नाहीं. आजचें कर्तव्य पार पाडीत असतांना, आपल्यावर ओढवलेल्या अनेक दुःखांच्या प्रसंगांची आठवण झाल्याशिवाय रहाणार नाहीं. आपल्या राज्यांत कारस्थानाचा विषवृक्ष कसा वाढला, आणि त्या विषारी वृक्षाच्या दूषित हवेंत राज्यकारभाराची कशी हलाखी झाली, याची जाणीव आपणां सर्वांना आहे. नीच लोकांच्या साह्यानें, कैकेयी राणीनें कुटीलपणाची करणी करून, राजघराणें आणि जनता यांच्या सुखांत कशी माती कालवली, हें आपणांस विदित आहेच. या कारस्थानांत दशरथ महाराजांचा बळी पडल्यामुळें, राजसींहासन अनाथ झालेलें आहे राज्याभिषेकाच्या ऐन वेळीं, प्रत्यक्ष युवराजांना वनवासांत धाडून, महाराजांनीं आपली सत्यनिष्ठा व धर्मव्रत–प्रतिपालन यांचें अत्यंत उज्वल चित्र जगाच्या पुढें उभें केलें. पराकाष्ठेचा पुण्यसंचय करून सुद्धां, महाराजांना वृद्धापकाळीं पुत्र-विरहानें मृत्यु यावा, हा केवळ दैवाचा दुष्टपणा आहे. युवराज रामचंद्र! परम कारुणिक, सत्यप्रिय, पितृ-आज्ञा पालक, सर्व सद्‌गुणांची मूर्ती! नांव उच्चारतांच अंगावर रोमांच उभे राहावेत, नेत्रांतून अश्रुप्रहाह सुरू व्हावा, कंठ सद्‌गदित व्हावा, यांत आश्चर्य कसलें! लहान वयांतील स्वभावांत अंतःकरणाचा येवढा थोरपणा असणें, अगदीं दैविक आहे. प्रेमळ स्वभाव, मातापितरांच्या ठिकाणीं संपूर्ण निष्ठा, बंधु-भगिनींच्या बद्दलचें प्रेम, गुरुजनांबद्दलचा आदर, हा प्रत्येक सद्‌गुण ह्मणजेच त्यांची ती सांवळी मूर्ती! अशा पुण्यपुरुषाचा छळ ह्मणजेच देशाचा अधःपात! तथापि, कोशलेश्वराच्या ज्या वचनाकरितां, प्रत्यक्ष कोशलेश्वरानें, आपली सर्व पुण्याई खर्च करून, प्राणत्याग केला, ज्या वचनाकरितां, रामचंद्रानें खडतर वनवास पत्करला, त्याच वचनाची पूर्तता न करणे, स्वर्गस्थ आत्म्याला तळमळत नाहीं कां ठेवणार?

**भरत**:—गुरुमहाराज, कोणती गोष्ट बाबांच्या इच्छेप्रमाणें व्हावयाची राहिली आहे? आपण वडील आहांत; आम्हीं चुकत असतां, वाटेवर आणणें,

आपला अधिकार आहे. आपल्या आज्ञेप्रमाणें, वेद, स्मृती, पुराणें यांना संमत दशगात्रविधि केला; धेनु, अश्व, हत्ती, वाहनें यांचें दान केलें; सिंहासन, भूषणें, वस्त्रें, अन्न, पृथ्वी, धन, गृहें, दान करून, ब्राह्मणांना तृप्त केलें; आपल्या आज्ञेप्रमाणें सर्व विधि यथासांग झाले. सांगा, गुरुजी, सांगा, बाबांची आणखी कोणती इच्छा राहिलेली आहे? बाबांच्या सुखाकरितां, मी जीवाकडे सुद्धां पाहाणार नाहीं. मीं काय केलें, ह्मणजे माझी पितृ–सेवा पुरी होईल?

**विश्वामित्रः**—भरता, दानधर्म यथाविधी केल्यानें मृतात्म्यांच्या जीवाची शांती होते खरी; परंतु मरणसमयीं निघालेले उद्गार, परमपूज्य आज्ञेप्रमाणें असतात. जिवंतपणीं दिलेल्या आज्ञा पाळणें, हें सत्पुत्राचें कर्तव्य खरें; परंतु निजधामास जातांना, इच्छेची पूर्ती झालेली दिसली नाहीं, म्हणजे आत्म्याची तळमळ पराकाष्ठेची असते. आपल्या वचनांतून आपण मुक्त झालों नाहीं, ही कल्पना मरणसमयीं उत्पन्न झाली, ह्मणजे मनाला शांतिचा लाभ होत नाहीं.

**भरतः**—पण, महाराज, माझ्याबद्दल आपली एवढी साशंकवृत्ती कां बरें असावी? माझ्या हातून पार पडणार नाहीं, एवढी कां ती इच्छा दुर्घट आहे? कां मला सांगून कांहीं एक होणार नाहीं, असें आपल्याला वाटतें?

**वसिष्ठः**—भरता, तुजबद्दल, असले विचार आमच्या मनांत येणें संभवत नाहीं. तूं कोशलेश्वर दशरथ राजाचा पुत्र आहेस, राम राजाचा बंधू आहेस, या गोष्टी आम्हीं मनाआड करणें शक्य नाहीं. पितृ-आज्ञा देवाप्रमाणें तूं शिरीं धारण करशील, यांत आह्मांला बिलकूल संशय वाटत नाहीं.

**भरतः**—मग गुरुमहाराज, आपण येवढें अनमान कां करितां? वडिलांच्या ऋणांतून मुक्त होणें, हेंच माझें पवित्र कर्तव्य आहे. महाराज, तळमळत ठेवून माझ्या कर्तव्याच्या आड कां उभे राहतां?

**वसिष्ठः**— भरता, कैकेयी राणीला महाराजांनीं जें वचन दिलें, त्याप्रमाणें रामाला राज्याभिषेक होतां कामा नये, त्यानें चौदा वर्षें वनवासांत गेलें पाहिजे, आणि राज्यपद भरतास अर्पण केलें पाहिजे.

**भरतः**—आणि महाराजांनीं तें कबूल केलें ?

**वसिष्ठः**—राजे वचनबद्ध होते; त्यांना दुसरा इलाज नव्हता. भरता, रामानें जेवढ्या तत्परतेनें पित्याची आज्ञा पाळली, तेवढ्याच तत्परतेनें तूंही पाळावीस, ही आमची इच्छा आहे.

**भरतः**—म्हणजे, पित्याच्या वधाला आणि भावाच्या वनवासाला मी कारण असतांना, या परमपूज्य भाग्यशाली सिंहासनाचा मी स्वीकार करावा, ही आपली इच्छा आहे ?

**वसिष्ठः**—होय, भरता, ही आमची इच्छा आहे; हीच तुझ्या पित्याची आज्ञा आहे. पित्याचें वचन प्रमाण मानून वागणें, यांतच तुझें कल्याण आहे.

**भरतः**—गुरुमहाराज, आपण कां बोलत आहांत हें ? रघुकुलाचे आद्य गुरु परमज्ञानी वसिष्ठच कां हे बोलताहेत ? नको, नको हे शब्द ऐकणें म्हणजेच पापकारक आहे. पित्याचा वध करून, माझ्या करुणामूर्ती वडील भावास रानोमाळ हिंडावयास लावून मीं सिंहासन बळकवावें, येवढा नीचपणा माझ्या हातून करवितां ?

**विश्वामित्रः**—राजपुत्रा, हा नीचपणा नाहीं; हें कर्तव्याचें उग्र स्वरूप आहे. पित्याची आज्ञा परिपालन करण्याकरितां, परशुरामानें प्रत्यक्ष जन्मदात्या मातेचा शिरच्छेद करून, कर्तव्याचें उग्र स्वरूप जगाच्या निदर्शनास आणलें. पितृ-आज्ञेकरितां, पुरुनें आपली यौवनावस्था, पित्याला अर्पण केली.

**भरतः**— पण, मुनीराज, या उग्र कर्तव्याला दुसरी बाजू नाहीं कां ? अशा स्थितींत मीं राज्यपद स्वीकारणें अधःपतन नाहीं कां ? राज्याचा अधिकार अधिकारी पुरुषाकडे जावयास नको कां ?

**वसिष्ठः**—पिता ज्यास राज्य देईल, तोच राज्याचा अधिकारी होतो, हें मत वेदविदीत आहे. तूं राज्य स्वीकारावेंस यांतच सर्वांना आनंद होईल. रामचंद्रालासुद्धां आनंद होईल. प्रजेचें सुख पाहून स्वर्गस्थ पितरांना धन्यता वाटेल.

**सुमंतः**—गुरुमहाराजांच्या उपदेशाप्रमाणें राजपुत्रानें जरूर वागावें. युवराज परत आल्यावर, मग जें योग्य दिसेल तें करावें.

**भरतः**—गुरुमहाराजांचा उपदेश योग्य आहे. माता, पिता, गुरु आणि स्वामी यांचा उपदेश कल्याणकारक असतो, हें मी जाणून आहें.

**सुमंतः**—मग आपली सम्मती आहे ना ?

**भरतः**—थांबा, माझ्या अंतःकरणांत उचंबळणारे विचार, गुरुजनांच्या चरणीं सादर केल्याशिवाय, माझें मन हलकें होणार नाहीं. गुरुजनांनीं माझी नम्र विनंती ऐकून घ्यावी. गुरुमहाराज, माझें मन मला एकसारखें सांगत आहे, कीं सीतापतीची सेवा हा एकच मार्ग माझ्या कल्याणाचा आहे. प्राण विरहित देह जरी नटलेला असला, किंवा भगवंताच्या भक्तीखेरीज, जपयोगादिकांचें जरी मोठें अवडंबर असलें, तरी तें सर्व निरर्थक आहे; त्याचप्रमाणें, सीता, राम, लक्ष्मण यांच्या चरणांखेरीज, राज्यपद केवळ दुःखाचें आगर आहे. आपण प्रेमाला विवश होऊन, माझा गौरव केलांत; परंतु सीता-राम रानोमाळ हिंडत असतां, बळजबरीनें लादलेल्या या राजवैभवानें, माझी तळमळ शांत होणार नाहीं. तुह्मीं लोकप्रतिनिधी ह्मणून माझा पक्ष उचललांत, योग्य आहे; पण मी आपल्या पक्षाचा पुढारी होण्यास सर्वैथैव अपात्र आहें. गुरुदेव, आपण ज्ञानी आहांत; विवेकाचे सागर आहांत; हें सर्व विश्व आपल्याला तळहातावरील बोराप्रमाणें आहे. मला राज्यतिलक लावण्यास आपण उत्सुक आहांत, हें मी जाणून आहें. परंतु, गुरुमहाराज, आपल्या अमृत-तुल्य वाणीनें, माझ्या अंतःकरणाची आग अद्यापी निवाली नाहीं. लक्ष्मणानें जो मार्ग स्वीकारला, त्याच मार्गानें मीं जावें, हाच विचार एकसारखा मनांत येत आहे. महाराज, आपण प्रेमळ शद्बांनीं मला आज्ञा द्यावी; आणि असा आशीर्वाद द्यावा कीं, दर्शन होतांच, राम चरणांपाशीं मला जागा देतील, आपल्या पुण्याईनें ते परत येतील; हीच नम्र विनंती आपल्या चरणांपाशीं आहे. आपण दयेचे सागर आहांत; मला येवढी भीक घालावी. रामचरणांपासून, माझ्या जीवाच्या जीवापासून, मला वेगळें करूं नका, हीच हात जोडून प्रार्थना आहे.

**वसिष्ठः**—भरता, तूं रामभक्तीची प्रत्यक्ष मूर्तीच आहेस.

**विश्वामित्रः**—भरता, कौसल्यादि मातांना काय—

**भरतः**—होय, मुनीराज, मी त्यांना विचारल्याशिवाय कांहीं करणार नाहीं. कौसल्या मातेचा आशीर्वाद मिळाला, तरच मी तो मार्ग स्वीकारणार आहें. ती रामरायाची माता आहे. राम-रायाचें दर्शन घेऊं नको, असें ती कसें सांगेल? गुरुमहाराज, तुह्मीं मला मार्ग दाखवा; मी आईची भेट घेऊन येतों. (भरत आणि शत्रुघ्न जातात.)

**वसिष्ठः**—भरत केवळ रामभक्तीची प्रतिमा आहे. राम-प्रेमानें ओथंबिलेलें भरताचें भाषण, हृदयाचें पाणी केल्याशिवाय कसें राहील?

**विश्वामित्रः**—त्याचें भाषण, विवेकपूर्ण आहे. मनाला तळमळ लागलेली असल्यावर, बाह्य गोष्टींचा कसा परिणाम होणार? मला वाटतें, भरताच्या इच्छेप्रमाणें, त्याला रामभेटीस जाऊं द्यावें; तें अधिक हितकारक होईल.

**सुमंतः**– आपण तसाच सल्ला दिला तर बरें होईल. आपणही सर्वांनीं त्यांच्या बरोबर जावें. कितीतरी पौर—जन रामभेटीकरितां उतावीळ झाले आहेत.

**वसिष्ठः**—मला सुद्धां तेंच वाटूं लागलें आहे. त्याला सम्मती देऊन आपलाही निश्चय त्याला कळवूं.

(भगवें वस्त्र धारण करून, पद गात गात, भरत प्रवेश करतो.)

**पदः**—नाचत ना गगनांत०

होऊं चला वनवासी। आतां। शोधूं जगजीवनासी। आतां॥
सोडूनि विभवा। अर्पुं निज--जिवा। मंगल प्रभुचरणासी। आतां॥
मोद मनाला। होइल अतुला। भेटुनी रघुराजयासी। आतां॥

**वसिष्ठः**—कौसल्या मातेची सम्मती मिळाली कां?

**भरतः**—होय. आईनें सम्मती दिली, आशीर्वादही दिला. उद्यां गर्ग मुहूर्तावर निघण्याचें निश्चित झालें. आईसुद्धां येणार आहे.

**सुमंतः**—आमचासुद्धां निश्चय झाला आहे.

**भरतः**—वा, आनंद आहे. आपण सर्वजण प्रभु-चरणाची सेवा करूं. अहाहा! माझे दादा, माझा देव, मला भेटणार. मी दादांना कडकडून भेटेन. दादांनीं मला प्रेमानें कुरवाळल्यानंतर, मी त्यांचे पाय घट्ट धरून ठेवीन; मुळींच सोडणार नाहीं. राम माझा भाऊ आहे; माझा देव आहे; माझें सर्वस्व आहे. दादा, मला पायांपासून दूर लोटूं नका. मी आईला विचारून आलेला आहें. प्रभु, केव्हां भेटाल? कोठें भेटाल? लवकर भेटा; अगदीं लवकर भेटा. दादा, येवढें कां बरें आम्हांला वेड लावलेंत? (भ्रमिष्ठ बालक गात येतो) हें राम-भक्तीचें वेड. ये माझ्या रामराया, ये. तूं रामभक्तीचें मंदीर आहेस. खरेंच पाणी नाहीं. कुठें कुठें पाणी नाहीं; गांवांत नाहीं; घरांत नाहीं; जगांत नाहीं; खरोखर पाणी रानांत आहे. हो; पाणी नाहीं मिळालें, तर आपण जीव ठेवूं. चल, चल, रानांत. (बाळकाला मिठी मारतो. आनंदानें नाचूं लागतात. पुष्पवृष्टी होते. पडदा पडतो.)

०

---

# अंक चवथा.

## प्रवेश पहिला.

( शर, तीर, बाण आणि धनु-रानांतील झोंपडी बाहेर. )

**तीरः**—ते दोन मुलगे आणि ती बाई, आपल्या या अरण्यांत आल्या-पासून, अरण्याचा नूर कसा अगदीं पालटून गेला आहे. फळें, कंदमुळें, यांची अगदीं रेलचेल झाली आहे.

**शरः**—त्यांत तर कांहींच नाहीं. आश्चर्यकारक गोष्टी किती तरी घडत आहेत. मोठा चमत्कार म्हणजे, जिकडे तिकडे स्वच्छ पाण्यांचे झरे झुळझुळ वाहतांना दिसूं लागले आहेत. ते तिघे ज्या ज्या वाटेनें गेले त्या प्रत्येक वाटेवरील कोणताही दगड सरकवला, तर त्याच्याखालीं स्वच्छ पाण्याचा झरा लागतो. अरण्यांत कोठेंही जा वृक्षांवर मधुर मधुर फळें अगदीं तयार असतात. भुकेनें व्याकुळ किंवा तहानेनें तळमळत असलेला कोणीही सांपडणार नाहीं. काय त्या बालकांचें सामर्थ्य आहे पहा!

**धनुः**—शिवाय अलिकडे या अरण्यांत अगदीं निर्भय वाटूं लागलें आहे. केव्हांही कोठेंही जा, जिकडे तिकडे शांत आणि रमणीय दिसून येतें, आणि मन कसें अगदीं प्रसन्न होतें.

**बाणः**—म्हणूनच आपल्या गुहक महाराजांना, त्या रामाशिवाय दुसरें कांहीं सुचत नाहीं. रात्रंदिवस रामनामाशिवाय दुसरा शब्दच त्यांच्या मुखांतून येत नाहीं. रामाची भेट झाल्यापासून, महाराजांची वृत्ती अगदीं प्रसन्न दिसते.

**तीरः**—येवढे चमत्कार करणारा भेटल्यानंतर, वृत्ती कां बरें प्रसन्न होणार नाहीं! ( पडद्यांत शंख वाजतो. )

**शरः**—काय, लढाईचा हुकूम? आणि या वेळीं? काय भानगड आहे ही.

**तीरः**—कल्पना सुद्धां नसतांना, काय हें भलतेंच!

(पुन्हां शंख वाजतो.)

**शरः**—होय, हें रणदेवीचें बोलावणें? चला, लवकर; एकदम गेलेंच पाहिजे. (धांवत जातात.)

(गुहक, सेनापती, शर, तीर, धनु, बाण—तीरकमठा, परशु, भाले, बरच्या, वगैरे हत्यारांसहित येतात.)

**गुहकः**—मित्र हो, झटपट तयार व्हा. आज आपल्या कसोटीची वेळ आहे. आपल्या प्रांतांत अतिबलाढ्य शत्रूंचें सैन्य उतरत आहे. आपल्यावर त्यांचा रोख नसून, प्रभु रामचंद्राचा पाठलाग करित ते आले आहेत. रामचंद्र आपल्या जीवाचा आधार आहे. त्याच्यावरील संकट, तेंच आपल्या राज्यावरील संकट. मी सर्व राज्य प्रभुचरणीं वाहिलेलें आहे; त्यांची सेवा करण्याचें व्रत मीं पत्करलें आहे. प्रभुच्या केंसास धक्का लागणार नाहीं, येवढ्या शौर्यानें आपण लढलें पाहिजे. माझ्यावर असणारी तुमची श्रद्धा आणि तुमच्या भुजबळांतील सामर्थ्य यांची आज कसोटी आहे. मारूं किंवा मरूं हाच मंत्र एकसारखा अंतःकरणांत असूं द्या. रामचंद्राविरुद्ध लढणारा शत्रू कितीही बलाढ्य असला, तरी त्याचा कांहींच पाडाव लागणार नाहीं, हा दृढ विश्वास ठेवा.

**सेनापतीः**—सरकार, रामाच्या प्रतापानें, आणि आपल्या शौर्यानें, आह्मीं लढून शत्रुच्या सैन्यांत एक घोडा, अगर शिपाई देखील जिवंत राहूं देणार नाहीं. जीवांत जीव आहे तोंपर्यंत मागें पाऊल घेणार नाहीं. ही पृथ्वी रुंड मुंडमय केल्याशिवाय, आमचीं शस्त्रें परत फिरणार नाहींत. सरकार आपण अगदीं निर्धास्त असा.

**गुहकः**—शाबास, वीरहो, तुमचा त्वेष पाहून, प्रभु रामचंद्र तुह्मांला आशीर्वाद दिल्याशिवाय राहणार नाहींत. वीर हो, सरसावा; व्हा पुढें; बोला प्रभु रामचंद्रकी जय. (गुहकाखेरीज सर्व जातात.)

**गुहकः**—प्रत्यक्ष धाकट्या भावानें, मोठ्या भावाच्या जिवावर उठावें, हें किती नीचपणाचें कृत्य आहे. रामचंद्राला शत्रू मानून, असहाय स्थितींत, अरण्यामध्यें, त्याचा घात करणें, हें भरताचें कारस्थान किती अघोर कपटाचें आहे! तीं दोन बालकें व ती अबला, नि:शस्त्र स्थितींत असतांना, अति प्रचंड सेना घेऊन त्यांचा घात करणें, ह्मणजे नरकाचें साधन जोडण्यासारखें आहे. कर्मांप्रमाणें होणार, तें थोडेंच टळणार आहे. सर्व बंदोबस्त करून मला मुख्य बाजू अडवून ठेवली पाहिजे. (जातो)

(सेनापती व सैनिक दबत दबत येतात.

**सेनापतीः**--वीर हो, दम सोडूं नका. शत्रुसेना प्रचंड आहे. पण या दाट अरण्यांत आपण त्यांना चांगल्या रीतीनें तोंड देऊं. त्या दरीमध्यें झाडाच्या आड लपून बसा. आपलें सैन्य किती आहे, याची शत्रूला दाद न लागूं देतां आपल्याला हल्ला परतवायचा आहे. सावध रहा; गाफील होऊं नका. जा, आपापलीं नाकीं संभाळा; चाहूल ऐकूं येऊं लागली. (लपून बसतात. विरुद्ध दिशेनें बाणांचा वर्षाव होतो. रणवाद्यें वाजूं लागतात; एक एक सैनिक पट्टा खेळून जातो. गुहक प्रवेश करितो.)

**गुहकः**—शाबास, वीरहो, शाबास. (युद्ध जोरांत असतांना, भरत धांवत धांवत येऊन मिठी मारतो.)

**भरतः**—रामप्रिय बंधुराया, कोणाकरितां ही लढाई! माझ्या रामराया-करितां कां? रामरायाचा सेवक या माझ्या वृत्तीचा आपल्याला मत्सर वाटला कां? माझ्यामुळें प्रभुचे पाय अंतरतील, या भीतीनें कां माझ्या आगमनाला विरोध हा? (पडद्यांत, "गुहका, भरत रामभक्त आहे; रामाला अतिशय प्रिय आहे, त्याच्या वाटेस जाऊं नकोस.")

**गुहकः**—रामसख्या भरता, बंधुभावाच्या जिव्हाळ्यानें आणि रामपदाच्या भक्तिभावनेनें, मला कडकडून भेट. रामभक्ताला, मी ओळखलें नाहीं, हें अघोर पातक माझ्या हातून घडलें. बंधुराया, क्षमा कर. मी रानवट अडाणी आहे.

रानांत फुलणाऱ्या फुलांचा गंध उग्र असला, तरी तीं फुलें देव टाकून कां देतील! रामप्रभुच्या चरणांची धूळ मस्तकीं धारण करूनसुद्धां, हा जंगलांतील तामसी आणि उद्दाम स्वभाव बदलला नाहीं, यावरून माझ्या पापराशीची कल्पना करवत नाहीं. रामभक्ता, रामभक्तीचें मजवर सिंचन करून, प्रभुची सेवा करण्याची प्रवृत्ती माझ्यामध्यें उत्पन्न कर;—हाच मला आशीर्वाद दे.

**भरतः**—गुहका, देवभक्त भेटल्यावरसुद्धां. प्रत्यक्ष देव भेटल्याचा आनंद होतो. तोच आनंद मला आज झालेला आहे. तूं भक्ती भावाचा परमेश्वर ह्मणून रामरायाची सेवा करित आहेस; मी माझ्या प्रेमभावाचा बंधू शोधीत आहें. आपण दोघेही एकाच आनंद उद्यानांत फिरत आहोंत. मी दादांचा शोध करून, ते परत आले, तर अयोध्येस घेऊन जाणार आहें.

**गुहकः**—नाहीं, भरता, ते परत येणार नाहींत. पितृवचनाप्रमाणें ते अरण्यवास भोगल्याशिवाय कोणत्याही नगरांत जाणार नाहींत.

**भरतः**—गुहक, तूं भाग्यवान् आहेस. रामराय तुला भेटले; पण या निबिड अरण्यांत मला त्यांचा कसा शोध लागणार! गुहका, प्रभुचें दर्शन तुलासुद्धां पाहिजे आहेच? रामचरणाचा मार्ग दाखवून, तूं मला उपकृत नाहीं कां करणार?

**गुहकः**—प्रभुचें दर्शन कोणाला आनंद देणार नाहीं? भरता, प्रभु रामचंद्र त्या चित्रकूट पर्वतावर वस्ती करून आहेत. आपल्याबरोबर येण्याची मला संधी मिळाली, तर माझें भाग्य उदयास आलें, असें मी समजेन; (लोकांस) जा तुह्मी. आपल्या घरीं आलेल्या मित्र-मंडळींची उत्तम व्यवस्था ठेवा. सेवेंत कोणत्याही प्रकारचें अंतर पडूं देऊं नका. चला, आपण निघूं.

(जातात)

## प्रवेश २ रा.

चित्रकूट पर्वत—राम बसलेले आहेत.

**रामः**—या उत्तर रात्रीं, असें स्वप्न कां पडावें? सीतासुद्धां दचकून जागी झाली. स्वप्न तरी किती भयंकर! सीतेची किंकाळी ऐकून, माझें मन अगदीं अस्वस्थ झालें आहे. माझ्या वियोगामुळें भरत अगदीं तप्तांग दिसला; मंडळी उदास, दीन आणि दुःखी झालेली आहेत; कौसल्यादि माता अगदीं विलक्षण स्थितींत आहेत; सर्वजण मला भेटण्याकरितां येत आहेत! तो स्वप्नांतील भयाण देखावा, अद्यापि डोळ्यांसमोरून हालत नाहीं. या शांत आणि रमणीय वेळीं, मला आराम आणि प्रसन्नता वाटत नाहीं. बालभानु या वनांत येणार, म्हणून या वनदेवता, हें सृष्टी-मंदीर किती शृंगारून ठेवित आहेत. प्रत्येक लता-वृक्षाला सुंदर पुष्पांचे कुंज लोंबत ठेवले आहेत. त्यांचा परिमल इतस्ततः पसरावा, म्हणून वाऱ्याची झुळूक आस्थेनें खटपट करीत आहे. वृक्षलता प्रातःस्नान करून, ओल्या अंगानेंच भानुरायाची वाट पहात आहेत. गोड सुरांत हा सर्व सत्कारसमारंभ पार पाडण्याकरितां, निरनिराळ्या रंगांनीं नटलेला पक्षिगण प्रातःस्तोत्रांस प्रारंभ करीत आहे. सृष्टीदेवी शांततेचा शालू परीधान करून, बालराजाच्या कर–दूतांच्या आगमनाची मार्ग-प्रतीक्षा करीत आहे. सर्व चराचर वस्तु आनंदानें डोलत आहेत; परंतु माझ्या मनाची खिन्नता कमी होत नाहीं स्वप्न सत्य सृष्टींत उतरणार नाहींना? काय होईल तें खरें! प्रातःस्नान करून, शिवार्चन आटपून ध्यावें. (दचकून) 'दादा' 'दादा'—हा माझ्या लाडक्या भरताचा आवाज! हा केवीलवाण्या आवाजांत कां बरें हांक मारतो आहे. माझ्या भेटीसाठीं कां तूं तळमळत आहेस! कां नसावेंस? माझा भाऊ म्हणून भरत जन्माला आलेला आहे. जन्म देणाऱ्या आईपेक्षांसुद्धां, त्याचें भावावर प्रेम अधिक आहे. दोन बालकांच्या मातांमध्यें अंतर पडेल, परंतु बंधु-प्रेमानें बद्ध झालेल्या भावाभावांमध्यें अंतर

पडणार नाहीं. एकाच आईच्या पोटीं जन्मास आलेल्या बालकांमध्यें, बंधु-भाव राहतो, असेंच केवळ नाहीं. बंधु-भाव ही अंतर्यामाची ओळख आहे. त्या ओळखीचा प्रकाश झाल्यानंतर, किल्मीषाचा काळोख लयाला जातो. कुटुंबांत जर बंधु-भाव नांदत असेल, तर तेथें आनंद व सौख्य याला बिलकूल तोटा नाहीं. दैवदुर्विलासामुळें कुटुंबांतील भाऊ विरक्त राहूं लागले, तरी ती आत्म्याची ओळख जात नाहीं. माझ्या भरताची ओळख मी कसा विसरेन! मी वनवास भोगीत आहें; तथापि बंधुप्रेमाच्या जोरावर, मला कसलीही भीति वाटत नाहीं; कोणत्याही सुखदुःखाची पर्वा वाटत नाहीं. माझा भाऊ मला भेटण्यास येत आहे, या विचारानें माझ्या मनाची तळमळ शांत होऊं लागली. खरोखर, भावाचें दर्शन, त्याचें प्रेम, त्याची भक्ती, संकटकालीं हात नाहीं कां देणार? भरता, खरोखर तूं ये; मला भेट दे. बंधुप्रेमाचें सुख मला घेऊं दे; मना, आतां शांत रहा. (जातो.)

---

## प्रवेश २ रा.

अरण्य—गुहक.

**गुहकः**—रामरायाचा शोध करित असतां, भरताची आणि माझी चुकामूक झाली; त्यामुळें माझें मन अगदीं कासावीस झालें आहे. सर्व ठिकाणीं धुंडाळून पाहिलें, परंतु कोठेंच पत्ता लागत नाहीं. भरतास एका वृक्षाखालीं बसवून, पाणी आणण्याकरितां ह्मणून जरा दूर गेलों. रघुपतीचें स्मरण करित असतांना, लवकर परतण्याचें भान राहिलें नाहीं. आठवण होतांच तसाच घाईघाईनें आलों; परंतु भरत जागेवर दिसला नाहीं. फार काळजी लागली आहे. कोठें बरें गेला असेल हा? येवढ्या दाट अरण्यांत त्याला वाट सांपडणें

कठीण आहे. या निर्जन अरण्यांत हिंस्रपशु फार असल्यामुळें, विशेष चिंता लागून राहिलेली आहे. रामचंद्राच्या भजनांत गुंग असल्यामुळें, त्याला जीवाचें भानसुद्धां राहणार नाहीं. मजबरोबर येत असतांना, त्याची कित्येक वेळां तरी भ्रमिष्टासारखी स्थिती झाली. काय करावें ? कोठें शोधावें याला ? बरें, येथें विचारायला सुद्धां कोणी नाहीं. प्रभुच्या कृपेनें काय होईल, तें खरें. भजनाचा आवाजसुद्धां कोठें ऐकूं येत नाहीं ? या अनोळखी भागांत, हा कोठें जाणार ? ('दुनियेस राम प्यारा'–पदाचा आवाज) हा आवाज कोणाचा ? येवढ्या भक्तीरसानें कोण भजन करणार ? हो. त्याचाच गोड स्वर,—अरे; आवाज बंद कां झाला ? हा दूर गेला वाटतें ? गाण्याच्या आवाजानें मार्ग काढित गेलें पाहिजे. (जातो.)

---

## प्रवेश ४ था.

—:o:—

अरण्य–कोल आणि किरात, जंगल्याच्या वेषांत–पुढें शिकार पडलेली आहे.

**किरातः**—बोल, हें पाडस मीं मारलें आहे. माझ्या तीरानें तें खालीं पडलें. मी तुला हातसुद्धां लावूं देणार नाहीं.

**कोलः**—हं खबरदार, हात लावशील तर. तूं हें हरीण मारलेंस, होय ? खोटें सांगतोस. ही शिकार माझी आहे. मी त्या सर्वांचा मालक आहे. तुझा कांहींएक संबंध नाहीं; समजलास ?

**किरातः**—तुझा कांहींएक संबंध नाहीं. मुकाट्यानें शिकार सोडतोस, कां तुझीच शिकार करून टाकूं ? एका तीरासरशीं जमिनीवर लोळतील. बोल, तुला जीव पाहिजे कां शिकार पाहिजे ? बोल; करूं ठार ?

**कोलः**—जीवाची भीति घालतोस ? या जंगल्याला आणि जीवाची भीति ? अरे, हा जीव असा झाडाच्या पानासारखा लटकतो आहे. कोण लेकाचा जीव जोमाळून राहलाय ? तूं अशी मिजास नको करूं; कचक्यासरशीं ठार करीन. बोल, लढतोस ? चल, ये, पाहूं; जो जिवंत राहील त्याची मालकी.

**किरातः**—वटवट फारशी करतोस. लेका, तुझें माझें युद्ध ? या बच्चा संगतीं मी युद्ध करूं, होय ? अरे, मी जिंकलों तरी गांवकरी मला नामर्द ह्मणतील; आणि मेलों तरी मुर्दाड म्हणतील. तुझ्यापायीं मी बदनामी करून घेऊं हो ?

**कोलः**—भागुबाई आहेस, भागुबाई. जवान आहेस, तर ये असा अंगणांत. तोंडाची वटवट पुरे कर.

**किरातः**—हरीणावाणी ठार होशील. दम असेल, तर चल पाहूं. ही शिकार येथें मध्यें नको. हां; तूं शिवूं नकोस; मी हात लावूं नाहीं देणार.

**लावणीः**—हा एकच प्यारा०

या रानाचा मी धनीं । मिरवितों जनीं ।
सहज नमतील । सहज नमतील । पशुपक्षी दास बनतील ॥
या बाहुंचें बल धरी । शत्रुसंगरीं ।
जीव तुडवील । जीव तुडवील । मदमस्त धूळ खातील ॥
हा चराचराचा पती । त्यांस कां भिती ।
स्वैर भटकेन । स्वैर भटकेन । बेगुमान जीव ठेवीन ॥
मी पाडस पाडित असें । हेंच मज पिसें ।
नको अटकावूं । नको अटकावूं । हाक नाक जीवा गमवूं ॥
हा शिकारगाजी फिरे । शत्रु थरथरे । काय तव पाड ।
काय तव पाड । मरूं नको, गड्या, तूं येथून होई आड ॥

**कोलः**—मी उचलणार.

लावणीः—अडला रायगडीचा.

दुबळा समजूं नको हा बेटा । यासि ठाऊक नच पळपाटा ।
हा हिमतीचा जवान जोरझपाटा । तूं वृक्षलता, हा वाऱ्याचा
सोसाटा ॥ धृ. ॥ तव हे व्यर्थची धाक धपाटा । स्पर्शें बाटवूं
नको हा वाटा । कणही तुझ्या भेटत नाहीं पोटा ।
चाटसी कां जिभली ? खाशी रपाटा ॥ २ ॥

निकाल होईपर्यंत मी पण धनी आहें.

**किरातः**—बरें चल; आपलें खरें युद्ध पुढें आहे. आपण दोघेही मिळून उचलून ठेवूं.

(उचलून ठेवतात. लढत दोघेही जातात. भरत प्रवेश करतो.)

**भरतः**—

चालः—आनंदकंद.

प्रभु भेट देई जीवा । जीवास तूं विसांवा । प्रेमावीना आईनें ।
कुरवाळीलें करानें । तान्हा कसा निजावा ! ॥ १ ॥ चिरडी
धनी सुमाळा । दीना दशालतेला । उद्यान कां फुलावा ? ॥२॥
रानीं वनीं फिर हो । प्रभु--दर्शनास टाहो । तरी जीव
कां जगावा ? ॥ ३ ॥

मंदाकिनीच्या पवित्र सलीलामध्यें स्नान केलें, आणि शुचिर्भूत झालों. आतां दररोजचा उपक्रम. रामरायांचा शोध कोठें करायचा, आणि कसा करायचा ? गुहकाची आणि माझी चुकामुक झाल्यापासून, मला कांहीं सुचेनासें झालें आहे.

दादांची भेट कोण करविणार ? जों जों विचार करावा, तों तों सर्व जग अंधःकारमय वाटूं लागतें. प्रातःकालीं लहान बालांनीं रमणीय उद्यानांत खेळण्याकरितां जावें; खेळास सुरवात होते, तोंच, एकदम सूर्यानें उदयाचला-आड लपून राहावें; सर्वत्र अंधःकार झाल्यामुळें, काळोखांत चांचपडणारीं बालकें, आपल्या मातापितरांना टाहो फोडून हांका मारीत हिंडावींत; तशीच माझी स्थिती झाली आहे. महेशानें माझ्या मनांत, भावाबद्दल येवढी भक्ती उत्पन्न करावी; आईपेक्षां भावाबद्दलच येवढी आसक्ती वाटावी, यांत त्या ईश्वराचा कांहीं हेतु असावा ! परमेश्वरा ! येवढें प्रेम आणि भक्ती निर्माण केलीस, मग आमची ताटातूट करतोस ? हा खेळ तुला कां खेळावासा वाटतो ? तुझे खेळ जगाला उमगले असते, तर परमेश्वरा, तुझा महिमा कमी कां झाला असता ! तूं वाटेल तो खेळ खेळ; परंतु भावाभावांची ताटातूट करूं नकोस. एकाच रक्तमांसापासून भाऊ उत्पन्न झाले असतांना, त्यांच्यामध्यें देव आणि दैत्य हे भाव कां राखून ठेवतोस ? सर्व प्राणीमात्रांमध्यें, संलग्न करणाऱ्या अशा कांहीं भावना तूं उत्पन्न केल्यास. पतीला पत्नीबद्दल प्रेम वाटावें; पत्नीला पती परमेश्वरस्वरूप वाटावा; आईला बालक प्राणापलीकडे प्रिय वाटावें; बालकास आई अपत्यवात्सल्याची देवता वाटावी. या भावनांची उत्पत्ति करून देखील, देव दैत्य निर्माण झाले, व जगांत विषमता पसरूं लागली. पती, पत्नी; माता, पिता आणि बालक असे पांच प्रेमसंबंध जगाला दिल्यानंतर सुद्धां, विश्वाच्या कुटुंबांत आनंद आणि सौख्य नांदेना. आपल्या सृष्टींत कोणत्या तरी शक्तीची उणीव आहे, हा उलगडा झाल्यानंतर बंधु-प्रेमाची ही आनंदमयी भावना शोधून काढली. सर्व प्रेमभावनांचा रस एकत्र करून, हें बंधु-प्रेमाच्या भक्तीचें अमृत परमेश्वरानें निर्माण केलें. पांचही भावनांचा विरोध झाला, तरी बंधुप्रेम कुटुंबाचा सांभाळ करील, येवढी अद्भुत शक्ती भावाभावांच्या प्रेमांत परमेश्वरानें ओतून ठेवली आहे. भावाभावांनीं गुण्या-गोविंदानें न राहतां, एकमेकांशीं भांडावें; ऐहिक सुखाच्या लालसेनें एकमेकांचे गळे कापण्यास उद्युक्त व्हावें, यासारखी कुटुंबांतील सुखावर दुसरी आपत्ती कोणती ! परंतु, देवा, भावाभावांच्या संमिलना आड तूं कां उभा राहतोस ?

दादांचे चरण तूं मला केव्हां दाखविणार? मी अगदीं वेडा होऊन गेलों आहें, रामचंद्राकडे जाणारी कोणती वाट बरें? रजःकणांनों, प्रभुच्या पदीं राहून, त्यांचे पाय चेपण्याचें पुण्य तुम्हीं संपादन केलें; आतां मला कां वाट दाखवित नाहीं? या शिलेवर दादांनीं कधीं विसांवा घेतला असेल काय? वृक्षांनों, आपलीं गोड फळें देऊन तुम्हीं रामराजांची सेवा केलीत; खरोखर धन्य तुमची. हे लते, आपल्या शीतल छायेखालीं माझ्या दादांना तूं निजविलें असशील; मग अशी उदास कां दिसतेस? गंधपरिमल लुबाडणाऱ्या मारुता, तुला मी आडवून धरणार. सांग मला; तूं रामरायाकडून आलास; कां त्यांच्याकडे जात आहेस? होय; तूं तिकडेच निघाला आहेस? मी पण येतों तुझ्याबरोबर. पहा, हे वृक्षपल्लवसुद्धां, मला खुणावून, आग्रह करीत आहेत. मला प्रभुपर्यंत नेशील ना?—

पदः—प्रभु अजि गमला०

बन्धुसखा कां चुकला लपला? ॥ चुकला? लपला।
- भुल नयनाला; ॥ चुकलासी जरी, शोधूं कुठें मी?। जिव
घाबरला। जिव तळमळला ॥ १ ॥ लपसी; परी तूं अंत
किती तरी। पाहसी? येई। हंसवी मजला ॥ २ ॥ (जातो.)

( कोल व किरात येतात. )

**कोलः**—तूं तूं नुकसानी केलीस. भांडण केलें नसतेंस, तर शिकार कशाला मोफत जाती?

**किरातः**—मी पुष्कळ भांडलों; पण तूं लडाई पुकारलीस. बरें, पण त्या ठिकाणीं तूं शिकार कशाला ठेवलीस? आपल्या नजीक असती, तर कावळ्यानें कशाला बाटवली असती?

**कोलः**—तूं तंटा करून, दोघांचेंही नुकसान केलेंस.

**किरातः**—जाऊं दे. कावळयानें उष्टी केलेली शिकार आपण थोडकीच खाणार आहों; अरे, आपला जन्म आहे जंगल्याचा. शिकार मारून पोट भरायचें, हाच आपला धंदा. असा तूं घाबरतोस कशाला? आतां दुसरें हरीण पाहूं. अरे, कोण रे तो? या झाडापाशीं, त्या झाडापाशीं, इकडे तिकडे बघत, थबकत थबकत, याच बाजूला येत आहे? अगदीं लहान बच्चा आहे. या रानांत कशाला आला? एकटाच पुटपुटतो आहे.

**कोलः**—खरेंच, रे खरें. तो लपत लपत येत आहे. अरे, त्याच्या भोंवतीं हरीण तरी किती बागडत आहेत. डोक्यावर, खांद्यावर पक्षी खेळताहेत. गड्या, तो देव नसेल ना रे?

**किरातः**—छे; देव, येवढासा पोरगा होईल होय? तूं वेडा आहेस वेडा. पोरगा अगदीं कोंवळा, नाहीं रे! चल, आपण त्याची शिकार करूं.

**कोलः**—हरीणावाणी पाडायचें होय? नको, गड्या; हा सुंदर पोरगा दिसतो आहे. याला आपण एकदम पकडूं. मस्ती करील, तर आहोंच दोघे.

**किरातः**—चल, त्या झुडपा आड लपून बसूं. असा जरा तो होऱ्यांत येऊं दे. आवाज करूं नकोहो. (दोघेही लपून बसतात. भरत येतो.)

**भरतः**—किती हृदयद्रावक देखावा हा! मृत पाडसाच्या भोंवतीं घिरट्या घालून, हताश झालेली ही हरिणी, किती दीनवाण्या मुद्रेनें, पहात आहे! मेलेल्या पाडसास गिधाडें विदीर्ण करीत असतांना, आईच्या अंतः-करणाला काय वाटत असेल? एकाद्या निर्दय किरातानें याचा जीव घेतला असेल. आईचें अंतःकरण कसें आहे पहा. त्या शवाचें तोंड अजून चाटीत बसली आहे! जा! जा, तूं येथून! आतां तें पाडस नाहीं तुला भेटायचें. (बाण पायापाशीं येऊन पडतात.) हे बाण कोण मारीत आहे! एकादा शिकारी आहे? कां मानव-भक्षी कोणी रानटी लोक आहेत? या अरण्यांत एकटा पाहून, माझ्यावर हल्ला करण्याचा यांचा बेत दिसतो आहे. या, मित्रांनों मी मरणाला कां भितों आहें? निराश होऊन मृत्यु येण्यापेक्षां, आशेच्या

आनंदांतच मरण आलें, तर जीवास अधिक शांती मिळेल. (कोल आणि किरात एकदम येऊन धरतात.) बाबांनों, मला कां धरलेंत? मला रामरायाकडे घेऊन जात आहांत? मोठ्या आनंदानें मी तुमच्याबरोबर येईन.

**किरातः**—आलेंच पाहिजे, तूं आमच्या बरोबर. नुकसान करून, लाडीगोडी लावतोस?

**कोलः**—हं, पळून जाईल; नीट पकड.

**भरतः**—मी नाहीं पळून जाणार; तुह्मीं अगदीं भिऊं नका. मीं तुमचें नुकसान केलें? काय केलें मला सांगाल कीं नाहीं? मी माझ्या दादांच्या भेटीला जात आहें.

**किरातः**—कोण तुझा दादा? आम्हीं जाणत नाहीं काय तें. तूं आमची शिकार बिघडविलीस. आतां त्या हरीणांना जवळ घेऊन काय सांगत होतास?

**कोलः**—त्यांना चिथवीत नव्हतास?

**भरतः**—हरीणांना माझी भाषा कशी समजणार? त्या हरणीचें दुःख पाहून, मी एकटाच बोलत होतों.

**कोलः**—खोटें सांगतोस. आमचें नुकसान तूं केलें आहेस. या अरण्यांत तूं जादू पसरून ठेवली आहेस. तुला आह्मीं ठार मारणार.

**भरतः**—माझ्या हातून तुमचें नुकसान झालें असेल, तर खुशाल माझ्या जीवावर सत्ता चालवा; परंतु मला दादांची सम्मती घेऊं द्या; कारण हा जीव मीं त्यांना अर्पण केलेला आहे. दादांची आणि आईची भेट मला घेऊं द्या; मग मी आपण होऊन, मोठ्या आनंदानें तुमच्या स्वाधीन होईन.

**किरातः**—अरे, हा अगदीं भामटा दिसतो आहे. आह्मांला फसवून जातोस काय? कांहींएक सबब चालणार नाहीं. आह्मीं तुला जाऊं देणार नाहीं.

**भरतः**—मी कधीं खोटें सांगत नाहीं.

**कोलः**—कांहीं नाहीं; याला आपण ओढीत नेला पाहिजे. ( दोघेही ओढूं लागतात. )

**भरतः**—रामराया, तुझ्या भक्तींत मला मोक्ष मिळणार, असें दिसतें आहे. तुमच्या पायांचें दर्शन झालें असतें, तर बरें झालें असतें. बाबांनों, मला एकदां शेवटची प्रार्थना करूं द्या.—

**पदः**—चाल–नस नस आटे०

रघुपति येई । धांवत येई । भजनीं मोहुनी नेई ॥ १ ॥
भेट न होई । नच अंगाई । जीवा झापड देई ॥ २ ॥
तव चरणा ही । विनती वाही । 'राम,' 'राम,' मुखीं राही ॥३॥

( बाण येतात. गुहक प्रवेश करतो. कोल आणि किरात पळून जातात. )

**गुहकः**—इकडे कोठें आलांत ?

**भरतः**—आपली चुकामूक झाल्यानंतर, भटकत भटकत इकडे आलों. त्या दोन किरातांचा मला मारण्याचा बेत होता. मी रामचरणांचें स्मरण करीत होतों, इतक्यांत तुम्हीं आलांत.

**गुहकः**—आपल्या प्राणावरील संकट टळलें नाहीं कां ?

**भरतः**—रामभक्ताचें साहाय्य आल्यानंतर, संकट कसलें राहतें. बरें पण, आपल्याला अजून किती लांब जायचें आहे ?

**गुहकः**—तो पलीकडे, अगदीं दूर असा डोंगर दिसतो आहे ना ? तोच चित्रकूट पर्वत. त्याच पर्वतावर रामचंद्र वास करीत आहेत.

**भरतः**—दादा, तुह्मीं मला दर्शन देणार ना ? आतां मी तुह्मांला हुडकून काढलें. भेट होऊं द्या; मी तुमचे पाय घट्ट धरून ठेवीन. मुळींच सोडणार नाहीं.

**गुहकः**—चला, आपल्याला वाट आक्रमली पाहिजे.

**भरतः**—गुहका, अशी वाट काढ कीं, तो चित्रकूट पर्वत माझ्या दृष्टी-आड लपणार नाहीं. (जातात.)

---

## प्रवेश ५ वा.

चित्रकूट–राम व लक्ष्मण.

**लक्ष्मणः**—दादा, आपल्या सरळ मनाला, तसा संशय येणार नाहीं. परंतु भरताचा नीचपणा आणि कपट अगदीं स्पष्ट दिसत आहे. नाहींतर येवढें चतुरंग सैन्य घेऊन येण्याचें कारण काय ?

**रामः**—लक्ष्मणा, भरताचें माझ्यावर अनिवार प्रेम आहे, हें तुला माहीत आहे.

**लक्ष्मणः**—प्रभुत्व मिळाल्यावर प्राणी मूढ आणि उन्मत्त झाल्याशिवाय राहात नाहीं. राज्यपदाचें वैभव दिसल्यानंतर, भरत मोहवश झालेला आहे, अशी मला खात्री वाटत आहे.

**रामः**—लक्ष्मणा, तुझ्या भावाला तूं ओळखलें नाहींस, याचें मला आश्चर्य वाटतें.

**लक्ष्मणः**—दादा, हा सत्तेचा दोष आहे. सत्ता व अधिकार मिळाल्यानंतर, चंद्र गुरुपत्नीच्या ठिकाणीं रमला; नहुषानें पालखीला ब्राम्हण लाविले; वेन राजा अधमवृत्तीचा बनला; सहस्रार्जुन, देवेन्द्र, त्रिशंकु, यांतून कोणास राज्यमदानें कलंक लाविला नाहीं ? असें असतां, भरतासारख्या पोराची काय कथा ? शिवाय आईच्या कारस्थानाचा फायदा त्याला मिळाला नसेल काय ?

**रामः**—खरोखर, भरताची किंमत जगाला कळली नाहीं. बाळा लक्ष्मणा, बंधुप्रेमाचा मंत्र सारखा जपत असल्यामुळें, राज्यमदाच्या समंधाची बाधा भरताला मुळींच होणार नाहीं.

**लक्ष्मणः**—दादा, क्षमा करा; माझ्या अल्पमतीला निराळेंच वाटतें. मला अतींद्रिय ज्ञान नाहीं, हें मला कबूल आहे. वस्तुस्थिती पाहतां, आमचा शोध काढित येण्यांत, भरताचा उद्देश साधा नाहीं, असें वाटतें. अशा असहाय स्थितींत, आमचा घात करून, राज्य निष्कंटक करण्याच्या उद्देशानें, फौजफाटा गोळा करून भरत येत आहे. दंगाधोपा किंवा कपट मनांत नसतें, तर हत्ती, घोडे, रथ,-एवढें लटांबर हवें होतें कशाला ?

**रामः**—( स्वगत ) याची थोडी मौज करून पाहावी. (उघड) लक्ष्मणा, तुझ्या ह्मणण्याप्रमाणें मानलें, तरी आतां काय करायचें ? रणांगणावर भरताला तोंड देण्याची तुझी आज तयारी आहे कां ?

**लक्ष्मणः**—( उसळून ) अर्थात्. माझे दादा माझ्या पाठीशीं असतांना आणि माझ्या हातांत हें धनुष्य असतांना, सर्व जग चालून आलें, तरी मी डगमगणार नाहीं. दादा, मी जातिवंत क्षत्रिय असून, रघुकुलांत जन्म घेतला आहे. दशरथी रामाचा मी पाठचा भाऊ आहे. भरताला समरांगणांत धडा घालून देऊन, रामसेवक ह्मणून आज सर्व जगांत कीर्ती संपादन करणार. रामाच्या अमर्यादतेचें फळ पदरीं बांधून, त्या दोघांही भावांस समर-शय्येवर कायमचें निजवल्याशिवाय, प्रभुचरणाचें मी दर्शन घेणार. नाहीं. एकटा सिंह गजसमूहाचें निर्दालन करतो, त्याप्रमाणें भरत आणि शत्रुघ्न यांना, त्यांच्या सैन्यासह रणमैदानांत तुडवून मारीन. दादा, आपला नुसता शब्द पाहिजे. हा लक्ष्मण काय पराक्रम करतो, तें पहा. दादा, मी त्या नीच, कपटी भरताचें स्वागत, या धनुष्याच्या बाणांनीं समर-सिंहासनावर करणार आहें. दादा, नुसती परवानगी द्या; माझा उत्साहभंग करूं नका. ( आकाशवाणी—" लक्ष्मणा, साहस करून, मग पश्चात्ताप करीत बसूं नकोस; भरत, राम-भेटी-

करतां वेडा झालेला आहे. तो बंधु-प्रेमानें धांवत येत आहे, भलताच अविचार करूं नकोस,") (नमस्कार करून) दादा, मला खरें स्वरूप कळलें; खरी ओळख पटली. माझ्या हातून अति घोर, असें पातक घडलें; दादा, आपण माझा संभाळ केलात.

**राम:**—बाळा; राज्यमद सर्वांहून दुर्धर खरा, परंतु सत्संगाची जोड मिळाल्यानंतर उन्मत्तपणा विराम पावतो. लक्ष्मणा, भरतासारखा सज्जन साऱ्या ब्रह्मसृष्टींत सांपडणार नाहीं. अंधःकार मध्यान्हींच्या सूर्यास देखील ग्रासून टाकील; आकाश मेघांत मिसळून त्यांत समाविष्ट होऊन राहील; मशकाच्या फुंकेसरशीं मेरू पर्वतही उडून जाईल;–हे सर्व चमत्कार होतील, परंतु भरताला राज्यमद येणें शक्य नाहीं. लक्ष्मणा, भरताच्या तोडीचा पवित्र आणि प्रेमळ बंधु त्रिभुवनांत आढळणार नाहीं.

**लक्ष्मण:**—दादा, माझ्या मनांत उद्भूत झालेल्या नीच विचारांच्या पापाचें क्षालन कशानें होईल?

**राम:**—लक्ष्मणा, उतावीळ होऊं नकोस. कैलासनाथ दीन दयाळ आहेत; त्यांची करूणा भाकली, म्हणजे कशाचीही भीती नाहीं. बरें, सुंदर फळें आणि नदीचें स्वच्छ पाणी आणून ठेव. भरत आणि सर्व मंडळी थकली भागलेली येतील. मी पर्णकुटीकेच्या दारांत वाट पहात आहें. (जातात)

---

## प्रवेश ६ वा.

चित्रकूट पर्वताची बाजू—भरत, शत्रुघ्न आणि गुहक.

**भरतः**—गुहका, हा चित्रकूट किती रमणीय आहे! ऋषीमुनींचे आश्रम, चित्रविचित्र मृगांचे व पक्षांचे समूह, स्वभावजातिवैर विसरून, प्रेमानें चरणारे हिंस्र पशूंचे कळप, चक्रवाक, चकोर, चातक, शुक, मयूर, हंस यांचे मंजूळ शब्द, भृंग्यांचा गुंजारव, मयूरांचें नृत्य, फलपुष्पान्वित झालेल्या वृक्ष-वे[illegible] हा सर्वच देखावा किती मंगल आणि आनंददायक आहे!

**गुहकः**—भरता, हे महान् महान् वृक्ष–हा पाकळ, हा जंबु, हा आम्र, हा तमाल–( भरत प्रणाम करतो. ) त्या नदीच्या कांठीं असलेल्या वृक्षराजीमध्यें रघुवीराची पर्णकुटिका आहे. त्या तुलसीवनांत रघुराय वेदविद्येची चर्चा करतात. ( दोघेही प्रणाम करतात. ) याच वाटेनें रामराय जात असतात. तीं त्यांच्या पावलांचीं चिन्हें—

**भरतः**—( धूळ कपाळास लावून ) प्रत्यक्ष राम भेटल्याचा आनंद मल होत आहे. येथील अणुरेणुसुद्धां राममय झालेले आहेत.

**पदः**—चाल–संशय कां मनि.

पाहुं कुठें रघुराया । तव पाया ॥ धृ ॥ तळमळ सखया ।
पोळित काया । मम जीवा सुखवाया । तव पाया ॥ धूली-लता-वन
घेउनि दर्शन । रमवीती जगता या । तव पाया ॥ चुकलें पाड
शोधित जननीस । सोडी जगीं जीवा या । तव पाया ॥

( साष्टांग नमस्कार घालतो. राम लक्ष्मण प्रवेश करतात. भरत उठवून गाढ आलिंगन देतात. पुष्पवृष्टी होते. इंद्रादि देव फुलें उधळ येतात. वसिष्ठादि येतात. )

**भरतः**—दादा, रामराया, हे चरण-कमल मला अंतरले होते. ईश्वराच्या खजिन्यांतील या दोनच रत्नांकरितां माझें हृदय तळमळत होतें; पुरुश्रेष्ठा, या पायांपाशीं ठाव द्या.

**रामः**—बाळा, किती दिवसांनीं दिसलास.

**भरतः**—दादा, माझ्यावर आपत्तींचा कळस झाला. बाबा इहलोक सोडून गेले; आई कुटील बनली; आपण वनवासांत गेलांत. कोणाकडे पाहून मी जीव धरून रहावें ?

**रामः**—बाळा, सर्व गोष्टी कळल्या. तूं त्या आपत्ती भोगीत आहेस, [redacted]कैलासनाथाकडे रुजूं आहे. सर्व गोष्टी अभूतपूर्ण झाल्या. भरता, तूंही अद्वितीय आहेस. तुझें प्रेम ईश्वरी आहे. बंधुभावाचें आदर्शभूत उदाहरण, भरता, सर्व त्रैलोक्यांत तूंच आहेस.

**भरतः**—दादा, या खडतर आयुष्याचा त्याग करून, अयोध्येस नाहीं कां येणार ? सर्व प्राणिमात्र हळहळत आहेत. आपल्या पुण्यदायी स्पर्शाखेरीज, रघुकुलाचें सिंहासन प्रसन्न कसें होणार ? दादा, अयोध्येस आपण चलणार ना ?

**रामः**—बाळा, हा आग्रह धरूं नकोस. परम पूज्य पित्यांनीं आपल्या वचनाकरितां इहलोकाचा त्याग केला; त्याच वचनाचा मी भंग कसा करूं ? बाळा, तूं विचारी आहेस. माता, पिता, गुरु आणि स्वामी ह्यांच्या आज्ञापालनांतच धर्म एकवटलेला आहे. त्याच धर्मानें तूं वाग; अयोध्येचें पालन कर; गुरुजनांची कृपा तुजपासून दूर नाहीं.

**भरतः**—दादा, आपल्या सिंहासनावर मी कसा बसूं ? मी लहान सुद्धां खेळण्यांत देखील, आपण माझ्या वस्तूला हात लावला नाहीं; या मोठ्या माणसाच्या वस्तूवर मी कसा हक्क गाजवूं ? दादा, आपल्या वचनाच्या आड मी येत नाहीं; परंतु आपलें अधिष्ठान असल्याशिवाय, मला सामर्थ्य येणार नाहीं. आपले चरण—रज सिंहासनावर बसवून, मी रामराज्य पाळीन. आपलें स्मरण ह्मणून आपल्या अति पवित्र पादुका—

**रामः**—घे या, भरता.

**भरतः**—( मस्तकीं धारण करतो )

**पदः**—कशि या त्यजुं पदाला०

स्वर्ग हातिं आजि आला । माझ्या । मम सुख भुलवी इंद्राला ॥धृ.॥
हे चरण न सोडी आतां । मम जीव-दीप मालवितां ॥माझ्या०॥
ही मूर्ती बहुदिनीं दिसली । मग तळमळ जिवास कसली ॥
रघुविना शून्य जग वाटे । ही प्राण-नदी आटे ॥ माझ्या० ॥

दादा, लहान भावाला केवढा आधार दिलात! हीं चरणपीठें, ह्मणजे प्रजेच्या प्राणांचे आत्मरक्षक आहेत; बंधुप्रेमाच्या दोन मूर्ती आहेत! सेवाधर्माचे विमल नेत्र आहेत; भरताच्या भक्तिरत्नांचीं भांडारें आहेत.

**वसिष्ठः**—भरता, रामरायाचा तूं खरा भाऊ शोभतोस. बंधुप्रेमाचा धडा, तुम्हीं दोघांनीं, सर्व जगाला उत्कृष्ट घालून दिलात. बंधुप्रेमानें वागणारे भाऊ, बंधुप्रेमानें वागणारे मित्र, बंधुप्रेमानें वागणारे शिष्य,–या सर्वांना, राम-भरताचा बंधुभाव स्वर्गीय सुख देईल. जा, वत्सांनों, बंधुभावापुढें, इंद्राचें ऐश्वर्य, कुबेराची संपत्ती,–या सर्व गोष्टी तुच्छ आहेत. राम-भरताच्या प्रेमभावाचें स्मरण, ह्मणजेच ईश्वरी भक्तीचें स्तोत्र. बंधु-प्रेमाच्या दिव्य-शक्तीनें सर्व जग भारून गेल्यानंतर, सर्वत्र आनंदी आनंद नांदूं लागेल. तथास्तु.

( पडदा पडतो. )

समाप्त

IRBK-0100554

म. ग्रं. सं. ठाणे. ग्रन्थालय शाखा.
नों दि ..............
ग्रा. क्र ..५५४.... क्र. ..............
दि: ....१२८५

IRBK-0100554